# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १३/२००७.** **दिनांक ८.१२.२००७**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी १.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ८ डिसेंबर, २००७ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१९३३८-२००७,दि.५.१२.२००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ८ डिसेंबर,२००७ रोजी दुपारी १.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील |
| ०३. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग | ०४. | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे |
| ०५. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | ०६. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पांण्डेय |
| ०७. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.भाऊसाहेब रा.वाकचौरे
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर दुपारी ३.३० वाजता सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव,मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्री.समि खतीब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री रमाकान्त गणेश कर्णिक, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा, मा.डॉ.पी.एल.तिवारी, यांनी दूरध्वनीवरुन कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१** **श्रीक्षेत्र शिर्डी येथे सर्व सोयीने युक्त असे अद्ययावत एस.टी.बसस्थानक उभारणेबाबतचे प्रस्तावावर चर्चा तथा विचारविनिमय करणे.**

**निर्णय क्र.७८४. (अ)** श्रीक्षेत्र शिर्डी येथे महान संत श्री साईबाबांचे दर्शन घेणेसाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. या साईभक्तांना विविध सेवा-सुविधा विश्वस्तव्यवस्थे मार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. साईभक्तांचा श्रीक्षेत्र शिर्डीचा प्रवास सुखकर व्हावा यादृष्टीने वेळोवेळी विश्वस्तव्यवस्थेमार्फत व राज्य परिवहन महामंडळामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत असतात. याचा एक भाग म्हणून, श्री क्षेत्र शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अद्ययावत सेवा-सुविधायुक्त असे बसस्थानक असणे गरजेचे आहे. याच अनुंषगाने व सल्लागार समितीने मागील सभेत सुचविल्यानुसार, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रस्तावित केलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीच्या सभांमध्ये शिर्डी येथील बसस्थानक विकसित करणेबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत.

या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांनुसार संस्थान आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राप/उपा.व व्य.सं./स्थाअ/२०२५, दिनांक १२ मे,२००६ रोजीचे पत्रासोबत पाठविलेल्या बांधकाम तपशीलांचा व बाबींचा विचार करुन शिर्डी येथील नियोजित सुसज्ज बसस्थानकाचा आराखडा व ढोबळ अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,१७,२९,६५०/- मात्रचे तयार करण्यात आलेले होते.

उपरोक्त बांधकाम आराखडयास व सुधारीत अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जून, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४१२ अन्वये मान्यता देण्यात आली. संस्थान आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखडयास मा.मुख्य स्थापत्य अभियंता, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक २८ नोव्हेंबर,२००६ व दिनांक २७ डिसेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदातील विवेचनास अनुसरुन, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे श्री क्षेत्र शिर्डी येथे राज्य परिवहन महामंडळास सर्व सुख-सोयींनीयुक्त असे अद्यायवत बसस्थानक संस्थान निधीतून बांधून देणेकामी मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावासंदर्भात मा. विधी व न्याय विभागाने मागितलेली सर्व माहिती महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व संस्थान प्रशासनामार्फत संबंधितांकडे पत्राव्दारे पाठविण्यांत आलेली आहे.

मात्र, मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२००६/ ६०७/(८७)-का.सोळा, दिनांक २७ एप्रिल, २००७ (इकडील कार्यालयास दिनांक १२

मे,२००७ रोजी प्राप्त झालेले) अन्वये असे कळविले आहे की, "शिर्डी येथील बसस्थानक बांधण्याकरीता संस्थानच्या निधीतून जवळपास रुपये २ कोटी मात्र खर्च करण्यात येणार असून, त्याबदल्यात संस्थान सदर बांधकामात कोणतेही हक्क वा सवलती मिळणार नाहीत, असे दिसून येते. शिर्डी येथे संस्थानचे स्वतंत्र माहिती केंद्र उभारण्याची आवश्यकता दिसून येत नाही. अशा स्थितीत सदर प्रस्ताव व्यवहार्य ठरत नसल्याने, सदर प्रस्तावावर पुनर्विचार करावा. "

**(क)** उपरोक्त परिच्छेद अ व ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मा.मुख्य स्थापत्य अभियंता, मरामापमं, मुंबई यांनी मंजूर केलेल्या पूर्वीच्या बांधकाम आराखडयात तळमजल्यावर संस्थानकरीता माहिती सुविधा केंद्रासाठी फक्त ४१.६७ चौमी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्यामुळे विधी व न्याय विभागाने दिनांक २७ एप्रिल, २००७ रोजीच्या पत्रान्वये सदरील प्रस्ताव व्यवहार्य ठरत नाही, त्यामुळे सदरहू प्रस्तावाचा पुनर्विचार करावा, असे कळविले होते.

त्यामुळे, मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी कळविल्याप्रमाणे या प्रस्तावावर पुनर्विचार करणेसाठी तसेच संस्थान निधीतून बांधकाम करुन देण्यात येणाऱ्या अद्ययावत बसस्थानकामध्ये भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी धर्मशाळा अथवा मोठया प्रमाणात लॉकर्स सुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देणेसाठी इकडील दिनांक ०८ ऑगष्ट, २००७ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष, मरामापमं, मुंबई व मा.कार्यकारी संचालक, मरामापमं, मुंबई यांना बैठक आयोजित करणेबाबत कळविण्यांत आलेले होते. त्यानुसार मा.मुख्य स्थापत्य अभियंता, मुंबई यांचेकडील दिनांक ०५ डिसेंबर, २००७ रोजीचे पत्रान्वये आजची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

**(ड)** संस्थान आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी शिर्डी येथील बसस्थानकाचा तळमजला अधिक तीन मजले असा सुधारीत बांधकाम आराखडा तयार केला आहे. सदरहू सुधारीत बांधकाम आराखडा तयार करतांना मरामापमं यांनी दिलेल्या सुचनांचा व निर्देशांचा विचार करण्यांत आलेला आहे. मरामापमं यांची शिर्डी येथे ९८.६५ आर (९८६५ चौरस मीटर) मालकीची जागा आहे. या सुधारीत बांधकाम आराखडयातील विशेष बाबी खालील प्रमाणे :

०१) बसस्थानकाचे एकूण बांधकाम अंदाजे ५०७९.४३ चौरस मीटर.
(तळमजला अधिक तीन मजले असे गृहीत धरुन)

०२) मरामापमं यांचे करीता एकूण बांधकाम अंदाजे २८०६.४३ चौरस मीटर.
(तळमजला अधिक तीन मजले असे गृहीत धरुन)

०३) संस्थान यांचेकरीता एकूण बांधकाम अंदाजे २२७३ चौरसमीटर.
(तळमजला अधिक तीन मजले असे गृहीत धरुन)
संस्थानकरीता तळमजल्यावर माहिती-सुविधा केंद्रासाठी स्वतंत्ररित्या जागा व या जागेतूनच वरील तीन मजल्यांवर जाणेसाठी स्वतंत्ररित्या संस्थानकरीता जिना व लिफ्टची सोय.

०४) संस्थानकरीता पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर धर्मशाळेची (डॉरमेट्रीज)सोय करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रत्येक मजल्यावर अंदाजित ७५० चौरस फुटाचे प्रत्येकी चार मोठे हॉल-वजा-खोल्या बांधण्यात येणार असून, असे १२ मोठे हॉल्स उपलब्ध होणार आहेत. यामध्ये अंदाजे ४५० साईभक्तांची राहण्याची व्यवस्था होईल. तसेच प्रत्येक मजल्यावर स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्ररित्या प्रसाधनगृहाची (स्नानगृह, शौचालय आदि) व्यवस्था करण्यांत येईल. धर्मशाळेव्यतिरीक्त लॉकर्स रुममध्ये अंदाजे ४५० व्यक्तींचे सामान ठेवण्याची व्यवस्था करता येईल.

०५) संस्थानव्यतिरिक्त मरामापमं यांचेकरीता पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर अंदाजित २०० बस वाहक-चालक, अधिकारी यांची राहण्याची सोय होईल, असे सर्व सोयींनी युक्त विश्रांतीगृह बांधण्यांत येणार आहे.

०६) बसस्थानकाच्या तळमजल्यावर १० प्लॉटफॉर्मस्‌ची सोय, बुकींग व पार्सल ऑफिस, स्टॅन्ड इन्चार्ज, कंट्रोलर रुम, उपहारगृह, विविध वस्तुंचे स्टॉल्स, प्रवाशांसाठी प्रतिक्षागृह, प्रशस्त प्रसाधनगृहाची सोय, ५० बसेसची पार्किंगची सोय करण्यात येणार आहे.

०७) भूमिगत जलकुंभ व सांडपाण्याची व्यवस्था.

०८) पिण्याचे पाण्यासाठी स्वतंत्र पाणपोई.

०९) विद्युतीकरण व विद्युतजनित्राची सोय.

१०) बाग-बगिचा व पार्किंग.

बसस्थानकाचा सुधारीत बांधकाम आराखडा तयार करतांना तळमजला अधिक तीन मजले असे बांधकाम दर्शविण्यांत आले असले तरी, यामध्ये तिसऱ्या मजल्याच्या बांधकामास नगररचना विभागाची मान्यता मिळेल असे गृहीत धरण्यांत आलेले आहे.

**(इ)** शिर्डी येथील प्रस्तावित बसस्थानकाच्या अंदाजे ५०७९.४३ चौरस मीटर बांधकामासाठी अंदाजित रक्कम रुपये ५.०९ कोटी मात्र इतका खर्च येईल. यापैकी श्री साईबाबा संस्थान

विश्वस्तव्यवस्था,शिर्डीला २२७३ चौरसमीटरचे माहिती सुविधा केंद्रासह धर्मशाळेचे बांधकाम मिळणार आहे. शिर्डी बसस्थानकाची जागा ही अहमदनगर-मनमाड राजमार्गालगत असून, २२७६ चौरस मीटर जागेसाठी शासकीय दरानुसार जागेचे मुल्य रुपये ३००० प्रती चौरस मीटरप्रमाणे अंदाजित ६८.१९ लाख इतके रुपये होते. शिर्डीतील आजचे ऐकीव बाजारभावानुसार सदर जागेचे मुल्य अंदाजे रुपये १०,०००/- प्रति चौरस मीटर याप्रमाणे अंदाजे रुपये २२७.३० लाख इतके होईल, असे वाटते. सदरचे संस्थान वापराचे बांधकामासाठी आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस् यांचे अंदाजपत्रकानुसार अंदाजे रुपये १७१.५८ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. मरामापमं यांना करुन द्यावयाच्या बांधकामाचा खर्च अंदाजे रुपये २३०.२० लाख इतका अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक सोयी व इतर सुविधांसाठी रुपये ९७.०२ लाख इतका खर्च येणार आहे.

तसेच, श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अद्यायवत बसस्थानक असणे अत्यंत आवश्यक आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांमध्ये संपूर्ण देशासह, विदेशातील भक्तांचा ही समावेश असतो. साईभक्तांना शिर्डीत प्रवेश केल्यानंतर अत्यंत प्रसन्न व मनमोहक असे बसस्थानक दृष्टीस पडल्यास त्यांचा आनंद नक्की व्दिगुणीत होईल, यात शंका नाही. यासाठी आजचे सभेत अनुकूल असा तपशीलवार निर्णय झालेस संस्थानचे माध्यमातून व निधीतून श्री क्षेत्र शिर्डी येथे अद्यायवत बसस्थानक उभारणीबाबतचा पुनरप्रस्ताव अधिनियमतील तरतुदीस अनुसरुन मान्यतेसाठी शासनाकडे सादर करता येईल.

उपरोक्तप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा-तथा-विचारविनिमय करणेसाठी आजचे सभेमध्ये मरामापमंचे अध्यक्ष आमदार मा.श्री.सुधाकरपंत परिचारक, मरामापमंचे मुख्य स्थापत्य अभियंता श्री.ज.भा.इनामदार, श्री ह.सा.गिरीगोसावी, उपमहाव्यवस्थापक, मरामापमं, श्री एस.एम.जाधव, प्रादेशिक व्यवस्थापक,नाशिक, श्री पी.बी.सुर्यवंशी, विभागीय अभियंता, मरामापमं,अहमदनगर, श्री व्ही.टी.भिलारकर, कार्यकारी अभियंता, मरामापमं, नाशिक यांचेसह मरामापमंचे इतर अधिकारी उपस्थित होते. सुरुवातीस मा.कार्यकारी अधिकारी यांनी श्री क्षेत्र शिर्डी येथे अद्यायवत बसस्थानक उभारणीबाबतचे महत्व विषद करुन, त्याबाबतचे थोडक्यात प्रास्ताविक केले. त्यानंतर संस्थान आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.चौधरी यांनी मरामापमंचे सुचना व निर्देश विचारांत घेऊन तसेच साईभक्तांना सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संस्थानच्या उद्दीष्टांचा विचार करुन तयार केलेल्या सुधारीत बांधकाम आराखडयाविषयी माहिती सभेस दिली.

**संस्थान आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या सुधारीत बांधकाम आराखडयावर सविस्तर व सांगोपांग चर्चा करणेत येऊन, बांधकाम आराखडयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात, असे ठरले.**

०१. बसस्थानकाच्या तळमजल्यावर संस्थानसाठी माहिती सुविधा केंद्रांच्या जागेव्यतिरिक्त इतर उपक्रमासाठी, जसे खोली आरक्षण केंद्र, देणगी कार्यालय, पुस्तक फोटो विक्री केंद्र, बँकांचे एटीएम केंद्र, रेल्वे बुकींग काऊंटर, लॉकर्स सुविधा व इतर अनुषंगिक भक्तांच्या सेवा सुविधेसाठी नकाशात दर्शविलेले पश्चिम बाजुकडील मोठया आकाराचे तीन दुकानगाळे व पूर्व बाजुकडील छोटया आकाराचे तीन दुकानगाळे संस्थानकडे देण्यांत यावेत.

०२. बसस्थानकाच्या प्रवाशांच्या प्रतिक्षागृहाच्यावर, म्हणजेच प्लॅटफार्मस्च्या वर पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर सुधारित बांधकाम आराखडयात दर्शविल्याप्रमाणे साईभक्तांचे निवासाकरीता संस्थानतर्फे धर्मशाळा सुरु करणेसाठी बांधकाम करण्यात यावे.

०३. बसस्थानकाच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर मरामापमंच्या अधिकारी वर्गासाठी एकूण ०४ व्ही.आय.पी. सुटस् ची व्यवस्था करण्यांत आलेली आहे, त्याऐवजी फक्त दुसऱ्या मजल्यावर ०२ व्ही.आय.पी.सुटस्ची व्यवस्था करण्यांत यावी. संपूर्ण पहिला मजला साईभक्तांच्या धर्मशाळा व लॉकर्स सुविधेसाठी संस्थानला उपलब्ध करुन देण्यांत यावा.

०४. बसस्थानकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर मरामापमंच्या निर्देशानुसार व सुचनांनुसार शिर्डी येथे मुक्कामी असणाऱ्या १५० बसवाहक व बसचालक कर्मचाऱ्यांसाठी धर्मशाळा-वजा-विश्रांतीगृहाचे बांधकाम करुन देण्यांत यावे.

०५. बसस्थानकाच्या तळमजल्यावर मरामापमंच्या निर्देशानुसार आगार व्यवस्थापक,वाहतूक नियंत्रक, लेखा विभाग, आगाऊ तिकीट / आरक्षण केंद्र, पार्सल बुकींग केंद्र, साधारणत: ४० बसेस मुक्कामी राहतील अशी वाहनतळाची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत यावी.

०६. सुधारीत बांधकाम आराखडयामध्ये सध्या ११ प्लॅटफॉर्मस्ची सुविधा दर्शविण्यांत आलेली आहे, तथापि भविष्यात गर्दीमुळे हे प्लॅटफॉर्मस् कमी पडू शकतात या मा.अध्यक्ष, मरामापमं यांच्या सूचनेचा विचार करुन आणखी ०४ प्लॅटफार्मस्ची सुविधा भविष्यातील विस्तारीकरणाची तरतूद बांधकाम आराखडयात करण्यांत यावी.

०७. तळमजल्यावर प्रवाशांच्या सोयी-सुविधेसाठी उपहारगृहाबरोबरच पिण्याचे पाण्याची सोय, मोठया प्रमाणावर स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्ररित्या प्रसाधानगृहाची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे बांधकाम आराखडयात बदल करुन नवीन बांधकाम आराखडा मरामापमंच्या मान्यतेसाठी त्वरीत पाठविण्यांत यावा, असे निर्देश देण्यांत आले. बांधकाम आराखडा मंजूर झालेनंतर त्याच्या सविस्तर निविदा तयार करुन जानेवारी, २००८ मध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे बसस्थानकाच्या बांधकाम आराखडयास मान्यता देण्यांत आल्यानंतर, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस डेपोसाठी शिर्डी विकास योजना आराखडयात आरक्षण क्रमांक ४६ दर्शविण्यांत आलेले आहे. बस डेपोसाठी मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १६१ ते १६५ पैकी मधील ०५ हेक्टर ४५ आर क्षेत्र आरक्षित करण्यांत आलेले आहे. सदरहू आरक्षणातील जमीन शिर्डीतील जमिनीचे सरकारी व बाजारभाव पाहतां मरामापमं यांना संपादीत करता येणे शक्य नाही. त्याऐवजी सदहू आरक्षणातील जमीन संस्थानला भूसंपादीत करण्यासाठी/खरेदी करण्यांसाठी मरामापमंच्या वतीने ना हरकत देण्यांत यावी. त्यानुसार सदरहू आरक्षित जमीन संस्थानने संपादीत करावी व त्याचा योग्य विकास प्रकल्पासाठी विनियोग करावा व याऐवजी संस्थानने मरामापमं यांना मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारात संस्थान मालकीची साधारणत: ०३ (तीन) एकर जमीन बस डेपोसाठी उपलब्ध करुन द्यावी, अशी सूचना मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी सभेपुढे मांडली.

त्यावर सविस्तर चर्चा करण्यांत येऊन, सदरहू प्रस्तावास सभेस उपस्थित असणाऱ्या मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनीही सहमती दर्शविली. त्यावर मा.अध्यक्ष, मरामापमं यांनी सदरहू प्रस्तावावर सकारात्मक दृष्टीकोन दर्शवून याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मरामापमंचे उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच, शिर्डी बसस्थानक बांधकामाविषयी उपरोक्तप्रमाणे ठरलेल्या बाबींविषयी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेमध्ये सविस्तर अटी व शर्तींचा समावेश करुन सामंजस्य करार (Memorandum of Understanding) करण्यात यावा, असे ठरले.

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **श्रीद्वारकामाई मंदीरातील पवित्र खांबाबाबत.**

**निर्णय क्र.७८५** दि. १३/०९/२००७ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांनी श्री व्दारकामाई मंदिरात मंदिर विभागातील व बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांसमवेत राऊंड घेतला. सदर राऊंड मध्ये व्दारकामाईत सभा मंडपामध्ये बाबांचे काळातील पवित्र खांब आहे. सदरचा खांब दक्षिणेकडे तिरका झालेला असून त्यास उधई लागलेली किंवा कसे याबाबत पडताळणीसाठी सदरचे खांबाखालील फरशी काढून खांबाचे तळापर्यंत उघडाकरुन पहावा अशी सूचना केलेली आहे.

याकामी सदर खांबाखालची (बाजुची) फरशी काढून खांबाचे तळापर्यंत उघडा केल्यास खांब मोकळा होईल.

तरी याकामी सदरचे खांबाजवळची फरशी काढून खांबाचे तळापर्यंत खोदाई करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली व आवश्यकतेनुसार केमिकल प्रक्रिया/उपाययोजना करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षीक,मंदीरविभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्रीसाईनाथ रुग्णालय व धर्मशाळा इमारतीचे पाठीमागील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी कामाचे ठेकेदार श्री.डी.जी.गंदाल,नेवासा यांचे मुदतवाढ मागणीबाबत**

**निर्णय क्र.७८६** संस्थानचे धर्मशाळा (२०० खोल्या) इमारतीचे पाठीमागील भागात उंदिर व घुशी यांचेपासून संरक्षण होणेकरीता सोलिंग करुन पेव्हिंग ब्लॉक्स बसविण्याचे काम ठेकेदार श्री. डि. जी. गंदाल, नेवासा यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर काम हे प्रगतीपथावर असून सुमारे ४० टक्के काम पूर्ण झालेले आहे. निविदा शर्तीनुसार सदर काम पूर्ण करण्यासाठी ०२ महिने मुदत देण्यात आलेली आहे. सदर मुदत दिनांक १० नोव्हेंबर, २००७ रोजी संपुष्टात आलेली आहे. ठेकेदार यांचे सोलिंग, मुरुम स्प्रेडिंग, पेव्हिंग व कर्ब स्टोनचे कामे अद्याप बाकी आहे.

ठेकेदार श्री.डी.जी.गंदाल, नेवासा यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २००७ रोजीचे पत्रान्वये, सदर काम पूर्ण करण्यासाठी दोन महिने मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केलेली आहे. सदर पत्रात त्यांनी नमुद केले आहे की, "सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन व खोदाईचे काम चालु असल्याकारणे काम करण्यास अडचण येत आहे."

ठेकेदार यांचे विनंतीबाबत सदर कामाचे आर्किटेक्ट मे. निकम पाटील ॲण्ड असो., श्रीरामपूर यांनी दिनांक ०५ डिसेंबर, २००७ रोजीचे पत्राव्दारे असा अभिप्राय दिलेला आहे की, " धर्मशाळा इमारतीचे मागील बाजूस ड्रेनेज लाईन्सचे खोदाईचे कामे चालू असलेकारणाने पेव्हिंग ब्लॉकचे काम सध्या स्थितीस बंद आहे. उपरोक्त विनंतीचे कारण लक्षात घेता, ठेकेदार यांना दिनांक १० जानेवारी, २००८ पर्यन्त (दोन महिने) पर्यन्त मुदतवाढ देणेस हरकत नाही. "

तरी ठेकेदार यांचे मुदतवाढीची उपरोक्त विनंती व आर्किटेक्ट यांचे अभिप्रायानुसार ठेकेदार यांना दिनांक १० जानेवारी, २००८ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३.** **शिर्डी येथील नवीन जिल्हा परिषद शाळेत काही वाढीव सुविधा संस्थानाने निर्माण करणे बाबत**
**निर्णय क्र.७८७** **(अ)**श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे शिर्डी येथील सर्व्हे क्र. ०६ (आ.क्र.०८) या जागेत जिल्हा परिषद शाळा या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. या नूतन इमारतीत दि. २८/०८/२००६ पासून शाळेचे कामकाज सुरु झालेले आहे. मा.मुख्याध्यापिका यांनी दि. २८/०८/२००६ जा.क्र. ३६१ चे पत्रान्वये इकडील विभागास शाळेत विविध सेवा-सुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी केली होती. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.परिषद अ.नगर यांनी जा.क्र. कार्य.४/बांध/७३७/२००६ दि. १८/१०/२००६ रोजीचे पत्रान्वये शाळेच्या नविन इमारतीत काही वाढीव सेवा-सुविधा पुरविणेबाबत कळविले होते.

त्यानुसार दि. २५/११/२००६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदरहू विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ८९१ अन्वये येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील जा.क्र. ११०४/२००७ दि. २२/०१/२००७ रोजी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केलेला आहे.

**(ब)** मा.कार्यकारी अधिकारी व गट शिक्षणाधिकारी, राहाता यांनी दि. १०/०७/२००७ रोजी सदर शाळेस भेट दिली. सदरचे शाळेत संस्थानचे आवश्यक ज्युनियर कॉलेज भरविण्याचे नियोजन आहे. सदरचे भेटी दरम्यान मा.गट शिक्षणाधिकारी यांनी कामे करुन मिळणेबाबत विनंती केली त्यावरुन मा.कार्यकारी अधिकारी यांनी पिण्याचे पाण्याची व्यवस्था, वाढीव टॉयलेट, मैदान सपाटीकरण, कम्पाऊंड भिंत ही कामे प्राधान्याने करणेबाबत सूचना दिली.

तसेच पंचायत समिती, राहाता यांचे गट शिक्षणाधिकारी यांनी दि. १७/०७/२००७ चे पत्राव्दारे पाठविलेल्या यादीतील भौतिक सुविधा त्वरीत करण्याची विनंती केली आहे.

**(क)** उपरोक्त पैकी काचा बसविण्याचे, नव्याने ताबा घेतलेल्या क्षेत्रातील असलेल्या जुन्या कंपाऊंड भिंती तोडणेचे काम विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. पैकी खालील मोठ्या स्वरुपाचे कामे आर्किटेक्ट यांचे मार्फत प्लॅन एस्टीमेट व निविदा तयार करुन ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण करता येतील.

०१. पाण्याची आर.सी.सी. भुमिगत साठवण टाकी क्षमता :- २०,००० लिटर
०२. वाढीव टॉयलेट - लेडीज व जेन्टस
०३. कंपाउंड भिंत बांधकाम
०४.खेळाचे मैदानाचे सपाटीकरण व मुरुम भराई करणे.

गर्दीचे काळात सदर इमारत साईभक्तांचे निवासासाठी उपलब्ध करण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच साईभक्तांचे सोयीकरीता उपरोक्त सुविधा करणे गरजेचे आहे. सदरहू इमारत जागेसह जिल्हा परिषद, अहमदनगर यांना हस्तांतरीत करणेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे जा.नं. ७३९३, दि. ०६.०६.२००६ अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत आला आहे. सदर मान्यता प्रतिक्षाधिन आहे. हस्तांतरणापुर्वी उपरोक्त आवश्यक सुविधा करणेबाबत जि.पं., अहमदनगर यांचा आग्रह आहे.

उपरोक्त कामांस प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रुपये ४,२५,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

सदरहू कामांसाठी संस्थान पॅनेलवरील आर्किटेक्ट मे.निकम पाटील ॲण्ड असो., श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर प्लॅन एस्टीमेट व निविदा तयार करुन व वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस व सदरचे काम करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू कामे खात्यामार्फत मटेरिअल खरेदी करुन मजूर ठेकेदारांकरवी करुन घ्यावीत असे ठरलें. त्यासाठी येणारे वरीलप्रमाणे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४.** **मंदिर परिसरातील स्टेजवर Awining Fabric बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.७८८** मंदिर परिसरात दिनांक ०३/१०/२००७ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी व मंदिर विभाग प्रमुख यांचा राऊंड झाला त्यावेळेस मंदिर परिसरातील स्टेजवर भक्त आरतीचे वेळेस स्टेजवर बसतात तसेच श्री व्दारकामाई मंदिरामध्ये जाणेसाठी दर्शनरांग बाहेरील बाजुने आहे. भक्तांचे उन,वारा.पाऊस यापासून त्रास होणेकरीता त्यावर सदर ठिकाणी प्लास्टीक कागद लावणेबाबत मा.प्रशासकीय अधिकारी यांनी मंदिर विभाग प्रमुख यांना सुचना केली. त्यानुसार मंदिर विभाग प्रमुख यांनी इकडील विभागाकडे सदर ठिकाणी प्लॉस्टीक कागद लावून मिळणेबाबत दुरध्वनीवर सांगितले.

तरी याकामी मंदिर परिसरात यापुर्वी जनसंपर्क कार्यालय व लाडू काउंटर समोर Awining shed तयार केलेले आहे. या शेडचे फॅब्रिक सदर दोन्ही ठिकाणी बसविणेस ते दिसण्यास सुयोग्य होईल. याकामी सोबतचे एस्टीमेटप्रमाणे अंदाजे रु. ९०,७७८.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी याकामी येणारे अंदाजे रु. ९०,७७८.०० मात्रचे खर्चास व याकामी कोटेशन मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन सदरच्या स्टेजमुळे सभाकुंडाचा साईभक्तांसाठी उपयोग कमी होतो याकरिता सदरचे स्टेज काढणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचे पहाणीत ठरले आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव स्थगित करण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/अधिक्षक,मंदीरविभाग )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५.** **दर्शन लाईनकरिता लेंडीबागेत जिना उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.७८९** श्रीचे दर्शनासाठी शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीचे तळमजला व पहिला मजल्यावर दर्शन लाईनची व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दीचे वेळेस हॉल भरल्यानंतर मंदिर परिसरातील कॉरोडोअरचे टेरेस स्लॅब वरुन दर्शन लाईन लेंडीबागेत घेण्यात येते. लेंडीबागेतील जिना चढून भक्तांना टेरेसवर जावे लागते. गर्दीचे वेळेस सदर जिण्यापासून आवश्यकते पेक्षा जास्त भक्तांची गर्दी झाल्यास भक्तांना त्रास होतो. करीता सदर ठिकाणी एम.एस.स्ट्रक्चर जिना उभारणे कामी कोटेशन मागविण्यात आले होते. मा.व्यवस्थापन समितीचे दि. १७/०२/२००७ चे सभेत नि.क्र. १३३ अन्वये चर्चा व वाटाघाटीनंतर निम्नतम दर असलेले ठेकेदार मे.सिध्दकला इंडस्ट्रिज, सावळीविहीर यांचे रु. ९२,०००.०० रकमेचे कोटेशन स्विकारणेत यावे असे ठरले.

त्यानुसार ठेकेदार मे.सिध्दकला इंडस्ट्रिज, श्री. जयंत जमधडे, सावळीविहिर यांना इकडील जा.नं.६३२३ दि. १९/०४/२००७ अन्वये कार्यादेश देण्यात आला. ठेकेदार यांना वेळोवेळी दूरध्वनीवर कामाबाबत विचारणा केली असता त्यांना आज करतो, उद्या करतो अशी उत्तरे दिली. परंतू अद्यापपर्यंत काम केलेले नाही. यावरुन ठेकेदार यांची काम करण्याची इच्छा दिसून येत नाही. करीता व्दितीय निम्नतम ठेकेदार मे.तुषार फॅब्रिकेटर्स, श्रीरामपूर यांना निम्नतम दर असलेले ठेकेदार मे. सिध्दकला इंडस्ट्रिज, सावळीविहिर यांचे मंजूर दरात काम करणेबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी सदरचे काम करण्यास तयार असल्याचे सांगितले आहे.

तरी एम.एस. जिन्याचे काम ठेकेदार मे.तुषार फॅब्रिकेटर्स,श्रीरामपूर यांचेकडून करुन घेणेस व मे. सिध्दकला इंडस्ट्रीज, सावळीविहीर यांनी निविदेसोबत भरलेली अनामत रक्कम जप्त करुन घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६.** **१०० एम.ए.मोबाईल एक्स-रे मशिन दुरुस्तीबाबत**

**निर्णय क्र.७९०** श्रीसाईबाबा हॉस्पिटल मधील आय.सी.सी.यु.,कार्डियाक रिकव्हरी, जी.आय.सी.यु. व विविध वार्डमधील अत्यवस्थ रुग्णांची एक्स-रे तेथेच काढण्याकीता श्री साईनाथ रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागातील मे. सिमेन्स ली. मुंबई या कंपनीचे १०० एम.ए. मोबाईल एक्स-रे मशीन आणण्यात आले असुन सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नियमीत वापरात आहे. सदरचे १०० एम.ए. मोबाईल एक्स-रे मोबाईल एक्स-रे मशीन सन २००२ साली मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडुन एकुण रु. २,२८,८४६/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे.

सदर मशीनने व्यवस्थीत काम देणेकरीता मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि. ०१/०१/२००७ ते दि.३१/१२/२००७ या कालावधीकरीता एकुण रु. २२,४४८/- इतकी रक्कम देउन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले आहे. सदरच्या कालावधीत दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

दि.३०/०९/२००७ रोजी कंपनीचे इंजिनीअर श्री साईबाबा हॉस्टिलमध्ये सदर मशीनच्या दुरुस्तीकरीता आले असता त्यांनी मशीनचे टयुब हेड टँक (Single Tank) व एक D920 Board खराब असल्याची शक्यता असल्यामुळे औरंगाबाद येथे दुसऱ्या त्याच प्रकारच्या मशिनवर तपासुन पाहण्याकरीता घेउन गेले होते. सदरचे Single Tank व D920 Board दुसऱ्या चालु स्थितीतील

मशीनवर तपासुन पाहुन ते खराब असल्याचे त्यांचे सर्व्हिस रिपोर्ट क्र. ३१९२९ दि. ०३/१०/२००७ अन्वये कळविले आहे. व सदरचे दोन्ही पार्ट बदलणेकरीता खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| अ.क्र. | कोटेशन क्र. व दिनांक | स्पेअर पार्टचे नाव | नविन पार्टची किंमत सर्व करांसहीत रु. | जुने पार्ट परत देउन नविन पार्ट खरेदी केल्यास किंमत सर्व करांसहीत रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७८०१०३ दि. ०३/१०/२००७<br>१७८०१०५ दि. ०३/१०/२००७ | Single Tank For MM2.5 P. No. M08633039 | १,६३,८००.०० | १,४०,४००.०० |
| ०२ | १७८०१०४<br>दि. ०३/१०/२००७ | PCB D-920 for MM 2.5 P.No.M08633176 | ७,८,१५.०० | ७,८१५.०० |
| | | **एकुण रु.** | **१,७१,६१५,००** | **१,४८,२१५.००** |

वरीलप्रमाणे सदर मशीनचे Single Tank व D920 Board हे पार्ट कंपनीकडुन नविन खरेदी करण्यास एकुण रु. १,७१,६१५/-(अक्षरी रु. एक लाख एकाहत्तर हजार सहाशे पंधरा मात्र) इतका खर्च येईल. व जर कंपनीस जुना Single Tank व D920 Board परत करुन नविन पार्ट खरेदी केल्यास व नविन D920 बोर्ड खरेदी करण्यास एकुण रु. १,४८,२१५/-(अक्षरी रु. एक लाख आठठेचाळीस हजार दोनशे पंधरा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी नविन पोर्टेबल १०० एम.ए. एक्स-रे खरेदीचा प्रस्ताव मा. व्य. समिती समोर विचारार्थ सादर करण्यात आला आहे. सध्या अशाच प्रकारचे नविन १०० एम.ए. पोर्टेबल एक्स-रे मशीनची किंमत अंदाजे रु. २,५०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख पन्नास हजार मात्र )इतकी आहे. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सध्या नादुरुस्त असलेले १०० एम.ए. पोर्टेबल एक्स-रे मशीन दुरुस्तीच्या खर्चाचा विचार करता श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी देखिल वरीलप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयासाठी नविन पोर्टेबल एक्स-रे मशीन खरेदी करताना सदरचे नादुरुस्त मशीन कंपनीस परत करुन नविन पोर्टेबल १०० एम.ए. एक्स-रे मशिन प्रत्यक्ष वाटाघाटी करुन खरेदी केल्यास अधिक फायदेशीर राहील असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील नादुरुस्त पोर्टेबल १०० एम.ए. एक्स-रे मशिन कंपनीस परत करुन (Buyback) त्याच क्षमतेचे नविन मशीन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **Choice PT Extra Support वार्षीक मागणीतील मंजूर दराने खरेदीकामी कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत**

**निर्णय क्र.७९१** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे सन २००६-०७ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधांकरीता मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १९/०८/२००६ निर्णय क्रमांक ५५९ व दि. १४/१०/२००६ चे सभेतील निर्णय क्र. ७८५(२२) अन्वये वार्षिक मागणीमध्ये Choice PT Extra Support - १ नग खरेदीस मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार मे. फ्रंटायर मेडीटेक (इं) प्रा. लि., मुंबई यांना इकडील पत्र क्र. १४०९३ दि. १२/१०/२००६ अन्वये पहिल्या टप्प्यात ०१ नगाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता व त्यांनी आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. उपरोक्त मटेरीयलचा साठा औषध भांडारात शिल्लक नसल्यामुळे Cathlab विभागासाठी सदर मटेरीयलची आवश्यकता होती. तेंव्हा वार्षिक मागणीतील मंजुर दराने खालीलप्रमाणे Choice PT Extra Support - १० नग खरेदी करण्यात आले आहे-

| Sr. No. | Description | Annual Qty. | 1st Phase Qty. | Add. Reg. Qty. | Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Choice PT Extra Support | 01 | 01 | 10 | 4702.50 | 47025.00 |
| | | | | | Total - | 47025.00 |

तरी उपरोक्तप्रमाणे Choice PT Extra Support - १० नग मे. फ्रंटायर मेडीटेक (इं) प्रा. लि., मुंबई यांचेकडून वार्षिक मागणीतील मंजुर दराने खरेदी करण्यास व याकामी आलेल्या रु. ४७,०२५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **Autoclean, Autodil, Autolyse व E.D.T.A AGD Solution खरेदीच्या जादा खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**निर्णय क्र.७९२** श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळेत लागणाऱ्या उपरोक्त केमिकल्स करीता सन २००७-२००८ या वर्षाकरीता एकूण Autoclean - ८४, Autodil - १३८, Autolyse - ९४ व

E.D.T.A. AGD Solution - ६५ इतक्या नगांची मागणी करणेत आली होती. सदर केमिकल्ससाठी मे. युनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक या एकमेव निविदाधारकांचे दर प्राप्त झाले असून मे. युनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक हे AGD या कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत.

सदर केमीकल्सकरीता मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ निर्णय क्र.६०१ अन्वये मंजुरी घेण्यात येऊन त्याकामी मे. युनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक यांना इकडील पत्र क्रमांक १६१२४ दि.०९/१०/२००७ अन्वये एक वर्षाकरीता पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

मे.युनिव्हर्सल केमिकल्स,नाशिक यांनी दि.२४/१०/२००७ रोजीचे पत्रान्वये मे. एजीडी मेडीकल्स, मुंबई ही उत्पादक कंपनी मुंबईहून बाडी (हिमाचल प्रदेश) येथे स्थलांतरीत झालेली असल्यामुळे त्यांचे उत्पादीत मटेरीयल पोहचविणेकामी लागणारा कर (Tax) जादा अदा करावा लागणार असल्यामुळे Autoclean, Autodil, Autolyse चे दर वाढल्याचे तसेच E.D.T.A. AGD Solution चे दर वाढवून त्यांचे पॅकींग १ लिटर ऐवजी २५० मीली असल्याचे कळविले आहे. ते खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rates in P.O. | Total Amount | New Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AUTOCLEAN 2 LITER | 84 | 654.00 | 54936.00 | 752.00 | 63168.00 |
| 2 | AUTODIL 20 LITER | 138 | 1893.00 | 261234.00 | 2177.00 | 300426.00 |
| 3 | AUTOLYSE 500ML | 94 | 2840.00 | 266960.00 | 3266.00 | 307004.00 |
| 4 | E.D.T.A. AGD SOLUTION (1 X 250ML) | 65 | 435.50 | 28307.50 | 528.00 | 34320.00 |
| | | | | **611437.50** | | **704918.00** |
| | | | | | | |
| | | | | **जादा खर्च रु.** | | **93480.50** |

याकामी मे. युनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे त्यांचेकडूनच ती खरेदी करावी लागणार आहे. तरी मे. युनिव्हर्सल केमिकल्स, नाशिक यांचे नवीन दर स्विकारण्यास व याकामी येणाऱ्या रु. ९३,४८०.५० चे जादा खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तकामी एकच निविदा प्राप्त झाल्याने याकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्रीसाईबाबा रुग्णालयात टू डी एको रुमसाठी स्प्लीट ए.सी.बसविणेबाबत**

**निर्णय क्र.७९३** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागाने त्यांचे मागणी पत्र क्र. ३२४४ दि. १४/०८/२००७ अन्वये २ D - Echo रुममध्ये Split A/C बसवून मिळणेबाबत मागणी केली होती. त्यानुसार सदरचे रुमसाठी किती टनाचा Split A/C बसवावा लागेल, याकरीता संस्थानचे विदयुत विभागास दि.१८/०९/२००७ रोजी पत्र पाठवून सदर रुमसाठी किती टनाचा A/C बसवावा लागेल याबाबत महिती मागविण्यात आली होती.

विद्युत विभाग प्रमुख यांनी त्यांचे दि. ०३/१०/२००७ चे पत्रान्वये सदर रुमची पाहणी करुन २ टन व्होल्टास मेक वॉल माऊंटेड स्प्लिट A/C बसविता येईल असे कळविले आहे. सदरचे २ टन A/C - १ नग खरेदीकामी अंदाजे रु. ४०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयात टू डी एको रुमसाठी आवश्यक असणारा २ टन क्षमतेचा १ नग ए.सी.कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **वैद्यकीय संचालक यांचे अधिकाराव्यतिरिक्त माहे ऑगस्ट-२००७ मधील तातडीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.७९४** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागात दैनंदिन अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टीसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु. विभागास शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागणारी इंजेक्शन इत्यादी तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारी औषधे जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती व तातडीने खरेदी करणे गरजेचे होते ती नाशिक, श्रीरामपूर, पुणे, मुंबई जळगाव, धूळे, लातूर, संगमनेर, शिर्डी येथून तातडीने खरेदी केलेली आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि.१५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालय नव्यानेच चालु झालेले असल्यामुळे व वेगवेगळया विभागात वेळोवेळी नवनवीन तज्ञ डॉक्टर हे हजर होत होते, त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये मागणी केलेल्या औषधांव्यतिरीक्त बरीचशी नविन औषधे संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खरेदी करावी लागतात. (विशेषत: CVTS, CRU, CATHLAB इत्यादी विभाग) अशी वारंवार लागणारी नविन औषधे हि सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथून पुढे तातडीची औषधे खरेदी करण्याचे प्रमाण बरेचशे घटेल.

तसेच सी.आर.यू. व कॅथलॅबमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी लागणारी औषधे आपण पॅकेजमध्ये देत असल्यामुळे ती आपणास तातडीने खरेदी करुन दयावी लागतात. ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लास्टीसाठी रुग्णांची संख्या सतत वाढत असल्यामुळे सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक मागणी अपूरी पडत आहे.

माहे सप्टेंबरपासून सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात येत आहे. याशिवाय वार्षिक मागणी व्यतिरीक्त वेळोवेळी तातडीने लागणाऱ्या औषधांसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ चे सभेतील निर्णयानुसार होलसेल विक्रेते / नामांकित कंपनीकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यांचे दरपत्रक मागवून त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे लागणारी औषधे खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे व त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे.

खालील तपशिलातील नमुद केलेली औषधे वार्षिक मंजुर दराने (२००७-०८) उपलब्ध होणेस काही कालावधी लागणार असल्याने ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी एकुण रु.२२७३६७/- इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी हि माहे ऑगस्ट - २००७ मध्ये वैद्यकिय संचालक यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३/०६/२००७ निर्णय क्र.३४८ नुसार दरमहा असलेल्या रु.१,००,०००/-चे तरतूदी व्यतिरिक्त केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Arihant Agency, Sangamner | 8957 | 07/08/2007 | 38750.00 |
| | | | Total Amt. | **38750.00** |
| 2 | Chintamani Medical & Gen. Stores Shirdi | 2786 | 23/08/2007 | 302.00 |
| | | | Total Amt. | **302.00** |
| 3 | J.S.P.Surgical, Nashik | 8172 | 01/08/2007 | 2470.00 |
| 4 | J.S.P.Surgical, Nashik | 8181 | 08/08/2007 | 14681.00 |
| 5 | J.S.P.Surgical, Nashik | 8179 | 08/08/2007 | 6549.00 |
| 6 | J.S.P.Surgical, Nashik | 8182 | 08/08/2007 | 4021.00 |
| 7 | J.S.P.Surgical, Nashik | 8183 | 11/08/2007 | 8663.00 |
| 8 | J.S.P.Surgical, Nashik | 8187 | 22/08/2007 | 2820.00 |
| 9 | J.S.P.Surgical, Nashik | 8188 | 22/08/2007 | 1110.00 |
| 10 | J.S.P.Surgical, Nashik | 1070 | 28/08/2007 | 1238.00 |
| | | | Total Amt. | **41552.00** |
| 11 | Jaya Enterprises Latur | 469 | 20/08/2007 | 3640.00 |
| | | | Total Amt. | **3640.00** |
| 12 | Kabra Medicals, Jalgaon | 262 | 25/08/2007 | 6925.00 |
| | | | Total Amt. | **6925.00** |
| 13 | Kanchan Drugs, Pune. | 4032 | 14/08/2007 | 27206.00 |
| 14 | Kanchan Drugs, Pune. | 4102 | 17/08/2007 | 4953.00 |
| | | | Total Amt. | **32159.00** |
| 15 | Kumar Brothers, Mumbai | 19370 | 04/08/2007 | 18720.00 |
| 16 | Kumar Brothers, Mumbai | 19371 | 04/08/2007 | 18720.00 |
| 17 | Kumar Brothers, Mumbai | 19369 | 04/08/2007 | 18720.00 |
| | | | Total Amt. | **56160.00** |
| 18 | Mahesh Surgical, Pune | 1 | 27/08/2007 | 1998.00 |
| | | | Total Amt. | **1998.00** |
| 19 | N. P. Agencies, Mumbai | 211 | 01/08/2007 | 22400.00 |
| | | | Total Amt. | **22400.00** |
| 20 | Pharmacea Link, Pune | 11829 | 24/08/2007 | 5100.00 |
| 21 | Pharmacea Link, Pune | 11892 | 30/08/2007 | 584.00 |
| | | | Total Amt. | **5684.00** |
| 22 | R.R. Diagnostics, Dhule | 367 | 25/08/2007 | 4167.00 |
| | | | Total Amt. | **4167.00** |
| 23 | S.P. Distributosr, Pune | 839 | 30/08/2007 | 7576.00 |
| | | | Total Amt. | **7576.00** |
| 24 | Shreeji Agency, Shrirampur | 48 | 30/08/2007 | 3669.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | Total Amt. | 3669.00 |
| 25 | Unique Chemicals, Nashik | 2499 | 06/08/2007 | 1082.00 |
| | | | Total Amt. | 1082.00 |
| 26 | Universal Chemicals, Nashik | 24334 | 23/08/2007 | 900.00 |
| | | | Total Amt. | 900.00 |
| 27 | Vijay Medical Stores,Shirdi. | 193 | 06/08/2007 | 138.00 |
| 28 | Vijay Medical Stores,Shirdi. | 227 | 23/08/2007 | 33.00 |
| 29 | Vijay Medical Stores,Shirdi. | 247 | 31/08/2007 | 232.00 |
| | | | Total Amt. | 403.00 |
| | | | Total Amt. | 227367.00 |

Partywise Bill Summery

| Sr.No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Arihant Agency, Sangamner | 38750.00 |
| 2 | Chintamani Medical & Gen. Stores Shirdi | 302.00 |
| 3 | J.S.P.Surgical, Nashik | 41552.00 |
| 4 | Jaya Enterprises Latur | 3640.00 |
| 5 | Kabra Medicals, Jalgaon | 6925.00 |
| 6 | Kanchan Drugs, Pune. | 32159.00 |
| 7 | Kumar Brothers, Mumbai | 56160.00 |
| 8 | Mahesh Surgical, Pune | 1998.00 |
| 9 | N. P. Agencies, Mumbai | 22400.00 |
| 10 | Pharmacea Link, Pune | 5684.00 |
| 11 | R.R. Diagnostics, Dhule | 4167.00 |
| 12 | S.P. Distributosr, Pune | 7576.00 |
| 13 | Shreeji Agency, Shrirampur | 3669.00 |
| 14 | Unique Chemicals, Nashik | 1082.00 |
| 15 | Universal Chemicals, Nashik | 900.00 |
| 16 | Vijay Medical Stores,Shirdi. | 403.00 |
| | Total Amt. | 227367.00 |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु. २,२७,३६७/- ( रु. दोन लाख सत्ताविस हजार तीनशे सदुसष्ठ मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **वैद्यकीय संचालक यांचे अधिकारातील माहे सप्टेंबर-२००७ मधील तातडीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.७९५** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागात दैनंदिन ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टीसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु. विभागास शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागणारी इंजेक्शन इत्यादी तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारी औषधे जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती व तातडीने खरेदी करणे गरजेचे होते ती संगमनेर, नाशिक, पुणे, लातूर, मुंबई, कोपरगाव, शिर्डी येथून तातडीने खरेदी केलेली आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि. १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालय नव्यानेच चालु झालेले असल्यामुळे व वेगवेगळया विभागात वेळोवेळी नवनवीन तज्ञ डॉक्टर हे हजर होत होते, त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये मागणी केलेल्या औषधांव्यतिरीक्त बरीचशी नविन औषधे संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खरेदी करावी लागतात. (विशेषत: CVTS, CRU, CATHLAB इत्यादी विभाग) अशी वारंवार लागणारी नविन औषधे हि सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथून पुढे तातडीची औषधे खरेदी करण्याचे प्रमाण बरेचशे घटेल.

तसेच सी.आर.यू. व कॅथलॅबमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी लागणारी औषधे आपण पॅकेजमध्ये देत असल्यामुळे ती आपणास तातडीने खरेदी करुन दयावी लागतात. ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लास्टीसाठी रुग्णांची संख्या सतत वाढत असल्यामुळे सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक मागणी अपूरी पडत आहे.

दि. ०९/१०/२००७ रोजी वार्षिक औषधे खरेदीकामी (सन २००७-०८) पुरवठा आदेश देण्यात आलेले असून त्या मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात येत आहे. खालील तपशिलातील नमुद केलेली औषधे वार्षिक मंजुर दराने (२००७-०८) उपलब्ध होणेस काही कालावधी लागणार असल्याने ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. तसेच ज्या औषधांकरीता व क्वचित प्रसंगी तातडीने लागणाऱ्या औषधांसाठी औरंगाबाद, नाशिक, कोपरगाव, पुणे, मुंबई, जळगाव, अहमदनगर, शिर्डी येथील होलसेल विक्रेत्यांकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन नामांकित कंपनीचे दरपत्रक मागवून त्यानुसार

आवश्यकतेप्रमाणे लागणारी औषधे त्यांचेकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

सदरची खरेदी हि माहे सप्टेंबर - २००७ मध्ये वैद्यकिय संचालक यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००७ निर्णय क्र. ३४८ नुसार दरमहा असलेल्या रु.१,००,०००/-चे तरतूदीतून माहे सप्टेंबर मध्ये केलेली आहे. त्यासाठी एकुण रु. ९९,९७३/- इतका खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Devanshi Enterprise, Mumbai | 190 | 19/09/2007 | 3640.00 |
| | | | **Total Amt.** | **3640.00** |
| 2 | Emergent Meditech (I) Pvt. Ltd., Mumbai | 1959 | 13/09/2007 | 5002.00 |
| | | | **Total Amt.** | **5002.00** |
| 3 | J.S.P.Surgical, Nashik | 110 | 10/09/2007 | 6155.00 |
| 4 | J.S.P.Surgical, Nashik | 112 | 17/09/2007 | 4992.00 |
| 5 | J.S.P.Surgical, Nashik | 120 | 28/09/2007 | 1208.00 |
| 6 | J.S.P.Surgical, Nashik | 113 | 17/09/2007 | 7730.00 |
| 7 | J.S.P.Surgical, Nashik | 118 | 19/09/2007 | 3751.00 |
| 8 | J.S.P.Surgical, Nashik | 121 | 25/09/2007 | 3340.00 |
| 9 | J.S.P.Surgical, Nashik | 102 | 05/09/2007 | 6780.00 |
| | | | **Total Amt.** | **33956.00** |
| 10 | Jaya Enterprises, Latur | 569 | 11/09/2007 | 6144.00 |
| | | | **Total Amt.** | **6144.00** |
| 11 | Kalelkar Surgical, Mumbai | 1166 | 19/09/2007 | 540.00 |
| | | | **Total Amt.** | **540.00** |
| 12 | Karwa Agencies, Sangamner | 8183 | 24/09/2007 | 7629.00 |
| 13 | Karwa Agencies, Sangamner | 8558 | 29/09/2007 | 6812.00 |
| | | | **Total Amt.** | **14441.00** |
| 14 | Life Line Surgical, Kopargaon | 546 | 14/09/2007 | 563.00 |
| 15 | Life Line Surgical, Kopargaon | 567 | 24/09/2007 | 2122.00 |
| 16 | Life Line Surgical, Kopargaon | 532 | 07/09/2007 | 1768.00 |
| 17 | Life Line Surgical, Kopargaon | 562 | 20/09/2007 | 642.00 |
| | | | **Total Amt.** | **5095.00** |
| 18 | S.P. Distributors, Pune | 905 | 12/09/2007 | 9826.00 |
| 19 | S.P. Distributors, Pune | 927 | 17/09/2007 | 4830.00 |
| | | | **Total Amt.** | **14656.00** |
| 20 | Shree Enterprises, Pune | 1784 | 28/09/2007 | 6300.00 |
| | | | **Total Amt.** | **6300.00** |
| 21 | Sinocare Surgicals Ltd., Mumbai | 1442 | 23/08/2007 | 9600.00 |
| | | | **Total Amt.** | **9600.00** |
| 22 | Vijay Medical Stores,Shirdi. | 311 | 27/09/2007 | 599.00 |
| | | | **Total Amt.** | **599.00** |
| | | | **Total of all -** | **99973.00** |

## Partywise Bill Summery

| Sr.No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Devanshi Enterprise, Mumbai | 3640.00 |
| 2 | Emergent Meditech (I) Pvt. Ltd., Mumbai | 5002.00 |
| 3 | J.S.P.Surgical, Nashik | 33956.00 |
| 4 | Jaya Enterprises, Latur | 6144.00 |
| 5 | Kalelkar Surgical, Mumbai | 540.00 |
| 6 | Karwa Agencies, Sangamner | 14441.00 |
| 7 | Life Line Surgical, Kopargaon | 5095.00 |
| 8 | S.P. Distributors, Pune | 14656.00 |
| 9 | Shree Enterprises, Pune | 6300.00 |
| 10 | Sinocare Surgicals Ltd., Mumbai | 9600.00 |
| 11 | Vijay Medical Stores,Shirdi. | 599.00 |
| | **Total of all -** | **99973.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु. ९९,९७३/-( रु. नव्यान्नव हजार नऊशे त्रेहात्तर मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **माहे ऑगस्ट-सप्टेबर २००७ मधील आर/सी दराने खरेदी केलेल्या तातडीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत**

**निर्णय क्र.७९६** **(अ)** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागात दैनंदिन अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टीसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु. विभागास शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागणारी इंजेक्शन इत्यादी तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारी औषधे जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती व तातडीने खरेदी करणे गरजेचे होते ती औरंगाबाद, पुणे, मुंबई, अहमदनगर, धूळे येथून तातडीने खरेदी केलेली आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि.१५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालय नव्यानेच चालु  झालेले असल्यामुळे व वेगवेगळया विभागात वेळोवेळी नवनवीन तज्ञ डॉक्टर हे हजर होत होते, त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये मागणी केलेल्या औषधांव्यतिरीक्त बरीचशी नविन औषधे संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खरेदी करावी लागतात. (विशेषत:CVTS, CRU, CATHLAB इत्यादी विभाग) अशी वारंवार लागणारी नविन औषधे हि सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथून पुढे तातडीची औषधे खरेदी करण्याचे प्रमाण बरेचशे घटेल.

तसेच सी.आर.यू. व कॅथलॅबमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी लागणारी औषधे आपण पॅकेजमध्ये देत असल्यामुळे ती आपणास तातडीने खरेदी करुन दयावी लागतात. अॅन्जीओग्राफी व अॅन्जीओप्लास्टीसाठी रुग्णांची संख्या सतत वाढत असल्यामुळे सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक मागणी अपूरी पडत आहे.

माहे सप्टेंबरपासून सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात आलेली आहे. याशिवाय वार्षिक मागणी व्यतिरीक्त वेळोवेळी तातडीने लागणाऱ्या औषधांसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ चे सभेतील निर्णयानुसार होलसेल विक्रेते / नामांकित कंपनीकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यांचे दरपत्रक मागवून त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे लागणारी औषधे खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे व त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे.

खालील तपशिलातील नमुद केलेली औषधे सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यासाठी एकुण रु.६१६५५/- इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी हि माहे ऑगस्ट - २००७ मध्ये केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Centenial Surgical, Mumbai | 508 | 14/08/2007 | 5283.00 |
| | | | **Total Amt.** | **5283.00** |
| 2 | Emergent Meditech (I) Pvt. Ltd., Mumbai | 1697 | 23/08/2007 | 5002.00 |
| | | | **Total Amt.** | **5002.00** |
| 3 | Hansraj Nayar Medical India, Mumbai | 2507 | 22/08/2007 | 15602.00 |
| | | | **Total Amt.** | **15602.00** |
| 4 | Kanchan Drugs, Pune. | 4101 | 17/08/2007 | 2842.00 |
| 5 | Kanchan Drugs, Pune. | 4416 | 29/08/2007 | 8500.00 |
| | | | **Total Amt.** | **11342.00** |
| 6 | Karwa Agencies, Ahmednagar | 6968 | 29/08/2007 | 3885.00 |
| | | | **Total Amt.** | **3885.00** |
| 7 | Pharmacea Link, Pune | 11892 | 30/08/2007 | 1917.00 |
| | | | **Total Amt.** | **1917.00** |
| 8 | R.R. Diagnostics, Dhule | 357 | 23/08/2007 | 600.00 |
| | | | **Total Amt.** | **600.00** |
| 9 | Spandan Biotech, Aurangabad | 353 | 23/08/2007 | 5544.00 |
| 10 | Spandan Biotech, Aurangabad | 366 | 29/08/2007 | 12480.00 |
| | | | **Total Amt.** | **18024.00** |
| | | | **Total Amt.** | **61655.00** |

## Partywise Bill Summery

| Sr.No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Centenial Surgical, Mumbai | 5283.00 |
| 2 | Emergent Meditech (I) Pvt. Ltd., Mumbai | 5002.00 |
| 3 | Hansraj Nayar Medical India, Mumbai | 15602.00 |
| 5 | Kanchan Drugs, Pune. | 11342.00 |
| 6 | Karwa Agencies, Ahmednagar | 3885.00 |
| 7 | Pharmacea Link, Pune | 1917.00 |
| 8 | R.R. Diagnostics, Dhule | 600.00 |
| 10 | Spandan Biotech, Aurangabad | 18024.00 |
| | **Total Amt.** | **61655.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु. ६१६५५/- ( रु. एकसष्ठ हजार सहाशे पंचावन्न मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(ब)** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागात दैनंदिन अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टीसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु. विभागास शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागणारी इंजेक्शन इत्यादी तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारी औषधे जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती व तातडीने खरेदी करणे गरजेचे होते ती पुणे, मुंबई, नाशिक, श्रीरामपूर येथून तातडीने खरेदी केलेली आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि.१५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालय नव्यानेच चालु झालेले असल्यामुळे व वेगवेगळया विभागात वेळोवेळी नवनवीन तज्ञ डॉक्टर हे हजर होत होते, त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये मागणी केलेल्या औषधांव्यतिरीक्त बरीचशी नविन औषधे संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खरेदी करावी लागतात. (विशेषत: CVTS, CRU, CATHLAB इत्यादी विभाग) अशी वारंवार लागणारी नविन औषधे हि सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथून पुढे तातडीची औषधे खरेदी करण्याचे प्रमाण बरेचशे घटेल.

तसेच सी.आर.यू. व कॅथलॅबमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी लागणारी औषधे आपण पॅकेजमध्ये देत असल्यामुळे ती आपणास तातडीने खरेदी करुन दयावी लागतात. अॅन्जीओग्राफी व अॅन्जीओप्लास्टीसाठी रुग्णांची संख्या सतत वाढत असल्यामुळे सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक मागणी अपूरी पडत होती.

माहे सप्टेंबरपासून सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात आलेली आहे. याशिवाय वार्षिक मागणी व्यतिरीक्त वेळोवेळी तातडीने लागणाऱ्या औषधांसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ चे सभेतील निर्णयानुसार होलसेल विक्रेते / नामांकित कंपनीकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यांचे दरपत्रक मागवून त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे लागणारी औषधे खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे व दि.०९/१०/२००७ रोजी वार्षिक पुरवठा खरेदी कामीचे आदेश देण्यात आलेले आहे.

खालील तपशिलातील नमुद केलेली औषधे सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यासाठी एकुण रु. १,६८,७०३/- इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी हि माहे सप्टेंबर - २००७ मध्ये केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Cardio Products, Mumbai | 6379 | 22/09/2007 | 33384.00 |
| | | | **Total Amt.** | **33384.00** |
| 2 | D. Vijay Pharma, Nashik | 2528 | 07/09/2007 | 7488.00 |
| | | | **Total Amt.** | **7488.00** |
| 3 | Kanchan Drugs, Pune. | 5180 | 27/09/2007 | 4472.00 |
| | | | **Total Amt.** | **4472.00** |
| 4 | Mahesh Surgical, Pune | 9891 | 25/09/2007 | 887.00 |
| | | | **Total Amt.** | **887.00** |
| 5 | Pharmacea Link, Pune | 12059 | 07/09/2007 | 2396.00 |
| | | | **Total Amt.** | **2396.00** |
| 6 | Prince Medical & General Stores, Nashik | 187 | 27/09/2007 | 35875.00 |
| 7 | Prince Medical & General Stores, Nashik | 186 | 25/09/2007 | 38125.00 |
| 8 | Prince Medical & General Stores, Nashik | 161 | 07/09/2007 | 38050.00 |
| | | | **Total Amt.** | **112050.00** |
| 9 | Renuka Surgical System, Aurangabad | 169 | 20/09/2007 | 2775.00 |
| | | | **Total Amt.** | **2775.00** |
| 10 | S.P. Distributors, Pune | 930 | 17/09/2007 | 3250.00 |
| | | | **Total Amt.** | **3250.00** |
| 11 | Shree Enterprises, Pune | 1599 | 08/09/2007 | 667.00 |
| 12 | Shree Enterprises, Pune | 1792 | 28/09/2007 | 1334.00 |
| | | | **Total Amt.** | **2001.00** |
| | | | **Total Amt.** | **168703.00** |

## Partywise Bill Summery

| Sr.No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Cardio Products, Mumbai | 33384.00 |
| 2 | D. Vijay Pharma, Nashik | 7488.00 |

| | | |
|---|---|---|
| 3 | Kanchan Drugs, Pune. | 4472.00 |
| 4 | Mahesh Surgical, Pune | 887.00 |
| 5 | Pharmacea Link, Pune | 2396.00 |
| 6 | Prince Medical & General Stores, Nashik | 112050.00 |
| 7 | Renuka Surgical System, Aurangabad | 2775.00 |
| 8 | S.P. Distributors, Pune | 3250.00 |
| 9 | Shree Enterprises, Pune | 2001.00 |
| | Total Amt. | 168703.00 |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु. १,६८,७०३/- ( रु. एक लाख अडुसष्ठ हजार सातशे तीन मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **श्रीसाईबाबा रुग्णालयातील ऑप्थॉल्मीक ओ.टी. विभागासाठी बॉईल्स मशिन खरेदी बाबत**
**निर्णय क्र.७९७** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे Ophthalmic Operation Theater विभागाने डी.पी.क्र.६८७१ दि.०५/०७/२००७ अन्वये बॉईल्स मशिनची एका नगाची मागणी केलेली आहे.

| अ.नं. | तपशील | नग | प्रति नग अंदाजे किंमत | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | Boyles Machine | ०१ | ५०००००.०० | ५०००००.०० |
| | | | **अंदाजे एकूण खर्च** | **५०००००.००** |

श्रीसाईबाबा रुग्णालयातील नविन न्यूरो आय.सी.सी.यु. विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी/ उपकरणे/ खरेदीकामी उपरोक्त बॉईल्स मशिनची मागणी केलेली आहे. त्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेतील मान्यतेनुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरचे खरेदीतील मंजूर दरानुसार उपरोक्त प्रमाणे आणखी एक नग बॉईल्स मशिन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४** **संस्थान कर्मचाऱ्यांना जादा वैद्यकीय बीलांचा परतावा देणे बाबत**
**निर्णय क्र.७९८** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

**अ)**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बबन गंगाधर भडांगे | श्री साईबाबा रुग्णालय | २१८२.०० | २१८२.०० |
| २ | श्री. रामनाथ लक्ष्मण वाकचौरे | श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालय | ९५४.०० | ९५४.०० |
| ३ | श्री. सुजय आनंदराव बाबर | श्री साईबाबा रुग्णालय | ८७३.०० | ८७३.०० |
| ४ | श्रीमती कोचेरील लीली जॉन्स | श्री साईबाबा रुग्णालय | १३२५४.०० | १३२५४.०० |
| ५ | श्री. मधुकर पंढरीनाथ बारसे | के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई | १२९२८.०० | १०६२९.०० |
| ६ | श्री. नवनाथ सिताराम डांगे | श्री साईनाथ रुग्णालय | ७२९६.०० | ७२९६.०० |
| ७ | श्रीमती साधना सोपानराव जाधव | श्री साईबाबा रुग्णालय | १३७५३.०० | १२४०४.०० |
| ८ | श्रीमती रेखा किरण पाटोळे | नोबेल हॉस्टिल ॲण्ड रिसर्च सेंटर, अहमदनगर | ९९९९.०० | ७९९९.०० |
| ९ | श्री. साईनाथ दिलीप जगताप | श्री साईबाबा रुग्णालय | २९९.०० | २९९.०० |
| १० | श्री. शिवाजी इंद्रभान फटांगरे | श्री साईबाबा रुग्णालय | १३१२९.०० | १३०६४.०० |
| ११ | श्री. पी. राधाकृष्णन | नवजीवन ग्लोबल हार्ट सेंटर, मुंबइ | ८०००.०० | ६४००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | डॉ.सौ.आशा श्रीराम पेंडसे | के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई | ९२७५.०० | ९०६७.०० |
| १३ | श्री. किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | १९३.०० | १८९.०० |
| १४ | श्री. संतोष शिवाजी गुंजाळ | श्री साईबाबा रुग्णालय | ६४८१.०० | ६४८१.०० |
| १५ | डॉ. अमर रेड्डी | ग्लोबल हॉस्पिटल, हैद्राबाद | ३२२९५.०० | २४९२०.०० |
| १६ | श्री. दिलीप पुडलिक गाढे | आनंदऋषी हॉस्पिटल, अहमदनगर | १२८८०.०० | ११८६०.०० |
| १७ | श्री. सुरेंद्र दामोधर टिळेकर | श्री साईनाथ रुग्णालय | १०१२१.०० | ९५२४.०० |
| १८ | डॉ. पुनम बाबासाहेब गवळी | | ॲडव्हान्स | ३०००० |
| | | **एकुण रक्कम रु.-** | १५३९१२.०० | १६७३९५.०० |

**(ब)**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. संजय बाबुराव कुलकर्णी | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर पुणे. | १८४८४.०० | १८३८४.०० |
| २ | श्री.राजाराम रोंगाजी नाचनेकर | श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी | ६९९५.०० | ६९९५.०० |
| ३ | श्री. ज्ञानेश्वर दौलतराव लोखंडे | बॉम्बे हॉस्पिटल | २१२७६.०० | २१२७६.०० |
| ४ | डॉ. सौ. आशा श्रीराम पेंडसे | टाटा मेमोरीयल हॉस्पिटल | १०८६३.०० | १०८६३.०० |
| ५ | श्री. सुदाम देवराव कणसे | श्री साईबाबा हॉस्पिटल , शिरडी | १०२६५.०० | १०२६५.०० |
| ६ | श्री बबन गंगाधर भडांग | श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी | ३२७३.०० | ३२७३.०० |
| ७ | श्री महाजन मधुकर जयराम | डॉ.पाटील, डॉ. ढोक मुंबई. | ४२८५.०० | ३४२८.०० |
| ८ | श्री देवदत्त स्टेफन कोळगे | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिरडी | ५८११.०० | ५७११.०० |
| ९ | श्री विठ्ठल शंकर दाभाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिरडी | ८७०१.०० | ८६०२.०० |
| १० | श्री किशोर साहेबराव गवळी | श्री साईनाथ हॉस्पिटल, शिरडी | २८६१.०० | २८६१.०० |
| ११ | श्री. के. यु. तुपे | सुजाता बिर्ला हॉस्पिटल, नाशिक | ३३८०१.०० | ३३८०१.०० |
| १२ | श्रीमती वर्षा लक्ष्मण लांडगे | Century Rayon Hospital Trust, Shahada | ८४८५.०० | ८४८५.०० |
| | | **एकुण रक्कम रु.-** | **१३५१००.००** | **१३३९४४.००** |

तसेच,

**(क)**श्री. वाल्मीक बापूराव धरम यांचे वडील श्री.बापुराव मारुती धरम यांना पॅरालेसिस आजार झाला होता. त्यासाठी त्यांनी सुरुवातीस श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले होते. तदनंतर त्यांनी जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (पुणतांबा) येथे उपचारासाठी दाखल केले होते. श्री.धरम यांनाजीवन आशा केंद्र, पुणतांबा येथे पाठविणेबाबत संस्थानच्या वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेली नाही.

श्री. वाल्मीक बापूराव धरम यांना तेथील उपचारांसाठी रु.४७१६/- इतका खर्च आलेला आहे. सदरचे रुग्णालय हे संस्थानचे मान्य यादीतील नाही. त्यामुळे त्यांना सदरचे बील देय होत नाही. श्री. धरम यांनी दि.१६.०८.२००७ चे अर्जान्वये मा.आ. राधाकृष्ण विखे-पाटील यांचे शिफारस पत्र दिलेले आहे. यापूर्वीच याच रुग्णालयाचे याच आजारासाठी रु.९२०६/- चे बील विशेष बाब म्हणून देण्यात आलेले आहे.

सदरचे बील मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर यांना दाखवून घेण्यात आले होते. सदर बीलावर मा.विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर यांनी मंजूर असा अभिप्राय दिला होता.

श्री.धरम यांना विशेष बाब म्हणून बील द्यावयाचे झाल्यास संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये रु.४७१६/- पैकी ९०% रक्कम रु.४२४४/- मात्र देता येईल.

**(ड)** डॉ. आर.के.कुलकर्णी (वैद्यकिय अधिकारी श्री साईनाथ रुग्णालय) यांचा मुलगा अश्विन कुलकर्णी (वय वर्ष- १२) याला पॅरालेसिस (Bilateral abductor paralysis ) आजार झाला होता.

डॉ. कुलकर्णी यांनी दि.१८.०३.२००७ चे रेफर लेटर (साईनाथ रुग्णालयाचे) अन्वये पुढील उपचारासाठी के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथे जाण्यास सांगीतले होते. के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई मधील डॉ.हितल मारफतीया यांनी Laser arytenoidectomy ची तपासणी करणेस सांगितले होते. के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथे Laser arytenoidectomy ची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे डॉ.हितल मारफतीया यांनी पुढील उपचारासाठी प्रिन्स आली खान हॉस्पिटल, मुंबई येथे दि.२२.०३.२००७ चे पत्रान्वये जाण्यास सांगितले होते. प्रिन्स आली खान हॉस्पिटल, मुंबई मधील डॉ. मोनियार यांनी शस्त्रक्रिया करण्यास सांगितली होती. दि.२४.०३.२००७ रोजी ञ्ची शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया डॉ. मोनियार (स्वित्झर्लंड) यांनी केलेली आहे. या शस्त्रक्रियेसाठी त्यांना

रु.१५१३२/- इतका खर्च आला आहे. डॉ. कुलकर्णी यांनी वैद्यकिय बीलाचा परतावा मिळणेकामी एकूण रु.१५१३२/- चे वैद्यकिय बील सादर केले होते.

सदरचे बील मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर यांना दाखवून घेण्यात आले होते. सदर बीलावर मा.विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर यांनी मंजूर असा अभिप्राय दिला होता.

सदरचे बील मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०७.२००७ मध्ये ठेवण्यात आले होते. दि.२८.०७.२००७ चे इतिवृत्तामध्ये मागणीच्या कॉलममध्ये - व देय कॉलममध्ये रु.१२४०१/- इतकी रक्कम अदा करणेबाबत शिफारस दर्शविलेली होती त्यामुळे त्यांचे अद्याप बील अदा करण्यात आलेले नाही. संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावलीनुसार सादर केलेल्या एकूण बील रु.१५१३२/- पैकी ८०% रक्कम रु.१२१०५.६० इतकी देता येईल.

**(इ)** श्री. एस. व्ही. गमे (कामगार अधिकारी) यांचा मुलगा चि. मिलिंद एस. गमे यास डोळ्याचा त्रास असतांना त्यांनी आपल्या संस्थान मधील डॉ. अजित पाटील यांचे औषधोपचार घेतले. परंतु Lasik Surgery ची सुविधा आपल्याकडे नसल्यामुळे त्यांनी त्यांना साई सूर्य नेत्र सेवा, अहमदनगर येथे पाठविले. तेथील औषधोपचारासाठी त्यांना एकूण रु.२७२०७.०० मात्र इतका खर्च आलेला आहे.

श्री. एस. व्ही. गमे यांनी वैद्यकिय बीलाचा परतावा मिळणेकामी रु.२७२०७.०० मात्रचे बील सादर केले आहे.

श्री. एस. व्ही. गमे यांना वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये एकूण रक्कमेच्या ८०% रक्कम रु.२१७६६.०० मात्र देय होत आहे.

श्री. गमे यांना पुर्ण रक्कमेचा परतावा मिळावा याकरीता त्यांनी मा. विश्वस्त श्री. सुरेश वाबळे व मा. विश्वस्त सौ. सुमित्रा कोते यांचे शिफारस पत्र जोडलेले आहे.

सदरचे बील मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर यांना दाखवून घेण्यात आले होते. सदर बीलावर मा.विश्वस्त डॉ.ए.भा. गोंदकर यांनी मंजूर असा अभिप्राय दिला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे वैद्यकीय बीलाचा रक्कम आदा करण्यात यावी असे ठरले.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री वाल्मीक बापूराव धरम | जीवन आशा केंद्र,पुणतांबा | ४,७१६.०० | ४,२४४.०० |
| ०२ | डॉ.आर.के.कुलकर्णी | प्रिन्स अली खान हॉस्पिटल,मुंबई | १५,१३२.०० | १२,१०५.६० |
| ०३ | श्री एस.व्ही.गमे | साई सुर्य नेत्र सेवा,अहमदनगर | २७,२०७.०० | २१,७६६.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५** **साईट इंजिनिअरबाबत.**
**निर्णय क्र.७९९** श्रीसाईबाबा व साईनाथ हॉस्पिटलमधील सर्व विभागात उपलब्धतेनुसार विभागवार मागणीप्रमाणे संगणक पुरविण्यात आलेले आहेत हे सर्व संगणक संगणकीय जाळयाने एकमेकांशी जोडलेले असुन साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व संगणकांवर संगणकीय प्रणाली दि. ५ सप्टें. २००७ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे व भविष्यात साईनाथ रुग्णालयातही करावी लागणार आहे.

उपरोक्त कामी संगणकीय साहित्य अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. मुंबई यांचेव्दारे खरेदी करण्यात आलेले असून त्यामध्ये १११ आयबीएम संगणक, ४ आयबीएम सर्व्हर, ३० प्रिंटर्स, २ लेयर थ्री स्वीचेस, १४ लेयर टू स्वीचेस, १२५ लहान एपीसी युपीएस, २ मोठे एपीसी युपीएस इ. संगणकीय साहित्याची किंमत रक्कम रू. १ कोटी १८ लाख इतकी आहे.

कंपनीच्या करारानुसार त्यांचे मार्फत एक साईट इंजिनियर मेंटेनन्सकरीता आपणाकडे १८ महीन्यांकरीता देण्यात आलेला आहे. त्याचा कालावधी दिनांक ३१/१०/२००७ रोजी संपत आहे. त्यापुढील १८ महीन्यांकरीता सदर इंजिनियरला मुदत वाढ मिळणे वरील संगणकीय साहित्याचा ३ वर्षाचा वॉरंटी पिरियड संपेपावेतो गरजेचे आहे.

श्रीसाईबाबा व साईनाथ हॉस्पिटलमधील उपरोक्त संगणक साहित्याचा वापर होत आहे. त्यामुळे संगणक बंद होणे, युपीएस बॅटरी डिस्चार्ज होणे, संगणकीय जाळयात बिघाड होणे, प्रिंटर्स बंद पडणे असे तांत्रिक बिघाड होत आहेत. हया सर्व बाबींचा विचार करता सर्व साहित्य वॉरंटीमध्ये असल्यामुळे सदर कंपनीचा इंजिनियर मेंटेनन्ससाठी येथे उपलब्ध असणे गरजेचे व फायदयाचे आहे.

आयटी विभागाकडील दि. ६/१०/२००७ चे पत्रानुसार अलाईड डिजिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लि. मुंबई यांचेकडे पुढील १८ महीन्यांकरीता म्हणजेच वारंटी पिरीयड इतकी इंजिनियरची मागणी केली असता सदर कंपनीने प्रति महीना १५०००.०० (पंधरा हजार मात्र) रूपयांचे म्हणजेच १८ महीन्यांकरीता २७००००.०० (दोन लाख सत्तर हजार मात्र) खर्च वेगळा लागणार असल्याचे संदर्भीय पत्रा अन्वये कळविले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता सध्या उपलब्ध इंजिनियरचा दि. ३१/१०/२००७ रोजी संपणारा कालावधी पुढील १८ महीन्यांसाठी वाढविणे गरजेचे आहे. जेणेकरून सदर सर्व संगणकीय साहित्याची जबाबदारी कंपनीकडे सोपविता येऊ शकेल. कारण कॉन्ट्रॅक्टमध्ये उपरोक्त संगणकीय साहित्याचा वॉरंटी पिरीयड ३ वर्षे मुदतीचा आहे. या कारणास्तव सदर कंपनीच्या इंजिनियरची मुदत ही ३ वर्षापर्यंत असावयास हवी होती, मात्र प्रत्यक्ष करारनाम्यांत ती १८ महिने मुदतीचीच आहे.

तरी उपरोक्त कंपनीचा साईट इंजिनियर पुढील १८ महिने मुदतीपर्यंत म्हणजेच कंपनीच्या वॉरंटी पिरीयड पावेतो ठेवणेबाबत योग्य तो आदेश व्हावा, कारण सदर कालावधी ३ वर्षे मुदतीचा असूनही साईट इंजिनियर हा फक्त १८ महीने पर्यंत ठेवणेचा उल्लेख करारात आहे.

तरी उपरोक्त इंजिनियरचे पुढील १८ महीने मुदतवाढीबाबत व त्या कामी कंपनीने कळविलेनुसार येणारे रक्कम रुपये २,७०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६** **न्युरो ओ.टी.करिता धुलाई मशिन खरेदीबाबत.**
**निर्णय क्र.८००** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये न्युरो ओ.टी. लवकरच सुरु होणार आहे. सदर ओ.टी.करीता दिनांक २६/०७/२००७ चे मंजुर टिपणी अन्वये एकूण १० के.जी. क्षमतेचे आय.बी.एम./ एल. जी. फ्रन्ट लोडींग असलेले १ नग धुलाई मशिन खरेदी करणेकामी रु २४,०००/- (चोवीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

परंतु खरेदी विभागाने त्यांचे दि.०४/०८/२००७ च्या टिपणी अन्वये त्यांनी कळविले आहे की, १० के.जी. क्षमतेचे मशिन बाजारात उपलब्ध नाही मात्र चौकशी केली असता मार्केटमध्ये ७ के.जी. क्षमतेचे मशिन उपलब्ध असून त्या मशिनकरीता एकुण रु. ३०,०००/- पर्यंत खर्च कळविला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे ७ के.जी. क्षमतेचे मशिन कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.३२,०००मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **श्रीमती सिंधूबाई पुंडलिक बढे यांना वैद्यकीय मदत देणे बाबत**
**निर्णय क्र.८०१** सदरहू विषयवरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** **श्री साईबाबा रुग्णालयातील सर्व्हर रुमकरीता A/C खरेदी बाबत**
**निर्णय क्र.८०२** श्रीसाईबाबा रुग्णालयात सॉफ्टस्क्रिप्ट कंपनीची सॉफ्टवेअर प्रणाली घेण्यात आली असून ती रुग्णालयामध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीसाठी असलेले सर्व्हर हे सर्व्हर रुम मध्ये बसविण्यात आलेले असून सदरचे सर्व्हर हे थंड खोली (Cold Room) मध्ये ठेवावे लागते. जेणेकरुन संगणक प्रणाली व्यवस्थित काम देऊ शकेल. सध्या सदर सर्व्हर रुम मध्ये एक A/C आहे, परंतु सदरचा A/C वारंवार बंद पडतो, त्यामुळे सर्व्हर रुममध्ये असलेल्या मशिनरी खराब होण्याची शक्यता आहे त्यामुळे रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने विद्युत विभागाकडे एक २ टनी वॉल माऊंट A/C बसवून मिळणे बाबत दि.३१/१०/२००७ व दि.१९/१०/२००७ चे पत्रान्वये मागणी केलेली होती.

त्यावर विद्युत विभाग प्रमुख यांनी वॉल माऊंट A/C शिल्लक नसल्यामुळे सदरचा A/C संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करावा असे कळविले आहे.

सदरहू A/C खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये ३२,०००/- खर्च अपेक्षित असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे आवश्यक असणारे वॉल माऊंट A/C कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.३२०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **Light weight Lead gown खरेदी बाबत**
**निर्णय क्र.८०३** श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाने डि.पी.क्रमांक ४१२२ दि.२३/०७/२००७ अन्वये ५ नग व Cath Lab विभागाने डि.पी.क्रमांक ३२६७ दि.०२/११/२००७ अन्वये ६ नग असे एकूण ११ नग Light Weight Lead gown ची मागणी केलेली आहे.

सदरचे १ नग Gown खरेदीकामी अंदाजे रु.३,०००/- प्रमाणे ११ नगांसाठी अंदाजे रु.३३,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयाचे विविध वार्ड / विभागाची मागणी एकत्र करुन त्यामध्ये काही सर्जिकल साहित्य, फर्निचर तसेच Light Weight Lead gown इत्यादी ची मागणी केलेली

आहे. त्यासाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेतील मान्यतेनुसार कोटेशन मागविण्यात आलेले आहेत. सदर खरेदीचे वेळी त्यातील मंजुर दरानुसार उपरोक्त Light Weight Lead gown खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **Protection Goggle खरेदीबाबत**
**निर्णय क्र.८०४** श्रीसाईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाने डि.पी.क्रमांक ४१२० दि.२३/०७/२००७ अन्वये ६ नग Cerebral Angiography Protection Goggle ची मागणी केलेली आहे.

Cerebral Angiography करतांना जे Radiations बाहेर पडतात त्यामुळे होणाऱ्या संभाव्य त्रासापासून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सदरचे Goggle वापरले जातात.

सदरचे १ नग Imported Protection Goggle खरेदीकामी अंदाजे रु.८२२१.२० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे ६ नग Imported Cerebral Angiography Protection Goggle कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४९,३२७.२० च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **ब्लड बँकेमध्ये रक्तदात्यांचे (Blood Donar) रक्त घेण्यासाठी Donar Coach खरेदी बाबत**
**निर्णय क्र.८०५** श्री साईबाबा रुग्णालयातील ब्लड बँकेमध्ये Donar Coach २ नगांची मागणी केलेली आहे. सदरच्या Donar Coach मुळे रक्त दात्यास व्यवस्थित बसवून झोपून रक्त देता येते. जेणेकरुन रक्त दात्यास/ रक्त काढणारे तंत्रज्ञ/डॉक्टर्स यांना त्रास होत नाही. तसेच अन्न व औषध विभाग यांनी देखील ब्लड बँकेमध्ये Donar Coach ठेवण्याबाबत कळविलेले आहे.

तेंव्हा ब्लड बँक विभागाने त्यांचे डि.पी.क्रमांक २६८७ दि.२४/०८/२००७ अन्वये दोन नगांची मागणी केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रु.२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे २ नग Donar Coach कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,००,०००/- च खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२२** **RA-५० सेमी ऑटो ॲनालायझर मशिनचे फिल्टर व्हिल ॲसेंब्ली बदलणेबाबत**
**निर्णय क्र.८०६** श्रीसाईनाथ रुग्णालयातील पॅथोलॉजी विभागात रुग्णांचे रक्त, लघवी इ. तपासणे कामी मे.बायर हेल्थकेअर,मुंबई या कंपनीकडुन RA-५० सेमी ऑटोॲनालायझर मशिन सन १९९३ साली एकुण रु.२,१८,०००/-इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे.

सदर मशिनचे कंपनीकडे दुरुस्ती देखभाली करीता दरवर्षी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत असते. यावर्षी दि.०१/०९/०७ ते दि.३१/०८/०८ या कालावधीकरीता मा.व्य.समितीच्या दि.२२/०९/२००७ च्या सभेतील विषय क्र. २५(ब) अन्वये एकुण रु.१६,८५४/- इतकी रक्कम कंपनीस देउन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या कालावधीत दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलुन देणार आहे.परंतु वापरुन वापरुन खराब होणारे स्पेअर पार्ट उदा.टयुबींग सेट, प्रिंटर हेड, फ्लो-सेल, फिल्टर व्हिल ॲसेंब्ली, की बोर्ड इत्यादी.संस्थानला खरेदी करावे लागणार आहेत.

दि.२६/०७/२००७ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात कंपनीचे इंजिनीअर त्यांचे नियमीत भेटी करीता आले असता त्यांनी सदर मशिनचे फिल्टर व्हिल ॲसेंब्ली खराब झाले असल्यामुळे बदलणे आवश्यक आहे असे सांगितले आहे. सदरची फिल्टर व्हिल ॲसेंब्ली खराब झाल्यामुळे RA-५० सेमी ऑटोॲनालायझर मशिनवर केल्या जाणा-या विविध टेस्टच्या रिझल्टमध्ये फरक पडत आहे.सदरच्या चुकीच्या रिझल्टवर अवलंबून पेशंटवर उपचार करणे शक्य नाही.त्यामुळे सदरचे फिल्टर व्हिल ॲसेंब्ली तातडीने बदलणे आवश्यक आहे. मे.बायर डायग्नॉस्टीक (इं) प्रा.ली.बरोडा ही कंपनी सध्या मे. सिमेन्स मेडीकल सोल्युशन्स डायग्नॉस्टीक ली.बरोडा कंपनीत विलीन झाल्यामुळे कंपनीने त्यांचे त्यांचे पत्र क्र. FSR १३०७ दि.१४/१०/२००७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr.No. | Part Description | Part No. | Cost in Rs. Including all Taxes | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Filter Wheel Assembly | XBD 656882 | 29,210.00 | 29,210.00 |
| (Rs. Twenty nine thousand two hundred and ten only) | | | | |

वरीलप्रमाणे मे.सिमेन्स मेडीकल सोल्युशन्स डायग्नॉस्टीक ली.बरोडा यांचेकडुन फिल्टर व्हिल ॲसेंब्ली बदलून घेणेकामी एकुण रु २९,२१०/-(अक्षरी रु.एकोणतीस हजार दोनशे दहा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. वरील एकुण रकमेची कंपनीने आगाऊ मागणी केली आहे.

तरी RA-५० सेमी ऑटोॲनालायझर मशिनचे फिल्टर व्हिल ॲसेंब्ली मे.सिमेन्स मेडीकल सोल्युशन्स डायग्नॉस्टीक ली.बरोडा यांचेकडून बदलुन घेणेस व सदरच्या दुरुस्तीसाठी येणा-या एकुण रु. २९,२१०/- च्या खर्चास आणि कंपनीस एकुण रु. २९,२१०/- इतकी रक्कम आगाउ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२३** **पेशंटचे ड्रेस व बेडशिट/पिलोकव्हर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८०७** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये येणा-या पेशंटच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे त्यामुळे लिनन विभागात उपलब्ध असणारे पेशंटचे ड्रेस सध्या अपुरे पडत आहेत. हॉस्पिटल सुरु झालेपासून मेल पेशंटकरीता २६२ व फिमेल पेशंटकरीता १७३ असे एकूण ४३५ ड्रेस शिवून घेतले आहेत. परंतु सध्या पेशंटच्या संख्येत वाढ होत असल्याने तसेच कपडे लॉन्ड्रीस धुण्यास गेल्यावर लवकर मिळत नसल्याने शिल्लक कपडे फार अपुरे पडत आहेत. त्यास पुढील काही कारणे आहेत.

**अ)** हॉस्पिटल सुरु झालेपासुन अजून वापरुन जीर्ण झालेले कपडे कंडम केले नव्हते, सध्या वॉर्डातील फाटलेले बरेचशे जुने कपडे कंडम केले आहे.

**ब)** हॉस्पिटलमधील मेल वॉर्ड, फिमेल वॉर्ड तसेच आय.सी.यु/ जी.आय.सी.यू तसेच स्पेशल/डिलक्स रुम, तसेच सेमी-१,सेमी-२या विभागांकरीता वेगळया कलरचे (चेक्सचे) पेशंटचे ड्रेस आवश्यक आहेत. सर्व वॉर्डमधील एकूण बेडची संख्या पाहता एकूण ७८० नग पेशंटचे ड्रेस खरेदी करणे आवश्यक आहेत.

**क)** सर्व वॉर्डसाठी वेगवेगळ्या कलरचे बेडशीट व पिलोकव्हर्सही खरेदी करणे आवश्यक आहेत. हॉस्पिटल चालु होताना सुरवातीला एकूण ५७५ नग बेडशीट व ६०० नग पिलोकव्हर्स शिवून घेतले होते. परंतु सध्या जुने झालेले बेडशीट कंडम केले आहेत. त्यामुळे नवीन ११०० नग बेडशीट प्रत्येक वॉर्डकरीता वेगवेगळ्या रंगाचे व ३०० नग पिलोकव्हर्स खरेदी करणे आवश्यक झाले आहे.

उपरोक्त खरेदीकरीता साधारणत: रु. ३,५०,०००/- (अक्षरी रु. तीन लाख पन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे, तरी खालीलप्रमाणे पेशंटचे ड्रेस व बेडशीट/ पिलोकव्हर्स हॉस्पिटलचे मेडीकल स्टोअर विभागाकडून विहीत पध्दतीने खरेदी करुन मिळावेत तसेच सदरची खरेदी ज्यांचे कपडे उच्च दर्जाचे असतील अशा डिलर्स कडून अथवा बन्सल ट्रेडींग कंपनी,भोपाळ यांचेकडून (त्यांचेकडील मालाचा उच्च दर्जा पाहता) खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | कपडयांचा तपशील | साईज | आवश्यक नग | प्रत्येकी किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेशंटचे ड्रेस | Std. | ७८० नग | २२५/- | १,७५,५००/- |
| २ | बेडशीट (Coloured) | 60”x90” | ११०० नग | १२०/- | १,३२,०००/- |
| ३ | पिलोकव्हर (Coloured) | Std. | ३०० नग | ३०/- | ९,०००/- |
| | | | | रुपये | ३,१६,५००/- |
| | | | | अंदाजे रुपये | ३,५०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पेशंटकरीता आवश्यक असणारे ड्रेस व बेडशिट/पिलो कव्हर विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलकरीता १६ ट्युबचे सेंट्रीफ्यूज मशिन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.८०८** श्रीसाईबाबा रुग्णालयाच्या प्रयोगशाळा विभागात विविध प्रकारच्या रक्त लघवीच्या तपासण्या करणे कामी सध्या आपल्याकडे ४ ट्युबचे छोटे सेंट्रीफ्यूज मशिन आहे. परंतु रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढल्यामुळे तपासण्याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. तसेच रक्त लघवीचे रिपोर्ट रुग्णास लवकरात लवकर मिळणेकामी अजून एक १६ ट्यूबचे सेंट्रीफ्यूज मशिन मिळणे बाबत श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाने मागणी केलेली आहे. सदरचे सेंट्रीफ्यूज मशिन खरेदीकामी अंदाजे रु.१,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तप्रमाणे सेंट्रीफ्यूज मशिन विहित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५** **कर्करोग जनजागृती व निदान शिबीर आयोजन करणे बाबत**

**निर्णय क्र.८०९** श्रध्दा फाऊंडेशन, मुंबई यांनी श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये कर्करोग जनजागृती व निदान शिबीर आयोजित करणे बाबतचे पत्र इकडील कार्यालयासह दि १/१०/०७ रोजी आवक नं २१८० नुसार प्राप्त झाले आहे.

सदर पत्रामध्ये श्रध्दा फाऊंडेशन, मुंबई यांनी असे नमूद केले आहे की, आमच्या संस्थेमार्फत कर्करोग जनजागृती व निदान केले जाते असे कार्यक्रम मुख्यत: मुंबई व ओरीसा या ठिकाणी चालू असतात आम्ही विविध ठिकाणी कर्करोग जनजागृती व डॉक्टर्स यांना आमंत्रित करतो त्यांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळतो.

आमच्या माहितीप्रमाणे आपले संस्थान मार्फत शिबीरांचे आयोजन केले जाते. अशा प्रकारच्या सर्व कार्यक्रमांना कोणत्याही प्रकारची मदत करणेस आम्ही केव्हाही तत्पर राहू आमच्या संस्थेचे सदस्य श्री प्रकाश पोतनीस हे समक्ष भेटून याबाबत चर्चा करणार आहेतच.

श्री पोतनीस यांनी दि १५/१२/०७ रोजी जनजागृती कार्यक्रम व दि १६/१२/०७ रोजी कर्कराग निदान कार्यक्रम आयोजित करण्याचे सुचविले आहे.

१) याकामी डॉक्टर्स स्टाफ व इतर कर्मचारी असे एकुण २५ लोकांची राहणेची व जेवणाची व्यवस्था व्हावी.

२) कर्करोग जनजागृती व निदानाकरीता एक हॉल व किमान ५ रूमची आवश्यकता लागणार आहे.

३) मेडिकल व्हॅनचा खर्च रूपये २०,०००/- कळविला असून यातील ५०% खर्च श्रध्दा फाऊंडेशन करणार आहे.

उपरोक्त शिबीर आयोजित करणे झाल्यास खालीलप्रमाणे व्यवस्था करावी लागणार आहे.

१) हँडविल्स, बॅनर्स इत्यादी छपाई व वितरण मार्केटींग मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे मार्फत करावी लागणार असून त्याकरिता अंदाजे रूपये १०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

२) बाहेरून येणा-या रूग्ण त्यांचेसोबत आलेल्या प्रत्येकी एक नातेवाईकांच्या चहापाणी, भोजणाची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कँटीन विभाग व प्रसादालय विभागार्माफत तयार करणेकामी रूपये १५,०००/- खर्च अपेक्षित आहे.

३) रूग्ण व नातेवाईकांसाठी मंडप बांधकाम विभागामार्फत तयार करणेकामी रूपये ५०००/- खर्च अपेक्षीत आहे.

४) ध्वनिक्षेपण अथवा गरज पडल्यास दृक-श्रवण यंत्र योजनेबाबत व्यवस्था ध्वनीक्षेपन विभाग व ईडीपी मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेमार्फत करणेकामी रू १५०००/- खर्च अपेक्षीत आहे.

५) बाहेरून येणा-या तज्ञ डॉक्टर्स व इतर महत्वाच्या व्यक्तीसांठी निवास व इतर व्यवस्था चौकशी कार्यालयामार्फत अथवा गरज पडल्यास इतरत्र करावी लागणार आहे.

६) १०० खुर्च्यांची नवीन भक्तनिवास (५०० रूम) यांचेकडून व्यवस्था असावी.

७) पूजा व आदर सत्कार, इतर सजावट, मंदीरविभाग व वित्त व्यवस्थापक, श्रीसाईबाबा हॉस्पिटल, यांनी करणेकामी अंदाजे रू ५०००/- खर्च अपेक्षीत आहे.

८) इतर महत्वाची औषधे, तपासणीकामी लागणारे साहित्य तथा इतर प्रासंगीत खर्चाकरीता खरेदी मॅनेजर, श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांना अंदाजे रू २०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

९) उपरोक्त कामी विविध विभागांना आवश्यकतेनुसार ज्यादा कंत्राटी कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देणेची जबाबदारी मा कामगार अधिकारी व एच आर मॅनेजर, श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांचेकडे असावी.

१०) उपरोक्तशिवाय इतर महत्वाची कामे संस्थानचे इतर संबंधित विभागांकडून करून घ्यावी लागतील.

११) उपरोक्त खर्चाची बिले मुदतीत संबंधीतांना अदा करण्याची जबाबदारी वित्त व्यवस्थापक, श्रीसाईबाबा हॉस्पिटल यांचेमार्फत करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे कर्करोग जनजागृती व निदान शिबीराचे आयोजन करणेस व भरती होणा-या रूग्णांचे योग्य ते निदान करणेकामी येणा-या अंदाजे रूपये ७०,०००/- (अक्षरी रूपये सत्तर हजार मात्र) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **नवीन प्रसादालय बगीचा करीता पाणीपुरवठा करणेकामी मटेरिअल खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.८१०** नविन प्रसादालय इमारतीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सदरचे ठिकाणी बगीचा विभागामार्फत विविध प्रकारची शोभेची झाडे लावण्यात आलेली आहे. सदरच्या बगीच्याकरीता सध्या पाणी देणेसाठी सोय नसल्याने बगीचा विभागाने डी.पी. नंबर ५८३६, दिनांक ३०/१०/२००७ नुसार पाणी पुरवठा करणेसाठी पाईप लाईन टाकून देणेबाबत मागणी केलेली आहे. सदरचे ठिकाणी जावून प्रत्यक्ष पाहणी केली असता पाईप लाईन टाकणेसाठी खालील प्रमाणे मटेरीयल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | कंपनी | साईज | आवश्यक मटेरियल | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | जी.आय पाईप-बी-क्लास | प्रकाश-सुर्या कंपनी | ३/४" | ६०० फूट | ३१/- प्रती फूट | १८,६००.०० |
| ०२. | पट्टी व्हॉल | लिडर कंपनी | ३/४" | ३५ नग | ६००/-प्रती नग | २१,०००.०० |
| ०३. | पी.व्ही.सी. पाईप | फिनोलेक्स कंपनी | ३" | ३५०० फूट | २०/- प्रती फूट | ७०,०००.०० |
| ०४. | जी.आय.एल्बो | हेवी | ३/४" | ३०० नग | १२/- प्रती नग | ३,६००.०० |
| ०५. | सर्व्हीस सॅडल | हेवी | ३" x ३/४" | ४० नग | १००/- प्रती नग | ४,०००.०० |
| ०६ | क्लीप पट्टी | हेवी | ४" | ४८ नग | ३.५० प्रती नग | १६८.०० |
| | | | | | **एकूण अंदाजे रुपये** | **१,१७,३६८.००** |
| | | | | | **वॅट - ४%** | **४६९४.७२** |
| | | | | | **एकुण -** | **१,२२,०६२.७२** |
| | | | | | **पुर्णांकित-** | **१,२२,०६३.००** |

सदरचे पाईप लाईन करीता आवश्यक असणारे मटेरीयल सध्या पाणी पुरवठा विभागाकडे शिल्लक नाही. तसेच वार्षिक खरेदी सन २००७-२००८ मधील मटेरीयल पाणी पुरवठा विभागाकरीता वर्षभर मेन्टनंस करीता लागणार आहे. तरी उपरोक्त मटेरीयल खरेदी करुन पाईप लाईन करावी लागेल.

तरी वरील प्रमाणे मटेरीयल मटेरीयल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे १,२२,०६३/-मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **नविन प्रसादालय हौदावर बसविणेसाठी १० एच.पी.मोटार खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.८११** नविन प्रसादालयाचे कामपूर्ण होत आलेले आहे. तेथील पाणी व्यवस्थेकरीता तेथे हौद बांधलेला आहे. त्याकरीता हौदातील पाणी टाकीमध्ये टाकण्यासाठी १० एच.पी. च्या ०२ नग मोटारी बसविणे आवश्यक आहे. परंतू नविन प्रसादालयाचे बांधकाम करतांना आर्किटेक यांचेकडून मोटार व स्टार्टरचा अंतर्भाव या कामात केलेला नाही. तेंव्हा सदरचे काम आपल्या विभागाअंतर्गत करावे लागेल त्यासाठी लागणारे मोटारी व स्टार्टर आपलेकडे शिल्लक नसल्याने खालील तपशिल प्रमाणे मोटारी व स्टार्टर खरेदी करावे लागेल.

| अ.नं | तपशिल | मागणी | अंदाजे दर | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | १० H.P. ओपनवेल सबमर्सिबल (हॉरीझेन्टल-आडवी)<br>कंपनी- टेक्स्मो<br>मॉडेल- ASM- १४<br>व्होल्ट - ४४० V<br>३ फेज<br>४ स्टेज<br>हेड- ३० मीटर पर्यंत. | ०२ नग | २८,०००.०० | ५६,०००.०० |
| ०२ | स्टर डेल्टा स्टार्टर<br>ML-१.५<br>रिले- ९-१४<br>कंपनी -L&T<br>(१०H.P.करीता) | ०२ नग | ७,०००.०० | १४,०००.०० |
| | | | **एकूण अंदाजे रुपये-** | **७०,०००.००** |

तरी सदरचे मोटारी व स्टार्टर विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रुपये ७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस राज्यात सन २००५-०६-०७ मध्ये सतत तीन वर्ष 'अ' दर्जा मिळालेबाबत**

**निर्णय क्र.८१२** (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्रातुन दिले जाणारे प्रशिक्षण हे ग्राहकाभिमुख व रोजगाराभिमुख व्हावे, संस्थेत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची गुणवत्ता उच्च दर्जाची रहावी, कारखान्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करता यावा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्रातुन उत्तीर्ण होऊन बाहेर पडणारा विद्यार्थी हा रोजगार व स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनावा या बहुउद्देशाने शासनाने शासन निर्णय क्रमांक आयटीआय/ १०००/ (१८२)/ व्यशि-१, दि.२१.०१.२००१ अन्वये राज्यातील सर्व अशासकिय

औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे गुणवत्तेनुसार अ,ब,क,ड असे वर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार गेल्या ६ वर्षात राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे गुणवत्तेनुसार अ,ब,क,ड असे वर्गीकरण करण्यत येत आहे. या बाबत मा.संचालक (प्रशि) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दोन विशेष अभिनंदन पत्रे पाठवुन संस्थेच्या व्यवस्थापनातील पदाधिकाऱ्यांसह संस्थेशी संबंधित सर्व घटकांचे अभिनंदन केलेले आहे ते पुढीलप्रमाणे.

(अ) सन २००६-०७ या वर्षात राज्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांचे शासनाने ठरवुन दिलेल्या मापदंडानुसार व निकषानुसार त्रिस्तरीय समितीमार्फत निरीक्षण करण्यात आले होते. मला आपणास कळविण्यास आनंद होत आहे की, आपल्या संस्थेतील साधनसामुग्री संस्थेची अंतर्गत व बहिस्थ कार्यक्षमता उत्तम प्रकारची असून विशेष करुन संस्थेने उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना व संस्थेतील उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी मिळवुन देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनविण्याबाबत उत्युत्कृष्ट असे कार्य केलेले आहे. आपल्या संस्थेला एकूण ३०० पैकी २८९ गुण प्राप्त झालेले असून राज्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये आपली संस्था सर्वाधिक गुण प्राप्त करुन प्रथम आलेली आहे व आपल्या संस्थेला अ दर्जा देण्यात आलेला आहे. संस्थेच्या या यशाबाबत मी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापनातील पदाधिकारी, प्राचार्य, गटनिदेशक, निदेशक, अन्य कर्मचारी व प्रशिक्षणार्थ्यांचे हार्दीक अभिनंदन करतो. भविष्यातही आपल्या संस्थेने सतत अशीच गुणवत्ता धारन करुन युवकांना रोजगार व स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनविण्याचे महान कार्य करित रहावे, अशी अपेक्षा करतो.

(ब) त्याचप्रमाणे संदर्भित पत्र क्र.०२ ने आपल्या संस्थेने सन- २००५, २००६ व २००७ या तीन वर्षात सतत अ दर्जा प्राप्त करुन उत्युत्कृष्ट असे कार्य केलेले आहे, असे कळविलेले आहे.

(२) चालू वर्षी जुलै- २००७ मध्ये झालेल्या अखिल भारतीय व्यवसाय परिक्षेचा संस्थेचा सर्वसाधारण निकाल ९९.४६% असा लागला असून परीक्षेला बसलेल्या १८८ प्रशिक्षणार्थ्यांमध्ये १८७ प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण होऊन त्यातील ४९ प्रशिक्षणार्थ्यांनी ८०% अधिक गुण संपादन केलेले आहे. १९८६ नंतर हा संस्थेचा सर्वोच्च निकाल आहे.

आपल्या संस्थेचे मा.व्यवस्थापन मंडळ, मा.कार्यकारी अधिकारी साहेब तसेच मा.प्रशासकिय अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य, त्यांचेकडे असलेला शैक्षणिक संस्थेबाबतचा सकारात्मक दृष्टीकोनामुळे व संस्थेतील माझे सर्व सहकारी यांचे सांघिक कामातुन हे तिहेरी यश संपादन होऊ शकले, असे प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी कळविले आहे.

९९.४६% निकाल, सलग दुसऱ्या वर्षीही राज्यात सर्व प्रथम व सलग तिसऱ्या वर्षीही "अ" दजा प्राप्त झालेची अभिनंदनीय बाब असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय )

**<u>०८.१२.२००७</u>**
**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९** **सोन्यामध्ये रुद्राक्षमाळ बनविणेबाबत.**
**निर्णय क्र.८१३** श्री.टी.जी.रंगनाथ, बेंगलोर या साईभक्तांनी श्री साईबाबांच्या मूर्ती व समाधीला वापरणेकरीता सोन्यात गुंफलेल्या रुद्राक्षाची माळ देणगी दाखल देण्याची इच्छा त्यांच्या दि.०६.०९.२००७ चे पत्राद्वारे प्रदर्शित केली आहे. याकरीता त्यांनी २४ कॅरेटचे ५२१.८२० ग्रॅम एवढया वजनाचे रु.४,६९,६३८/- (रु.चार लक्ष एकोणसत्तर हजार सहाशे अडोतीस) मात्र रकमेचे सोने देणगी पावती क्र.११४, दि.०६.०९.२००७ नुसार लेखाशाखेकडे जमा केले आहे. सदरच्या सोन्यात गुंफण्यात येणाऱ्या दोन रुद्राक्षाची माळ तयार करणेसाठी येणारा मजूरी खर्च ही देण्यास श्री.टी.जी.रंगनाथ हे तयार आहेत.

सध्या शेजारतीचे वेळी मूर्तीला व समाधीला प्रत्येकी एक अशा दोन सोन्यात गुंफलेल्या रुद्राक्षमाळा आवश्यकतेप्रमाणे (मुख्य उत्सवाचे वेळी, श्रावणी सोमवार तसेच स्थानिक उत्सवाचे वेळी) वापरण्यात येतात. सदरच्या रुद्राक्षमाळा पहाटे मंगलस्नानापूर्वी काढून घेण्यात येतात.

देणगीदाराने देणगीदाखल दिलेल्या सोन्यामध्ये नवीन रुद्राक्षमाळ तयार करुन घेणेकामी नाशिक, पुणे, मुंबई येथील जाणकार सराफांकडून माहिती मागविण्यास तसेच याकामी किती सोने लागेल व किती खर्च येईल याची माहिती घेऊन रुद्राक्षमाळ बनविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३०** **सोन्याचा लोटा (तांब्या ) देणगी स्विकारणेबाबत.**

**निर्णय क्र.८१४** श्री.के.गोपी प्रसाद, हैद्राबाद हे श्रीसाईबाबांचे भक्त असून नियमीत शिरडीला येत असतात. त्यांनी श्रीसाईबाबांचे मंगलस्नानासाठी दुधाकरीता वापरण्यात येणाऱ्या चांदीच्या लोटयाऐवजी संपूर्ण सोन्याचा लोटा (तांब्या) तयार करुन देणगी दाखल संस्थानला देणेबाबत इच्छा प्रदर्शित केलेली आहे. यासाठी लागणारे सोने व मजूरी हा सर्व खर्च श्री.के.गोपी प्रसाद हे स्वतः करायला तयार आहेत.

सध्याचे चांदीचा लोटा (तांब्या) हा वजनाने ९४५ ग्रॅम इतके आहे. सध्या हा चांदीचा लोटा वापरात आहे. नुकतेच श्रींचे तीर्थासाठी सोन्याची झारी व आरतीचे वेळी वापरात येणारी सोन्याची लहान तीर्थ झारी देणगी दाखल मिळालेली आहे.

तरी श्री.के.गोपी प्रसाद यांचे विनंतीनुसार मंदिरात रोज श्रींचे स्नानाचे वेळी वापरासाठी ५०० ग्रॅम (अर्धा किलो) वजनाचा सोन्याचा लोटा (तांब्या) देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३१** **श्री व्दारकामाई मंदिरातील पादुकांवर सोन्याचा पत्रा देणगी स्विकारणेबाबत.**

**निर्णय क्र.८१५** श्री.प्रमोद ज्ञानदेव गोंदकर, शिर्डी व श्री.सर्जेराव अशोक कोते, शिर्डी यांनी द्वारकामाई मंदिरातील चांदीचे पादुकांवर सोन्याचा पत्रा देणगीदाखल बसवून देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे व यासाठी लागणारे सोने व मजुरीचा खर्च ते देणगी स्वरुपात देण्यास तयार आहेत.

श्रीद्वारकामाई मंदिरातील पादुकांवर सोन्याचा पत्रा बसावयाचा झाल्यास तो जाड स्वरुपाचा बसविला तर त्याचे आयुष्य दिर्घकाळ टिकेल असे वाटते. सदरचे काम हे नामांकित सोनार यांचेकडून करावे जेणेकरुन कामाचे गुणवत्तेवर नियंत्रण राहील. मात्र द्वारकामाई मंदिरात पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवावी लागेल.

तरी सोन्याच्या पत्रा देणगी दाखल स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३२** **आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषदेसाठी खरेदी करण्यात आलेल्या लेदर बॅग व पारकर पेन यांची विक्री करणेबाबत.**

**निर्णय क्र.८१६** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ ऑगस्ट, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६७४ अन्वये देश विदेशातील देवस्थानांना एका मंचावर आणून त्यांच्या विचारांची एकमेकांत देवाण-घेवाण करण्यासाठी शिर्डी येथे व्दितीय आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद भरविणेचा निर्णय घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन, उपरोक्त संदर्भ क्रमांक ०२ व ०३ नुसार सदर परिषद दिनांक २८ ते ३० एप्रिल, २००७ चे दरम्यान घेण्याचे ठरविण्यात येऊन, देवस्थान परिषद यशस्वीपणे पार पाडणेसाठी समीट को-ऑर्डिनेशन कमीटी नेमणे, त्यांचे मानधन व परिषदेसाठी येणाऱ्या अंदाजे रुपये २५,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

शिर्डी येथे भरविण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषदेसाठी येणाऱ्या देश विदेशातील विविध देवस्थानांचे मान्यवरांना संस्थानतर्फे प्रत्येकी एक लेदरबॅग, पारकर पेन भेट स्वरुपात देण्याचे ठरले होते. त्यानुसार, समीट को-ऑर्डिनेशन कमिटीकडून (श्री नाडकर्णी ग्रुप) मुंबई यांनी न्यूनतम दरपत्रकधारक झिंक लेदर फॅशन हाऊस, मुंबई यांचेकडून खालील तपशिलाप्रमाणे लेदर बॅग व पारकर पेन खरेदी केलेले आहेत.

**अ) लेदर बॅग खरेदी बिलाचा तपशील-**

| अ.नं. | बिल क्रमांक व दिनांक | तपशील | नग | दर | | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | २०७/ २८.०४.०७ | मिडीयम क्वॉलीटी लेदर बॅग | ४०० | ६०० | ०० | २,४०,००० | ०० |
| ०२. | | हाय क्वॉलीटी लेदर बॅग | १०० | ८५० | ०० | ८५,००० | ०० |
| | | | टॅक्स | १२.५ % | | ४०,६२५ | ०० |
| | | | | | **एकूण** | **३,६५,६२५** | **००** |

**ब) मार्कर पेन खरेदी बिलाचा तपशील-**

| अ.नं. | बिल क्रमांक व दिनांक | तपशील | नग | दर | | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | २०२ दिनांक २०.०४.०७ | पारकर कंपनीचे पेन | ५०० | ६८ | ०० | ३४,००० | ०० |
| | | | | | **एकूण** | **३४,०००** | **००** |

उपरोक्त "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे एका मिडीयम क्वॉलीटी लेदर बॅगची टॅक्ससह किंमत रुपये ६७५/- इतकी आहे. तसेच एका हाय क्वॉलीटी लेदर बॅगची टॅक्ससह किंमत रुपये ९५६.२५ इतकी आहे.

उपरोक्त **"अ"** व **"ब"**प्रमाणे साहित्य हे शिर्डी येथे भरविण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषदेसाठी येणाऱ्या देश विदेशातील विविध देवस्थानांचे मान्यवरांना संस्थानतर्फे देणेसाठी खरेदी करण्यात आलेले होते. परंतु, शिर्डी येथे भरविण्यात येणारी व्दितीय आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद भरविण्याचे काही अपरिहार्य कारणास्तव तहकुब करण्यात आलेले आहे.

देवस्थान परिषद तहकुब झाल्याने, भेटवस्तू देणेसाठी खरेदी करण्यात आलेले लेदर बॅग व पारकर पेन माहिती तंत्रज्ञान विभागाचे स्टोअरमध्ये ठेवण्यात आलेले आहे.पारकर पेन हे जादा दिवस ठेवल्यास त्यातील शाई वाळून पेन निरुपयोगी होतील. तसेच लेदर बॅग जादा दिवस एका जागेवर राहून लेदर व चेन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याकरीता आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषदेसाठी खरेदी करण्यात आलेल्या लेदर बॅग व पारकर पेन यांची योग्य किंमत ठरवून, "ना नफा ना तोटा" या तत्वावर कापडकोठी विभागामार्फत श्री साईभक्तांना विक्री करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन खरेदी किंमतीस उपरोक्त वस्तुंची विक्री करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३३** **संगणकाकरिता एन्टी व्हायरस अपडेट करणेबाबत.**
**निर्णय क्र.८१७** श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये सर्व विभागात आवश्यकतेनुसार व मागणीनुसार संगणक पुरविण्यात आलेले आहे. सदर संगणकाकरीता वरील संदर्भान्वये आयटी विभागामार्फत P.O. No. SSST/WS/IT-HMS/१८२०/२००६ Dt ९th Feb २००६. रोजी १ वर्षाकरीता सदर ट्रेन्ड मायक्रो एन्टी व्हायरस (१०० युजर करीता) पॅकेज खरेदी करण्यात आले होते, सदर पॅकेजची मुदत ही ३१/०७/२००७ रोजी अखेर संपुष्टात आली, परंतु सदर ट्रेन्ड मायक्रो एन्टी व्हायरस पॅकेज आपणांस पुन्हा १०० युजरकरीता अप डेट करणे अत्यावश्यक आहे, की जेणे करुन संगणकामधील व्हायरस निर्माण होणार नाही. तसेच ऑनलाईन करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीचा (HMS Software) स्टोअर केलेला डाटा सुरक्षित रहाण्यास मदत होईल.

उपरोक्तकामी सदर एन्टी व्हायरस पॅकेज संबंधीत कंपनीशी संपर्क साधला असता. १०० युजरकरीता ट्रेन्ड मायक्रो एन्टी व्हायरस ३ वर्षाकरीता अप डेट करणेकामी कंपनीने खाली दर्शविलेल्याबाबीचां उल्लेख केलेला आहे.

१) Officescan Enterprise Edition - Client and Server
२) Media CD.
३)Installations & Implementation Charges.

उपरोक्तकामी कंपनीने ३ वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु.३,५०,०००/- खर्च अपेक्षित असल्याचे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संगणकाकरिता ट्रेन्ड मायक्रो एन्टी व्हायरस पॅकेज अपडेट करणेकामी कोटेशन्स मागविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३४** **जुनी मेल्ट्रॉन कंपनीची अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस ट्रेनिंगसाठी देणे बाबत**
**निर्णय क्र.८१८** **(अ)**श्रीसाईबाबा संस्थानचे सर्व विभाग व इतर परिसर एकमेंकाशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेअंतर्गत जोडणेकामी सन १९९२ मध्ये मेल्ट्रॉन या कंपनीची २५६ पोर्ट क्षमता असलेली सी डॉट तंत्रज्ञानावर आधारीत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा (EPABX SYSTEM), महाराष्ट्र शासनाची अंगीकृत कंपनी मे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई (MELTRON ) यांचेकडून उपलब्ध करविण्यात आलेली होती.

या चालू स्थितीतील अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेविषयीचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | खरेदी व कार्यान्वीत केल्याची तारीख | :- | दिनांक ३१ मार्च, १९९२. |
| ०२. | यंत्रणेचे तंत्रज्ञान | :- | सी-डॉट तंत्रज्ञान |
| ०३. | यंत्रणेची पूर्ण क्षमता | :- | २५६ पोर्टस् |
| ०४. | दूरध्वनी यंत्रणेची मालमत्ता नोंद वहीला नोंद असलेली मूळ किंमत (Basic price of EPABX System excluding Cables & Telephone Instruments) | :- | रुपये १४,६६,०५३.४६ |

**(ब)** संस्थानचा वाढता व्याप व परिसर विकास, तसेच तंत्रज्ञानात झालेले मोठ्या प्रमाणावरील फेरबदल लक्षात घेऊन मा.विश्वस्त मंडळाच्या दिनांक २५-२६ ऑक्टोबर, २००१ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ५१६ नुसार नविन दुरध्वनी यंत्रणा कार्यान्वीत करणेसाठी तत्वतः मान्यता देण्यात आली. त्यानंतर, या अनुषंगाने मा.विश्वस्त मंडळाच्या दिनांक ४ जानेवारी, २००४ निर्णय क्रमांक २४ व दिनांक २९-३१ मार्च, २००४ निर्णय क्रमांक १७९ नुसार सभेत झालेल्या निर्णयांन्वये मे. सिमेन्स लिमिटेड, मुंबई यांना माहे एप्रिल,२००४ मध्ये अद्ययावत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा पुरविणेबाबत कार्यादेश पारित करणेत आला, व अखेरीस माहे ऑगष्ट, २००४ मध्ये मे.सिमेन्स इंडिया लि., मुंबई यांचेकडून २००० एक्सटेंशन्सच्या क्षमतेची डिजीटल तंत्रज्ञानाधारीत व अद्ययावत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे, उपरोक्त 'परिच्छेद अ' मध्ये निर्देशीत करणेत आलेली जुनी मेल्ट्रॉन कंपनीची अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा आता विनावापर माहिती तंत्रज्ञान विभागाकडे पडून आहे.

**(क)** या जुन्या यंत्रणेची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने ही यंत्रणा एखादी कंपनी / संस्थेकडून योग्य त्या वाजवी किंमतीस पुर्नःखरेदी करणेविषयी जा.क्र.एसएसएस-वशी-आयटी-११४१७-०४ दिनांक ०५ नोव्हेंबर, २००४ अन्वये एकूण ०७ कंपन्या / दूरध्वनी यंत्रणेचे विक्रेते यांना पत्र पाठवून, या यंत्रणेची पुर्नःखरेदी किंमत देणेबाबत सुचविणेत आलेले होते. त्यानुसार फक्त ०२ संस्थांनीच याबाबत उत्सुकता दर्शविली.

या संस्थांनी पुढीलप्रमाणे पुर्नःखरेदी प्रस्ताव सादर केलेले आहेत -

| | | |
|---|---|---|
| ०१. | Prelude Netcomms, Mumbai | रु. १६,०००/- |
| ०२. | Hi-tech Enterprises, Aurangabad | रु.१०,०००/- |

उपरोक्त दोन्ही संस्थांनी कळविलेल्या किंमती या अत्यंत अल्प असून, विचारात घेण्यायोग्य नाहीत, असे नम्र मत आहे.

उपरोक्त मेल्ट्रॉन कंपनीची दूरध्वनी यंत्रणा सी डॉट तंत्रज्ञानावर आधारीत असल्याने, ती कालबाह्य झालेली आहे. या यंत्रणेचे नव्याने उत्पादन बंद झालेले असून, सध्या यंत्रणेचे दुरुस्ती व देखभालीसाठीसुध्दा कोणत्याच प्रकारचे स्पेअर्स पार्टस सुध्दा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ही यंत्रणा कोणतीही संस्था अगर कंपनी योग्य बाजारभावात पुर्नःखरेदी करेल, असे वाटत नाही.

**(ड)** सदर यंत्रणेबाबत आयटीआय प्राचार्य श्री पटणे सर यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी सदर दूरध्वनी यंत्रणा ही संस्थानचे आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रेनिंगसाठी वापरता येईल, असे सुचविलेले आहे. सदर दूरध्वनी यंत्रणा कोणतीही संस्था अगर कंपनी योग्य बाजारभावात पुर्नःखरेदी करण्यास तयार नसल्याने तसेच विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी सदर दूरध्वनी यंत्रणेचा वापर करता येईल. यासाठी त्यांना नविन दूरध्वनी यंत्रणा खरेदी करावी लागणार नाही. यामुळे संस्थानचा अनावश्यक खर्च टळेल, असे वाटते. तरी सदर जूनी दूरध्वनी यंत्रणा आयटीआय विभागाकडे वर्ग करणेत यावी, असे नम्र मत आहे.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेप्रमाणे, मेल्ट्रॉन या कंपनीची २५६ पोर्ट क्षमता असलेली जूनी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा (EPABX SYSTEM), विद्यार्थ्यांना ट्रेनिंगसाठी आयटीआय विभागाकडे वर्ग करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३५** **संगणक संच खरेदी बाबत**
**निर्णय क्र.८१९** श्रीसाईबाबा संस्थानचे कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थान परिसरातील विविध कार्यालये, काऊंटर्स इ. एकमेकांशी जोडणारे संगणकीय जाळ्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. या संगणकीय जाळ्यांतर्गत साधारणतः ११०/११५ च्या दरम्यान संगणके माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहेत. सध्या संस्थान परिसरातील विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप काऊंटर्स, प्रसादालय व कॅन्टीन काऊंटर्स, लेखाशाखेतील मनिऑर्डर्स / चेक इत्यादी ठिकाणचे कार्यालयीन कामकाज संगणकाव्दारे करण्यात येत आहे.

**(अ)**विविध कार्यालयांत, काऊंटर्ससाठी वापरण्यात येणारे संगणके खरेदी करुन ४ ते ५ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला आहे. तसेच सर्व काऊंटर्सवरील संगणके २४ तास चालू राहत असल्याने, ते सतत नादुरुस्त होत असतात. संगणके बंद पडल्यास देणगी काऊंटर्स, रुम बुकींग सुविधा बंद पडते. नादुरुस्त संगणकात किरकोळ बिघाड असेल तर सदर संगणक तातडीने माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दुरुस्त करुन चालू करुन देण्यात येते. परंतु, सदर संगणकातील बिघाड दुरुस्त होण्यासारखा नसेल तर सदर ठिकाणी दुसरा संगणक द्यावा लागतो. सदर प्रक्रियेमध्ये बराच वेळ जातो. त्यामुळे विनाकारण

श्रीसाईभक्तांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागते व त्यांची नाराजी होते. माहिती तंत्रज्ञान विभागाकडे नविन संगणक उपलब्ध नसल्याने, सदर येणाऱ्या अडचणीं तात्काळ सोडविता येत नाही.

सद्यस्थितीत चौकशी व निवासस्थान विभाग, नविन भक्तनिवासस्थान विभाग (५०० रुम), अंतर्गत लेखापरिक्षण विभाग, आयटी ऑफिस या विभागांनी नविन संगणक संचांची मागणी केलेली असून, सदर विभागांचा कामकाजाचा आवाका पाहता त्यांना खालील तपशीलाप्रमाणे नविन संगणक संच व सदर संगणक संचांस विजपुरवठा सुरळीत राहणेसाठी युपीएस उपलब्ध करुन देण्यात यावे, असे नम्र मत आहे.

**नविन खरेदी करावायाच्या संगणक संच व युपीएसचा तपशील पुढीलप्रमाणे-**

| Sr. No. | Description | Qty. | Appox. Rate | Total |
|---|---|---|---|---|
| **01.** | Intel Dualcore Processior 3.0 or Higher,<br>80 GB Hard Disk, 512 MB RAM,<br>15" CRT Monitor,<br>Without CD ROM or Floppy Drive,<br>Optical Mouse & Keyboard,<br>1 Parallel, 1 COM port & USB ports,<br>Windows XP Professional,<br>**3 Years on site warrenty**.<br>*Make- Wipro.* | 02 | 30,000/- | 60,000/- |
| **02.** | Intel core2Duo Processior 2.0 or Higher,<br>160 GB Hard Disk, 1GB RAM,<br>17" LCD Monitor,<br>Without CD ROM or Floppy Drive,<br>Optical Mouse & Keyboard,<br>1 Parallel, 1 COM port & USB ports,<br>Windows XP Professional,<br>**3 Years on site warrenty**.<br>***Make- Wipro.*** | 02 | 35,000/- | 70,000/- |
| **03.** | **UPS- 800(+) VA 3 Years Comprehensive Onsite Warranty.Make – APC.** | 03 | 5900/- | 11,800/- |
| | TOTAL | | | 1,41,800/- |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे संगणक संच व युपीएस विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४१,८००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३६** **सिमेन्स लि., मुंबई यांचे नावात सिमेंन्स एन्टरप्रायजेस कम्युनिकेशन्स प्रा.लि., मुंबई असा बदल झालेबाबत.**

**निर्णय क्र.८२०** (अ) संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या व्यवस्थापन मंडळाचे २९-३१ मार्च,२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७९ नुसार, Siemens Hipath 4300IP ही 2000 लाईन्स क्षमतेची अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून संदर्भ क्रमांक ०२ चे कार्यादेशान्वये खरेदी करुन, दिनांक २२ जुलै, २००४ रोजी कार्यान्वीत केलेली आहे. या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान या ठिकाणी तीन एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या तीन्ही एक्सचेंजमध्ये एकूण १९ Analog कार्डस् बसविण्यात आले आहेत. या कार्डस्व्दारे प्रत्येक कार्डमध्ये २४ याप्रमाणे एकूण ४५६ अंतर्गत दूरध्वनी जोडण्याची सुविधा उपलब्ध आहे.

(ब) सिमेन्स लि., मुंबई यांनी त्यांचे दिनांक१९ जुलै, २००७ रोजीचे (संस्थान आवक नंबर २५३०९ दिनांक ३० जुलै, २००७)पत्रान्वये सिमेन्स लि., मुंबई या कंपनीचे नावात बदल होऊन, सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई असे करण्यात आलेबाबत कळविलेले आहे. संस्थान दूरध्वनी यंत्रणेची कार्यक्षमता वाढविणे, दूरध्वनी यंत्रणेसंदर्भात विविध साहित्य खरेदी करणे तसेच दूरध्वनी यंत्रणेची वार्षिक दुरुस्ती-देखभाल करण्याची कार्यवाही सिमेन्स कंपनीकडून करुन घेण्यात येत होती. परंतु, सिमेन्स कंपनीचे नावात बदल झाल्याने, दूरध्वनी यंत्रणेसंदर्भातील साहित्य खरेदी करणे, दुरुस्ती-देखभाल करार करणे, वेळोवेळी पत्रव्यवहार करणे, बिल अदा करणे आदि. सर्व कामे सिमेन्स कंपनीचे नविन नावाने म्हणजे सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई या नावाने करणेसाठी संस्थानचे लेखाधिकारी श्री काळे सो. यांचे कक्षात दिनांक ०८ ऑक्टोबर, २००७ रोजी संस्थानचे लेखापरिक्षक शरद एस. गायकवाड ॲन्ड कंपनी यांचेसमवेत चर्चा केली असता, त्यांनी सिमेन्सचे नविन नावाने व्यवहार करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी, असे सुचविले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, सिमेन्स लि., मुंबई या कंपनीशी संस्थानमार्फत करण्यात येणारे सर्व अर्थिक व्यवहार, पत्रव्यवहार हे त्यांचे नविन नावाने म्हणजे सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई या नावाने करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थान परिसरात साईनाथ छाया इमारतीत लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दिलेल्या हॉलला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८२१** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी येथे सिटी सर्व्हे नंबर ३२ व ग्रामपंचायत मिळकत न ८०२ मध्ये जुनी साईनाथ छाया इमारतीचे जागेवर संस्थाने नव्या इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

उपरोक्त इमारतीमध्ये शिर्डी येथे येणा-या देशी , विदेशी साईभक्तांच्या सोईसाठी व जनतेच्या सोईसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना या ठिकाणी सदर इमारतीमधील पहिला मजला लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर १२ महिने कालावधीसाठी देण्यात आलेला आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | जागा /गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | मागील कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईनाथ छाया इमारत-मधील - पहिला माळा | स्टेट बँक ऑफ इडिया | दरमहा रुपये २५०००/- | साईभक्त व संस्थानला सेवा व सुविधेसाठी | ११-११-२००६ ते १०-११-२००७ |

उपरोक्त प्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया यांना दिलेल्या हॉलची मुदत १०-११-२००७ रोजी मुदत संपत असल्याने पुढील १२ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयास ०३/१२/२००७ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी " सदरचे साईनाथ छाया हॉलची मुदत १२ महिने ची असून त्याची मुदत दिनांक १०/११/२००७ रोजी संपत असलेने दि ११/११/२००७ ते दि. १०/११/२००८ अखेर पुढील १२ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे. "

साईभक्तांना व संस्थानला सदर सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर पुढील मुदतीसाठी म्हणजेच दिनांक ११/११/२००७ पासून दि १०/११/२००८ अखेर १२ महिने करिता मासिक परवाना भाडे रुपये २५,०००/- (मासिक भाडे - अक्षरी रुपये पंचवीस हजार ) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास १२ महिने करिता मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८** **प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित,लोणी खुर्द यांना बेदाण विक्रीकामी देण्यात आलेल्या बुथ (स्टॉलसाठी) दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८२२** संस्थानने प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी खुर्द , मु पो - लोणी खुर्द, ता - राहाता, जिल्हा अहमदनगर यांना फक्त बेदाणा विक्री साठी श्री साईबाबा भक्तनिवास इमारत येथे गाळा नं ०७ व तसेच प्रसादालय परिसरात चहा कॅन्टीन शेजारी बुथ स्टॉलसाठी जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने बारा महिने मुदतीचे कालावधी करिता वापरांसाठी दिलेली आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा / जागा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा भक्तनिवास इमारत, श्री साईबाबा संस्थान शिरडी ,साभनि इमारत मधील गाळा नं ०७ | प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित , लोणी खुर्द, मु. पो -लोणी खुर्द, ता- राहाता, जि-अ नगर | एका गाळयासाठी दरमहा रुपये १०००/- (डिपॉझीट रु.१०,०००/- ) मात्र | बेदाणा विक्रीकामी | ३०-११-२००६ ते २९-११-२००७ |
| ०२ | साईप्रसाद परिसर -चहा कॅन्टीन / कार्यालय जवळ स्टॉलकामी जागा | प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित , लोणी खुर्द, मु. पो -लोणी खुर्द, ता- राहाता, जि-अ नगर | एका स्टॉलसाठी दरमहा रुपये १०००/- (डिपॉझीट रु.१०,०००/- ) मात्र | बेदाणा विक्रीकामी | ३०-११-२००६ ते २९-११-२००७ |

उपरोक्त प्रमाणे प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी खुर्द , मु पो - लोणी खुर्द, ता - राहाता, जिल्हा अहमदनगर यांना देण्यात आलेला गाळा व बुथ स्टॉलसाठी जागा याची मुदत दिनांक २९-११-२००७ रोजी मुदत संपत असल्याने

पुढील १२ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयास २१/११/२००७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यात त्यांनी " आमचे संस्थेस आपले संस्थानचे भक्तनिवास - ५०० रुम मधील गाळा व प्रसादालय परिसरातील मोकळया जागेत स्टॉलसाठी रिकामी जागा मंजूर केलेली आह. व संस्थेच्या ताब्यात दि २४/११/२००५ पासून ताब्यात आहे. दि २९/११/२००७ अखेर करारनामा मुदत संपत असून आमचे संस्थेस दि ३०/११/२००७ ते दि २९/११/२००८ अखेर मुदतवाढ मिळावी व पुढील बारा महिने कालावधी करिता भक्तनिवास ५०० रुम गाळा नं ७ व प्रसादालय परिसरातील मोकळी जागा स्टॉलसाठी / बुथसाठी मिळावी ही नम्र विनंती.असा प्रस्ताव अर्ज गाळा / जागेबाबत त्यांनी सादर केलेला आहे.

साईभक्त व संस्थानला सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, लोणी खुर्द , मु पो - लोणी खुर्द, ता - राहाता, जिल्हा अहमदनगर यांचे मुदत गाळयाची व स्टॉलसाठी जागेची मुदत दि २९/११/२००७ रोजी संपत असल्याने प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक संस्था, लोणी खुर्द यांना लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर गाळा व जागा दिनांक ३०/११/२००७ पासून दि २९/११/२००८ अखेर १२ महिने करिता एका गाळयासाठी त्यांचेकडून डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये २०००/- ( अक्षरी रुपये दोन हजार) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून व तसेच त्यांचेकडून एका स्टॉलसाठी डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये २०००/- ( अक्षरी रुपये दोन हजार ) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास १२ महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९ गुरुकृपा सेल्स कोपरगाव यांना साईगंगा मिनरल वॉटरची विक्री करणेकामी भक्तनिवास इमारतीत देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८२३** १) संस्थानने खालील तपशिलाप्रमाणे गाळा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता गुरुकृपा सेल्स, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना वापरांसाठी दिलेला आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी दरमहा फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त निवासस्थान - डी विंग कडील गाळा नं ०८ | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | दरमहा रुपये २,२००/- | साईगंगा मिनरल वॉटर | १०-११-२००६ ते ०९-१०-२००७ |

गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांनी प्रस्तुत गाळयासाठी पुढील मुदतवाढ मिळावी अशी दूरध्वनीवरून विनंती केली असून त्याचेकडील लायसेन्स फी ची रक्कम जमा करीत असून गाळयांस पुढील मुदतवाढ मिळावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता, गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन कपांऊड, साई कॉर्नर, कोपरगांव , जिल्हा अहमदनगर यांना दिनांक १०/१०/२००७ रोजी पासून ते दिनांक ०९/०९/२००८ अखेर ११ महिने कालावधी करिता डिपॉझीट रुपये १०,०००/- ( दहा हजार ), मागील मासिक परवाना फी रुपये २२००/- मध्ये १० % वाढ करुन दरमहा रक्कम रुपये २,४२०/- मात्र आकारून व तसेच दरमहा मिटर रिडीग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४० श्रीराम आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी प्रसादालय परिसरात बुथ (स्टॉलसाठी) दिलेल्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दुध व्यवसायिक संघ लि.बाभळेश्वर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.८२४** संस्थानने श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता यांना श्रीराम आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थाचे विक्री साठी प्रसादालय परिसरात एका बुथ स्टॉलसाठी जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने बारा महिने मुदतीचे कालावधी करिता वापरांसाठी दिलेली आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | जागा /गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद परिसर -चहा | श्रीरामपूर दूध जिल्हा | दरमहा | श्रीरामपूर संघाचे | ३०-११-२००६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कॅन्टीन कार्यालय जवळ | मध्यवर्ती सहकारी दूध व्याव.संघ, लिमि. बाभळेश्वर, ता- राहाता अहमदनगर ४१३ ७३७ | रुपये १०००/- (डिपॉझीट रु.१०,०००/- ) मात्र | उत्पादीत आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीकामी | ते २९-११-२००७ |

उपरोक्त प्रमाणे श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता , जिल्हा अहमदनगर यांचे दि १६/१०/२००७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. त्यात त्यांनी " सस्थानने प्रसादालय परिसरात आमचे दूध संघास आईस्क्रिम व इतर दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी स्टॉल ठेवणेसाठी भाडेतत्वावर जागा दिलेली आहे. सदर बुथस्टॉलसाठी दिलेल्या जागेची मुदत दि २९/११/२००७ रोजी संपुष्टात येत आहे. तरी कृपया पुढील कालावधीसाठी आईस्क्रिम बुथ स्टॉलचे जागेसाठी मुदतवाढ मिळावी. " अशी विनंती केलेली आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता , जिल्हा - अहमदनगर यांना लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर एका स्टॉलसाठी दिनांक ३०/११/२००७ रोजी पासून दि २९/११/२००८ अखेर १२ महिने करिता एका स्टॉलसाठी डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये २०००/- ( अक्षरी रुपये दोन हजार ) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्ती अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर सदर स्टॉलला १२ महिने करिता मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१** **श्री संदिप अशोक जगधनी,श्रीरामपूर कॅम्प शिर्डी यांना भक्तनिवासस्थान इमारत येथे बाहेरील बाजूस टेलिफोन सुविधाकामी दिलेला गाळा क्र.०३ यांस लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वावर मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.८२५** १) संस्थानने नवीन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम ) परिसरातील १ गाळा साईभक्तांचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर श्री. जगधनी यांना वापरांसाठी दिलेले आहेत.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त -निवासस्थान गाळा क्रमांक ०३ | श्री.संदीप अशोक जगधनी श्रीरामपूर कॅम्प - शिरडी | दरमहा रुपये १,५७३/- **( डिपॉझीट रक्कम रुपये ३,१८,०००/- )** | साईभक्तांना टेलिफोन सुविधा पुरविणेबाबत | ०१-१२-२००६ ते ३१-१०-२००७ |

उपरोक्त प्रमाणे श्री संदीप अशोक जगधनी यांची दिनांक ३१-१०-२००७ रोजी मुदत संपत असल्याने पुढील ११ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव दिनांक ३१/१०/२००७ रोजीचा अर्ज ( दिनांक ३१/१०/२००७ रोजी प्राप्त ) पाठवला आहे त्यात त्यांनी " माझे टेलिफोन सुविधा गाळा क्रमांक ३ नविन भक्तनिवासचे लिव्ह ॲन्ड लायसन्सचे नुतनीकरण ३१/१०/२००७ मध्ये संपत आहे. तरी विनंती की सदरचे नुतनीकरण पुढील ११ महिन्याचे होणेस व मुदतवाढ मिळावी नम्र विनंती आहे . तसे आजपावेतो लायसेन्स फी व लाईट बील भरलेले असून कोणतीही थकबाकी नाही अशी विनंती केलेली आहे. यापूर्वी त्यांना खालील कालावधीतप्रमाणे गाळा चालविण्यास देण्यात आलेला आहे.

१) दिनांक ०१/०८/१९९९ ते दिनांक ३०/०६/२००० अखेर
२) दिनांक ०१/०७/२००० ते दिनांक ३१/०५/२००१ अखेर
३) दिनांक ०१/०६/२००१ ते दिनांक ३१/०४/२००२ अखेर
४) दिनांक ०१/०५/२००२ ते दिनांक ३१/०३/२००३ अखेर
५) दिनांक ०१/०४/२००३ ते दिनांक २९/०२/२००४ अखेर
६) दिनांक ०१/०३/२००४ ते दिनांक ३१/०१/२००५ अखेर
७) दिनांक ०१/०२/२००५ ते दिनांक ३१/१२/२००५ अखेर
८) दिनांक ०१/०१/२००६ ते दिनांक ३०/११/२००६ अखेर
९ ) दिनांक ०१-१२-२००६ते दिनांक ३१/१०/२००७ अखेर

सध्याचा लिव्ह ॲन्ड लायसेन्स कालावधी दिनांक ०१-१२-२००६ते दिनांक ३१/१०/२००७ अखेर पावेतो असून या कालावधीसाठी गाळा चालविणेस दिलेला आहे. सदर कालावधी संपत असल्याने याबाबतचा विचार करता " लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर गाळयास दिनांक ०१/११/२००७ ते दिनांक ३१/१०/२००८ अखेर ११ महिने कालावधीकरिता मुदतवाढ पूर्वीचे लायसन्स फी रुपये १५७३/- मध्ये १० % वाढ करून रुपये १,७३१/- मात्र आकारुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर

गाळयास ११ महिन्यासाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४२** **शिर्डी महोत्सव -२००७ बाबत**

**निर्णय क्र.८२६** सन २००४ सालापासून " शिर्डी महोत्सव " हा दि.२९/१२/ ते दि.३१/१२/ अखेर साजरा करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. मागिल वर्षी सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे रु. १०,२९,१८२/- (अक्षरी रु. ऐशी हजार पाचशे सत्तर मात्र) खर्च आलेला आहे. सन २००६ मध्ये सदरचा कार्यक्रम तीन दिवस साजरा करण्यात आला होता.

याहीवर्षी मागिल वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने १२ मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००७ ते दि.३१/१२/२००७ रोजी गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून पत्रे आलेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | तपशील | दिनांक | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री कैलास दत्तुजी कोल्हे, सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, चिखली रोड, बुलडाणा | हिंदी, मराठी भजन भावगीते, व भक्तीगीते | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु. १०,०००/- कलाकार-७, |
| ०२. | कुमार आनन्द रंजन, संस्थापक एवं मुख्य संरक्षक, सत श्री साई आध्यात्मिक मॅनेजमेंट एण्ड क्योर ऑर्गनायझेशन, न्यु दिल्ली-११००४३ | साई भजन संध्या कार्यक्रम.- सदरचा कार्यक्रम मागील वर्षी झालेला आहे. | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | २५ कलाकारांचे येण्या-जाण्याचे भाडे, निवास व भोजन व्यवस्था |
| **०३.** | भावना पंत, प्लॉट नं. सी-९, शालीमार गार्डन, Ext.II, सहिबाबाद, जि.गाझीयाबाद-(उ.प्र) | भक्ति संगीत कार्यक्रम | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु. ३१,०००/- कलाकार ८ |
| ०४. | सच्चिदानंद अप्पा, वेस्टर्न रेल्वे कॉलनी, ७७/४, माटुंगा रोड, मुंबई-४०० ०१९ | एक शाम साईके नाम | ३१/१२/२००७ रात्रौ ९.०० ते १२.०० | रु.१२,०००/-गाडी भाडे, रु.१/- व शॉल, श्रीफळ. |
| ०५. | सक्सेना बंधु(मुकेश), एच-५८-५९, साऊथ एक्सटे.I, (IV th Floor), न्यु दिल्ली-११० ०४९ | साई भजन कार्यक्रम | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | कलाकारांचे येण्या-जाण्याचे भाडे, निवास व भोजन व्यवस्था डॉ. गोंदकर, विश्वस्त यांची शिफारस. |
| ०६. | श्री केतन चंद्रकांत कुलकर्णी, सुरभि इंडियन कल्चरल ग्रुप, द्वारा-एनआयसीटी कॉम्प्युटर एज्युकेशन, मित्तल टॉवर, भाजी मार्केट, कोपरगांव-४२३६०१ | भारतीय सण व उत्सवांवर आधारीत कार्यक्रम " गाणी सण-उत्सवांची " | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु.२५,०००/- मा.श्री.खांबेकर, विश्वस्त यांची शिफारस रु.१५,०००/- |
| ०७. | श्रीमती दिपमाला, मुंबई , | भजन कार्यक्रम | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु.५०,०००/- मा.श्री. खांबेकर, विश्वस्त यांची शिफारस रु.२५,०००/- |
| ०८. | लोकशाहीर विठ्ठल उमप, बि.नं.२४५/९५७३, कन्नमवार नगर-२, विक्रोळी(पूर्व), मुंबई नं. ८३, | " मी मराठी " हा गीत संगीतनृत्याने बहरलेला अस्सल मराठमोठा कार्यक्रम किंवा जांभुळ आख्यान कार्यक्रम | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु.१,६०,०००/- कलाकार ६० रु.५०,०००/- कलाकार-२५ |
| ०९. | श्री हिमाचल सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मीबाई नगर, आय.एन.ए. मार्केटजवळ, न्यु दिल्ली-११००२३ | साई भजन संध्या | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु.२५,०००/- ७-८ कलाकार |
| १०. | श्री विलास अडकर, शिवज्योत बालाजी थिएटर्स, | निसर्ग राजा, भक्तीगीते | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु.३०,०००/- १५ कलाकार |
| ११. | संगिता साई, ३०६, राकेशदिप, ११ कमर्शियल कॉम्प्लेक्स, गुलमोहर इनक्लेव्ह, न्यु दिल्ली-११००४९ | साई भजन संध्या | २९ ते ३१/१२/०७ पैकी एक दिवस | मानधन नाही. ८-१० कलाकार डॉ.गोंदकर यांची शिफारस. |
| १२. | श्रीमती मीनाश्री पाटनी, कोमल स्पर्श, महावीर | शास्त्रीय थेरा थाली व | २९ ते | मानधन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मार्केट, जैन मंदिन रोड, भिलवाडा, राजस्थान-३११ ००१ | राजस्थानी फॉग डान्स कार्यक्रम | ३१/१२/०७ पैकी एक दिवस | रु.१६,०००/-. ८-१० कलाकार |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी खालील कलाकारांचे कार्यक्रम दि.२८/१२/०७ ते दि.३१/१२/०७ अखेर ०६ मान्यवर कलाकांराचे कार्यक्रम निश्चित करण्यात आले. तसेच सदरचे कार्यक्रम जुन्या मराठी शाळेच्या पटांगणात स्टेज टाकून करण्यात यावेत व त्यासाठी येणा-या रु. ७,००,०००/- (अक्षरी रु. सात लाख मात्र) चे अंदाजीत खर्चास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | दिनांक/ वार | गायकांचे नांव | वेळ | मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | २८/१२/२००७ - शुक्रवार | बेबी प्रिया पाटनी, भिलवाडा यांचा थेरा थाली नृत्य कार्यक्रम | रात्रौ ८.०० ते ९.०० | रु.१६,०००/- | जेवण व निवासव्यवस्था |
| ०२. | २९/१२/२००७ - शनि वार | भावना पंत, सहिबाबाद, यांचा भक्ती संगीत कार्यक्रम. | दुपारी ४.०० ते ५.३० | रु.३१,०००/-+ टि.डी.एस. | जेवण व निवासव्यवस्था |
| | | श्री.सक्सेना बंधु, न्यु दिल्ली यांचा साई भजन संध्या कार्यक्रम. | रात्रौ ७.०० ते ९.३० | रेल्वे ए. सी. ३ टायर रेल्वे भाडे अंदाजे टिडीएस+रु.३१,०००/- | जेवण व निवासव्यवस्था डॉ.गोदकर यांची शिफारस |
| ०३. | ३०/१२/२००७ - रविवार | श्रीमती दिपमाला, मुंबई यांचा भजन संध्या कार्यक्रम | दुपारी ४.०० ते ५.३० | रु.२५,०००/- + टि.डी.एस. | जेवण व निवासव्यवस्था |
| | | लोकशाहीर विठ्ठल उमप, मुंबई यांचा जांभुळ आख्यान | रात्रौ ७.०० ते ९.३० | रु.५०,०००/- + टि.डी.एस. | जेवण व निवासव्यवस्था |
| ०४. | ३१/१२/२००७ - सोमवार | संगिता साई, न्यु दिल्ली यांचा भजन संध्या कार्यक्रम.- ९८७३४०९९७७ | रात्रौ ०७.३० ते ०९.३० | संस्थान शिरस्त्यानुसार रु.२१,०००/-+ टिडीएस | जेवण व निवासव्यवस्था |
| | | श्री सच्चिदानंद अप्पा, मुंबई यांचा एक शाम साई के नाम हा कार्यक्रम. | रात्रौ १०.०० ते १२.३० | मागील वर्षी त्यांना टिडीएस सह रु. ३१,१६२/- दिलेले आहेत. मागणी रु. ५१,०००/- | जेवण व निवासव्यवस्था मा.अध्यक्ष यांची शिफारस |

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३** **श्रीरामनवमी उत्सव २००७ झालेल्या खर्चाबाबत**

**निर्णय क्र.८२७** श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीत मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | ०७,३८,७२५.९० | १५,६४,४७८.०० | ०८,२५,७५२.१० |
| ०२. | कलाकार बिदागी, | ०५,५४,११४.०० | ०८,७५,२८३.०० | ०३,२१,१६९.०० |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०१,८१,५७४.८० | ०३,८१,९८३.०० | ०२,००,४०८.२० * |
| ०४. | विद्युत रोषणाई | ०४,०४,३६०.०० | ०४,७३,७१६.०० | ००,६९,३५६.०० * |
| ०५. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | ११,१७,६९५.७० | १०,१४,७१९.०० | ००.०० |
| ०६. | जादा कामगार | ०१,८५,११४.६० | ०१,७४,७७०.०० | ००.०० |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०२,०३,१०८.४० | ०४,१५,६२४.०० | ०२,१२,५१६.०० |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ०१,३९,८०६.७० | ०१,१७,५१९.०० | ००.०० |
| | एकूण खर्च | ३५,२४,५००.१० | ५०,१८,०९२.०० | १३,५९,४३७.१० |

अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु. ०७,३८,७२५.९० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु. १५,६४,४७८.०० इतका खर्च आलेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये श्री रामनवमी उत्सव, उन्हाळी मंडप व स्टेज, बॅरेकेटींग,

ड्रेसींग रुम, ५०० खुर्च्या इ.कामी आदेश पारीत करण्यात आला होता, तथापि त्या व्यतिरिक्त पालख्यांची संख्या वाढलेने व पालख्यांचे थांब्यासाठी मुंबई ते शिर्डी मार्गावर जादा मंडपाची उभारणी करण्यात आली होती, त्यामुळे रु.०८,२५,७५२.१० इतका जादा खर्च झालेला आहे. दि.०६/०१/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ५२ निर्णय क्र. ५२ अन्वये बजेटमधील अ.नं.१ चे अनुषंगाने ३ नुसार पालख्यांचे थांब्यासाठी मुंबई ते शिर्डी मार्गावरील जादा मंडप गरज लागल्यास टाकण्याची व त्यास येणा-या जादा खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

अ.नं.०२ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये कलाकार बिदागी इ. वर रु.५,५४,११४.०० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये प्रत्यक्षात कलाकार बिदागी व इतर रु.८,७५,२८३.०० इतका खर्च आलेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये मा.अध्यक्ष यांचे सुचनेनुसार अनेक नामवंत कलाकार आमंत्रित करण्यात आलेले होते. त्यामुळे रु. ०३,२१,१६९.०० इतका जादा खर्च झालेला आहे. दि.०६/०१/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ५२ निर्णय क्र. ५२ अन्वये बजेटमधील अ.नं.२ चे अनुषंगाने २ नुसार नामवंत कलाकारांना आमंत्रित केलेस येणा-या जादा खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

*अ.नं.०३ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये भक्तांना मिष्टान्न मजुरीसह इ.वर रु. ०१,८१,५७४.८० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये प्रत्यक्षात भक्तांना मिष्टान्न मजुरीसह इ.वर रु. ०३,८१,९८३.०० इतका खर्च आलेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये पांगरी येथे उत्सवासाठी येणा-या पालखीत असलेल्या पदयात्रींना संस्थानमार्फत मोफत भोजन दिले. त्यामुळे रु. ०२,००,४०८.२० इतका जादा खर्च झालेला आहे. दि.३०/०४/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्यावेळचा विषय क्र.०९/ निर्णय क्र.३४७ अन्वये जादा खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

*अ.नं.०४ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये विद्युत रोषणाईवर रु. ०४,०४,३६०/- इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये विद्युत रोषणाईवर रु. ०४,७३,७१६.०० इतका खर्च आलेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये २० दिवसाचे फळ्यांचे भाडे तसेच विद्युत रोषणाईवर झालेल्या डिझेल खर्चही धरण्यात आलेला आहे. त्यामुळे रु. ००,६९,३५६.०० इतका जादा खर्च झालेला आहे. दि.२९/०६/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्यावेळचा विषय क्र.१८/ निर्णय क्र. ४७३ अन्वये जादा खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

अ.नं.०७ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह इ.साठी रु. ०२,०३,१०८.४० इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २००७ मध्ये प्रत्यक्ष इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह इ.साठी खर्च हा रु. ०४,१५,६२४.०० इतका झालेला आहे. यामध्ये कुस्त्या, पालखीधारकांसाठी लस्सी वाटप, जादा फर्निचर इ.खर्च धरला असलेने रु. ०२,१२,५१६.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीने श्रीरामनवमी उत्सव २००७ चा मंजूर केलेला खर्च हा अंदाजित असून सन २००६ मधील श्री रामनवमी उत्सवात प्रत्यक्ष झालेल्या खर्चामध्ये १० टक्के जादा धरुन कळविण्यात आलेला होता, प्रत्यक्षात मात्र मुंबई ते शिर्डी दरम्यान पालखी थांब्याठिकाणी टाकण्यात आलेले जादा मंडप, नामवंत कलाकार बिदागी, भक्ताना मिष्टान्न मजूरीसह, विद्युत रोषणाई, कुस्त्या, पालखीधारकांसाठी लस्सी वाटप, जादा फर्निचर इ. तसेच भाववाढ व इतर कारणामुळे जादा खर्च झालेला आहे.

श्रीरामनवमी उत्सवात अंदाजीत खर्च रु. ३५,२४,५००.१० इतका अपेक्षीत होता मात्र प्रत्यक्षात खर्च रु. ५०,१८,०९२.०० इतका झालेला आहे. अ.नं. ३ व ४ यांनी यापुर्वीच मा.व्यवस्थापन समितीचे सभेत संबंधीत विभागांनी होणा-या जादा खर्चास मंजूरी घेतलेली आहे. त्यानुसार त्या रकमा वजा जाता उर्वरीत जादा खर्च रु. १३,५९,४३७.१० (अक्षरी रु. तेरा लाख एकोणसाठी हजार चारशे सदोतीस पैसे दहा मात्र) इतका झालेला आहे.

तरी श्री रामनवमी उत्सवात जादा झालेल्या रु. १३,५९,४३७.१० (अक्षरी रु. तेरा लाख एकोणसाठ हजार चारशे सदोतीस पैसे दहा मात्र) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४४** **श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा झालेल्या खर्चाबाबत**

**निर्णय क्र.८२८** दि.२९/०६/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५०३ अन्वये, दि.११/७/०७ ते दि.२७/७/०७ अखेर आषाढी निमित्त श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपूर येथे जाणा-या पायी दिंडी सोहळ्यासाठी शिधा, त्या अनुषंगिक पिण्याचे पाण्यासाठी टँकर, निवासव्यवस्था इ. खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | प्रत्यक्ष खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१. | एस.पी.फ्रुट एजन्सी अँड ट्रान्सपोर्ट, राहाता यांचे पालखीतील वारक-यांसाठी पिण्याचे पाण्याची टँकर व्यवस्था चे बील | १९,५५०.०० |
| ०२. | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स,खैरी निमगांव,यांचे पायी दिंडी सोहळ्यातील वारक-यांसाठी मुक्कामी मंडप व स्टँड व्यवस्थेचे बील | १७,०००.०० |
| ०३. | सोनटक्के मंडप डेकोरेटर्स व साऊंड सर्व्हीस, राहाता यांचे स्पीकर, ॲम्प्लीफायर, स्टँड इ.चे बील. | ८,१११.०० |
| ०४. | भांडार विभागातुन दिलेली शिधा मदत | ९२,९४५.६५ |
| ०५. | सुरज लाईट डेकोरेटर्स, राहाता यांचे रथाचे लाईटसाठी व भोजन,निवाससाठी लाईट व्यवस्थेकामी जनरेटरचे बील | २१,२५०.०० |
| ०६. | साईप्रसाद केटर्स, राहाता यांचे भोजन व्यवस्थेची मजूरी बील | १७,०००.०० |
| ०७. | एस.पी.फ्रुट एजन्सी अँड ट्रान्सपोर्ट, राहाता यांचे पालखीतील वारक-यांचे बोजे इ.साठी ३ ट्रक व रथ ओढणेकामी एक ट्रॅक्टर चे बील | ३४,०००.०० |
| ०८. | श्रीसंत सौ.गयामाता मानवोन्नती विश्वसेवा प्रतिष्ठान, पंढरपूर यांचे वारकरी निवासव्यवस्था बील. | ३५,०००.०० |
| | एकूण खर्च रुपये | २,४४,८५६.६५ |

उपरोक्तप्रमाणे श्रीक्षेत्र शिर्डी ते श्रीक्षेत्र पंढरपूर येथे गेलेल्या पायी दिंडी सोहळ्यासाठी दि.११/०७/२००७ ते दि.२७/०७/२००७ अखेर पायी दिंडीत सहभागी झालेल्या वारक-यांचे बोजे इ. वहाणेसाठी, मुक्कामी व्यवस्था-मंडप इ., पिण्याचे पाण्याचे टँकर, भोजन व्यवस्था व त्याची मजूरी, लाईट-जनरेटर व्यवस्था, निवास व्यवस्था, शिधा इ.कामी एकूण रु. २,४४,८५६.६५ खर्च झालेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कायकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४५** **श्रीसाई सच्चरित पारायण सोहळा खर्चाबाबत.**
**निर्णय क्र.८२९** दि.२९/०६/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र. ३५ व निर्णय क्र. ४९० अन्वये सन २००७-०८ या सालातील श्री साई सच्चरित पारायण सोहळा वर्ष १३ हा नेहमीचे प्रथेप्रमाणे श्रावण शुध्द १ ते श्रावण शुध्द ८ शके १९२९, म्हणजे सोमवार, दि.१३/०८/२००७ ते मंगळवार, दि.२१/०८/२००७ अखेर साजरा करण्यास व त्याकामी संस्थानमार्फत रु.७,००,०००/- (रु.सात लाख मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.तथापि सदरचे पारायण सोहळ्यास झालेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं | तपशील | अंदाजीत खर्च रुपये | प्रत्यक्ष खर्च रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | १,००,०००.०० | ७९,७८४.०० |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च. | ५०,०००.०० | २३,७०२.००(नि.प)<br>६,०१२.००(फोटो) |
| ०३. | प्रवचनकार/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | १,५०,०००.०० | १,२५,३५१.०० |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | ५०,०००.०० | |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | ५०,०००.०० | ४१,८८९.००-कं.का |
| ०६. | चहा, नाष्टा, फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च | ३,००,०००.०० | १३,५०८.००(कँटीन)<br>१,११,८२०.००(प्र.वि.)<br>१,२५,३२८.०० |
| | एकूण खर्च रुपये | ७,००,०००.०० | ४,०२,०६६.०० |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाईसच्चरित पारायण सोहळ्यासाठी रु. ०४,०२,०६६.०० (अक्षरी रु.चार लाख दोन हजार सहासष्ठ मात्र) खर्च आलेला असून मंजूर अंदाजीत खर्चापेक्षा तो रु. २,९७,९३४/- ने कमी झालेला असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४६** **मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲण्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांचे सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) बाबत**
**निर्णय क्र.८३०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **श्री.शिवलिंग बसवण्णप्पा पटणे, प्राचार्य, आय.टी.आय. यांनी व्यवस्थापन समितीचे दि.१८.०७.२००५ चे सभेत झालेल्या तडजोडीप्रमाणे समजोता ॲफिडेव्हीट करुन न दिलेबाबत.**

**निर्णय क्र.८३१** श्री.शिवलींग बसवण्णपा पटणे यांची नेमणूक दि.०९-०९-१९९१ पासून श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिरडी येथे "प्राचार्य" या पदावर करण्यात आलेली होती. श्री.पटणे हे सेवेत असतांना त्यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२६३/९७ दि.२४-०३-१९९७ अन्वये आरोपपत्र ठेऊन त्यांची खातेचौकशी पुर्ण करण्यात आली. त्रिसदस्य चौकशी समितीने श्री.पटणे यांची खातेचौकशी पुर्ण करुन त्यांनी त्यांचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल दि.२४-०७-२००२ रोजी सादर केला. खातेचौकशीमध्ये श्री.पटणे यांचेविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झाल्याने श्री.पटणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११७७०/२००२ दि.२०-१२-२००२ चे आदेशान्वये सेवेतून कमी (टर्मिनेट) करण्यात आले.

सदर टर्मिनेशन आदेशासंदर्भात श्री.पटणे यांनी संस्थानचे विरुध्द मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांचे कोर्टात अपील क्र.४/२००३ दि.१८-०१-२००३ रोजी दाखल केले होते. सदर अपीलामध्ये मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण पुणे विभाग सोलापूर यांनी दि.२०-०९-२००३ रोजी संस्थानचे विरुध्द अंतिम आदेश (जज्जमेंट) दिले होते.

मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांनी अपील क्र.४/२००३ मध्ये दि.२०-०९-२००३ रोजी दिलेल्या आदेशासंदर्भात संस्थानने श्री.एस.बी.पटणे यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.१६-१०-२००३ रोजी रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ दाखल केले. सदर रिट पिटीशनमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.२८-०४-२००४ रोजी " Respective Parties waive Service, It is made clear that there will be stay to the back wages from the date of filing appeal before the school Tribunal, till the date of decision which is challenged in this petition." असा अंतरीम आदेश दिला.

उपरोक्त आदेशासंदर्भात संस्थानने श्री.एस.बी.पटणे यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे दि.०७-०६-२००४ रोजी लेटर्स पेटंट अपील क्र.९४/२००४ दाखल केले. सदर लेटर्स पेटंटस अपील मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.२९-०६-२००५ रोजी आदेश देऊन रिजेक्ट केले आहे. त्यामुळे सध्या श्री.एस.बी.पटणे यांचेविरुध्द संस्थानने दाखल केलेले रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.

दरम्यानचे काळात श्री.एस.बी.पटणे व संस्थान या उभय पक्षामध्ये रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ या कोर्ट केस संदर्भात मा.न्यायालयाबाहेर तडजोड होऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-०७-२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७० अन्वये " श्री.एस.बी.पटणे यांना श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षणसंस्थेमध्ये प्राचार्य या पदावर पुर्ववत कामावर हजर करुन घेऊन, कोर्ट आदेशानुसार त्यांना मागील काळातील वेतन फरकापोटी सुमारे रु.६,२५,०००/- मात्र एवढी रक्कम आदा करणेत यावी " असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-०७-२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७० नुसार श्री.एस.बी.पटणे यांना जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/१८११/२००५ दि.१७-०८-२००५ अन्वये नेमणूक पत्र देणेत आले. त्याप्रमाणे श्री. एस. बी. पटणे हे श्री.साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दि.१८-०८-२००५ पासून प्राचार्य या पदावर पुर्ववत कामावर रुजू झालेले आहे. तसेच श्री.एस.बी.पटणे यांना मा.कोर्ट आदेशा नुसार मागील काळातील वेतन (बॅक वेजेस) ची रक्कम रु.५,६९,५१०/-(अक्षरी रुपये पाच लाख एकोणसत्तर हजार पाचशे दहा ) मात्र संस्थानकडून आदा करणेत आलेली आहे. तसेच श्री.पटणे यांना विद्यार्थी संख्येशी निगडीत वेतनश्रेणी व आश्वासित योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी जा.नं.एसएसएस/वशी-१/८८७/२००७ दि.१६-०४-२००७ रोजीचे आदेशान्वये देणेत आलेली आहे.

रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ संदर्भात उभय पक्षामध्ये झालेल्या तडजोडीस अनुसरुन सदर कोर्टकेस मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथून काढून घेणेकामी संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांचेकडून कन्सेन्ट ॲफिडेव्हीट (समझोता ॲफिडेव्हीट) चा मसुदा तयार करुन घेणेत आलेला आहे. सदरचे मसुदयाप्रमाणे सुपरिटेंन्डट, ॲडिशनल डिस्ट्रीक्ट कोर्ट, कोपरगाव येथे संस्थानचे कार्यकारी अधिकारी श्री.बी.आर.वाकचौरे व श्री.एस.बी.पटणे या उभय पक्षांनी स्वाक्ष-या करुन, समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले आहे. तथापी, श्री.एस.बी.पटणे यांना अनेकवेळा सुचना देऊन देखील त्यांनी त्यांचे ॲडव्होकेट श्री.व्ही.जे.दिक्षीत, औरंगाबाद यांना अद्याप पर्यंत सदर समझोता ॲफिडेव्हीटवर ( कन्सेन्ट ॲफिडेव्हीटवर ) स्वाक्षरी करणेस सांगितलेले नाही. त्यामुळे श्री.पटणे यांचे ॲडव्होकेट श्री.व्ही.जे.दिक्षीत, औरंगाबाद यांनी सदर समझोता ॲफिडेव्हीटवर स्वाक्षरी केलेली नाही.

त्यामुळे रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ ही कोर्ट केस अद्याप मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबीत आहे.

उभय पक्षात झालेल्या तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे तसेच नेमणूक पत्रातील अटी शर्तीस अनुसरुन श्री.एस.बी.पटणे यांचे ॲडव्होकेट श्री.व्ही.जे.दिक्षीत यांनी समझोता ॲफिडेव्हीटवर स्वाक्षरी करुन देणे आवश्यक होते व त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. यावरुन श्री.एस.बी.पटणे हे समझोता ॲफिडेव्हीट करुन देणेस मुद्दाम टाळाटाळ करुन, प्रशासनास जाणून बुजून अडचणीत आणणेचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. श्री.एस.बी.पटणे हे इकडील कार्यालयीन पत्रांना, आदेशांना व वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांना जुमानत नाही तसेच ते सदर कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांमार्फत वेळोवेळी देणेत आलेल्या सुचनांचा अवमान करत आहेत. त्यांचे सदरचे कृत्य हे जाणून बुजून वेळकाढूपणाचे असून, ते प्रशासनास वेठीस धरणारे आहे. सदरचे रिट पिटीशन क्र.४७२३/२००३ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे लवकरच सुनावणी कामी बोर्डावर येण्याची शक्यता आहे. त्यावेळी श्री.एस.बी.पटणे यांचे समझोता ॲफिडेव्हीट करुन न देण्याचे धोरणामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यापुढे श्री.एस.बी.पटणे यांची सेवा पुढे चालू ठेवावयाची किंवा कसे ? याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.

अशाप्रकारे श्रीएस.बी.पटणे यांना उपरोक्तप्रमाणे अनेकवेळा लेखी कळवून देखील व तोंडी समक्ष सुचना देऊन देखील त्यांनी अदयाप पर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. त्यांनी कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांचे सुचनांचा अवमान केलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य हे गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

सबब, श्री.शिवलिंग बसवण्णपा पटणे, प्राचार्य, आय.टी.आय यांना अनेकवेळा लेखी पत्रान्वये कळवून देखील, तसेच वेळोवेळी समक्ष बोलावून देखील ते उभय पक्षात तडजोडीत ठरलेप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट करुन देत नाहीत, त्यामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. याबाबत चर्चा करणेकामी श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयात दि.०५-०९-२००७ रोजी बोलाविले होते. त्यांनी श्रीएस.बी.पटणे हे तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे समझ ोता ॲफिडेव्हीट ( कन्सेन्ट ॲफिडेव्हीट ) करुन देत नाहीत. ते प्रशासनास वेठीस धरत आहेत. अशापरिस्थितीत मा.न्यायाधिश, हायकोर्ट औरंगाबाद हे श्री.एस.बी.पटणे यांना कामावर कां ठेवले ? अशी सुनावणीचे वेळेस प्रशासनास विचारणा करेल व त्यावेळी मा.न्यायालयास उत्तर देणे अडचणीचे होईल. म्हणून श्री.एस.बी.पटणे यांना तात्काळ संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करण्यात यावे असे चर्चेअंती सांगितले आहे. तरी श्री.एस.बी.पटणे यांना एक महिन्याचे लेखी नोटीशी ऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम देवून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.बी. पटणे यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८** **श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर, कनिष्ठ कामगार अधिकारी यांनी व्यवस्थापन समितीचे दि.१३.०३.२००५ चे सभेत झालेल्या तडजोडीप्रमाणे समजोता ॲफिडेव्हीट करुन न दिलेबाबत.**

**निर्णय क्र.८३२** श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांची नेमणूक दि.१३-१०-१९८६ पासून संस्थानचे प्रशासन शाखेत कनिष्ठ कामगार अधिकारी या पदावर करणेत आली होती. ते संस्थान सेवेत कार्यरत असतांना त्यांनी गंभीर गैरशिस्त वर्तन केले होते. त्याबाबत त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-१/१३१५९/१९९३ दि.०९-१२-१९९३ अन्वये आरोपपत्र देऊन, त्यांची खातेचौकशी करणेत आली होती. खातेचौकशीमध्ये श्री.म.दि.धनेश्वर यांचेविरुध्द ठेवलेले आरोप सिध्द झाल्यामुळे त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७९३३/९४ दि.०२-०८-१९९४ चे आदेशान्वये दि.०२-०८-१९९४ पासून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेत आले होते.

सदरचे बडतर्फी आदेशासंदर्भात श्री.धनेश्वर यांनी मा.कामगार न्यायालय,अहदनगर येथे तक्रार (यु.एल.पी.)क्र.१४/१९९६ ही कोर्टकेस दाखल केली. त्यामध्ये मा.कामगार न्यायालयाने दि.१८-०७-२००० रोजी दिलेल्या आदेशासंदर्भात संस्थानने श्री.म.दि.धनेश्वर यांचेविरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.)क्र.४०/२००० तसेच श्री.म.दि.धनेश्वर यांनी संस्थान विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.)क्र.४७/२००० मा.औद्योगिक न्यायालय, हमदनगर येथे दाखल केले होते. सदरचे दोन्ही रिव्हीजनमध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.२८-०९-२००४ रोजी कॉमन जज्जमेंट/आदेश दिला होता. सदरचे आदेशासंदर्भात

संस्थानने श्री.म.दि.धनेश्वर यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.६१६/२००५ दाखल केलेले आहे. तसेच मा.दिवाणी न्यायालय (सि.डी. )कोपरगाव येथे दावा स्पे.मु.नं.५६/२००२ ही कोर्टकेस दाखल केलेली आहे.

सदर कोर्ट केस संदर्भात उभय पक्षात दि.२५-१२-२००४ रोजी मा.श्री ए.बी. खांबेकर, विश्वस्त, मा.डॉ.श्री.ए.बी.गोंदकर , विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी व सर्व मा.प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत तडजोड होऊन, श्री.म.दि.धनेश्वर यांना सदर कोर्टकेसेस विनातक्रार मा.न्यायालयातून काढून घेऊन, त्यांना पुन्हा कनिष्ठ कामगार अधिकारी या पदावर सेवेत घेणेत यावे असे ठरले. व तसा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०३-२००५ रोजीचे सभेत आयत्या वेळेचा निर्णय क्र. १३६(०८) अन्वये संमत झालेला आहे. त्यास अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१७६५/२००५ दि.१०-०८-२००५ अन्वये नेमणूक आदेश देणेत आलेला आहे. त्याप्रमाणे श्री.म.दि.धनेश्वर हे दि.११-०८-२००५ पासून कनिष्ठ कामगार अधिकारी म्हणून संस्थान सेवेत कामावर हजर झाले आहेत. सदरचे नेमणूक आदेशातील कलम क्र.२ मध्ये " वरिष्ठांकडून देण्यात आलेले आदेश व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी व पालन करुन श्री.म.दि.धनेश्वर यंना त्यानुसार बिनतक्रार कामे करावी लागतील" असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. उभय पक्षात झालेल्या तडजोडीस अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांनी रु.५०/- चे स्टॅम्प पेपरवर दि.१०-०८-२००५ रोजी शिरडी येथे हमीपत्र (अंडरटेकींग) करुन दिलेले आहे. त्यामध्ये " न्यायप्रविष्ठ असलेली कोर्ट केसेस/तक्रारी मधील वादाबाबत तडजोड झालेली असून त्या तडजोडीच्या सर्व अटी व शर्ती मी समजुन घेतलेल्या आहेत. व त्या मला मान्य असून त्याच्या सत्यतेसाठी मी आज रोजी मौजे शिरडी येथे या हमी पत्राखाली सही केली आहे. त्या तडजोडीतील अटी व शर्ती संदर्भात व वरील तक्रारीत असलेल्या वादाविषयी मी येथून पुढे कोणतीही मागणी अथवा तक्रार करणार नाही. तसेच येथून पुढे संस्थान सेवेत असतांना माझ ेकडुन कोणतेही गैरकृत्य होणार नाही अथवा कोणतेही गैरकृत्य मी करणर नाही याची मी हमी देत आहे. जर संस्थान शिस्तीस बाध येणारे कोणतेही गैरकृत्य येथूनपुढे माझेकडून घडल्यास व्यवस्थापन जी शिक्षा देईल ती मला मान्य राहील. " असे म्हटलेले आहे.

श्री.म.दि.धनेश्वर यांचे संदर्भात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.६१६/२००५ ही कोर्ट केस न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यानचे काळात सदर रिट पिटीशन/कोर्टकसेस संदर्भात उभय पक्षांमध्ये समझोता/तडजोड होऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०३-२००५ रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा निर्णय क्र.१३६ (०८) अन्वये तसा निर्णय संमत झालेला आहे. त्यास अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांना माहे ऑगस्ट २००५ मध्ये नेमणुक पत्र देणेत आलेले आहे. त्याप्रमाणे श्री.म.दि.धनेश्वर हे संस्थानचे सेवेत रुजू झालेले आहेत. तथापी त्यांनी अदयापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन न दिल्यामुळे, रिटपिटीशन क्र.६१६/२००५ ही कोर्टकेस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे अदयापर्यंत प्रलंबीत असून न्यायप्रविष्ठ आहे. त्यास श्री.म.दि.धनेश्वर हेच व्यक्तीशः जबाबदार आहेत.

कारण, सदर रिट पिटीशन/कोर्टकेस संदर्भात उभय पक्षामध्ये झालेल्या समझोता/ तडजोडीस अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांनी रिट पिटीशन क्र.६१६/२००५ मा.उच्च न्यायालयातून काढून घेणेकामी, दाखल करावयाचे समझोता ॲफिडेव्हीटवर संस्थान तर्फे यापुर्वीच मा.कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी झालेली आहे. सदर समझोता ॲफिडेव्हीटवर मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव येथे उपस्थित राहून सुपरिटेंन्डट यांचेसमोर स्वाक्षरी करुन देणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९३८/२००६ दि.०६-११-२००६ रोजीचे पत्र, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९८८/२००६ दि.१०-११-२००६ रोजीचे स्मरणपत्र क्र.१, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३६१/२००७ दि.१५-०२-२००७ रोजीचे स्मरणपत्र क्र.२ , व जा.नं.एसएसएस /वशी-७ए/६२७/२००७ दि.१७-०३-२००७ रोजीचे स्मरणपत्र क्र.३ चे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले आहे. तसेच वेळोवेळी समक्ष तोंडी सुचना देखील देणेत आलेल्या आहेत. असे असतांनाही त्यांनी अदयापर्यंत समझेता ॲफिडेव्हीटवर स्वाक्षरी करुन दिलेली नाही. श्री.म.दि.धनेश्वर यांना मा.व्यवस्थापन समितीची सभा दि.१३-०२-२००५ आयत्या वेळेचा निर्णय क्र.१३६ ( ०८ ) ची प्रत, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे डिपॉझीट केलेली रक्कम रु.३,७९,२९० मात्र बाबत महीनावाईज तक्ता इत्यादी कागदपत्रे यापुर्वीच देणेत आलेली आहे. तरी देखील श्री.म.दि.धनेश्वर यांनी जाणून बुजून,हेतुपुरस्करपणे संस्थान प्रशासनास अडचणीत आणण्याचे हेतूने, अदयापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. व संस्थान प्रशासनास त्यांनी वेठीस धरलेले आहे.

उभय पक्षात झालेल्या तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे तसेच नेमणूक पत्रातील अटी शर्तीस अनुसरुन श्री.म.दि.धनेश्वर यांनी समझोता ॲफिडेव्हीट करुन देणे आवश्यक होते व त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. यावरुन श्री.म.दि.धनेश्वर हे समझोता ॲफिडेव्हीट करुन देणेस मुद्दाम टाळाटाळ करुन, प्रशासनास

जाणून बुजून अडचणीत आणेचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. श्री.म.दि.धनेश्वर हे इकडील कार्यालयीन पत्रांना, आदेशांना व वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांना जुमानत नाही तसेच ते सदर कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांमार्फत वेळोवेळी देणेत आलेल्या सुचनांचा अवमान करत आहेत. त्यांचे सदरचे कृत्य हे जाणून बुजून वेळकाढूपणाचे असून, ते प्रशासनास वेठीस धरणारे आहे. सदरचे रिट पिटीशन क्र.६१६/२००५ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे लवकरच सुनावणीकामी बोर्डावर येण्याची शक्यता आहे. त्यावेळी श्री.म.दि.धनेश्वर यांचे समझोता ॲफिडेव्हीट करुन न देण्याचे धोरणामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. तसेच श्री.म.दि.धनेश्वर यांचे कामकाजाबाबत अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे यापुढे श्री.म.दि.धनेश्वर यांची सेवा पुढे चालू ठेवावयाची किंवा कसे ? याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.

अशाप्रकारे श्री.म.दि.धनेश्वर यांना उपरोक्तप्रमाणे अनेकवेळा लेखी कळवून देखील व तोंडी समक्ष सुचना देऊन देखील त्यांनी अदयाप पर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. त्यांनी कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांचे सुचनांचा अवमान केलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य हे दि इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) रुल्स, १९५९ चे कलम २२ (ए) प्रमाणे वरिष्ठांच्या कोणत्याही कायदेशीर आणि वाजवी हुकुमांच्या बाबतीत, दुस-याच्या जोडीने असो की नसो, जाणूनबुजून उद्दामपणा करणे किंवा त्याचे पालन न करणे. कलम २२(एच) प्रमाणे कोणतीही स्टॅंडींग ऑर्डर नेहमी नेहमी मोडणे किंवा आस्थापनेस लागू असलेल्या कायदयाचा किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचा नेहमी नेहमी भंग करणे, २२ (एल) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे, या गैरशिस्त वर्तनात मोडते.

सबब, श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर, कनिष्ठ कामगार अधिकारी यांना अनेकवेळा लेखी पत्रान्वये कळवून देखील, तसेच वेळोवेळी समक्ष बोलावून देखील ते उभय पक्षात तडजोडीत ठरलेप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट करुन देत नाहीत, त्यामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. याबाबत चर्चा करणेकामी श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयात दि.०५-०९-२००७ रोजी बोलाविले होते. त्यांनी श्री.म.दि.धनेश्वर हे तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट ( कन्सेन्ट ॲफिडेव्हीट ) करुन देत नाहीत. ते प्रशासनास वेठीस धरत आहेत. अशापरिस्थितीत मा.न्यायाधिश, हायकोर्ट औरंगाबाद हे श्री.म.दि.धनेश्वर यांना कामावर कां ठेवले ? अशी सुनावणीचे वेळेस प्रशासनास विचारणा करेल व त्यावेळी मा.न्यायालयास उत्तर देणे अडचणीचे होईल. म्हणून श्री.म.दि.धनेश्वर यांना तात्काळ संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करण्यात यावे असे चर्चेअंती सांगितले आहे. तरी श्री.म.दि.धनेश्वर यांना एक महिन्याचे लेखी नोटीशी ऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम देवून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४९** **श्री.देवराम जयराम थोरात, लिपीक टंकलेखक, खरेदी विभाग यांनी व्यवस्थापन समितीचे दि.१३.०३.२००५ चे सभेत झालेल्या तडजोडीप्रमाणे समजोता ॲफिडेव्हीट करुन न दिलेबाबत.**

**निर्णय क्र.८३३** श्री.देवराम जयराम थोरात हे सहाय्यक शिक्षक म्हणून प्रथम श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व नंतर श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कुल विभागाकडे कार्यरत होते. श्री.थोरात यांची सेवा दि.३०-०४-१९९७ पासून संपुष्ठात आणली. सदर सेवा समाप्तीचे आदेशासंदर्भात श्री.थोरात यांनी संस्थान विरुध्द मा.पिठासीन अधिकारी, अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर येथे अपील क्र.३५/१९९७ दाखल केले होते. सदरच्या अपीलामधील अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांचे दि.२९-०७-१९९८ रोजीचे आदेशासंदर्भात संस्थानने श्री डी.जे.थोरात यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४०४८/१९९८ दाखल केले .

सदर कोर्ट केस संदर्भात उभय पक्षात दि.२५-१२-२००४ रोजी मा.श्री.ए.बी. खांबेकर, विश्वस्त, मा.डॉ.श्री.ए.बी.गोंदकर , विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी व सर्व मा.प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत तडजोड होऊन, श्री.डी.जे.थोरात यांना सदर कोर्टकेसेस विनातक्रार मा.न्यायालयातून काढून घेऊन, त्यांना पुन्हा लिपीक-टंकलेखक या पदावर सेवेत घेणेत यावे असे ठरले. व तसा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०३-२००५ रोजीचे सभेत आयत्या वेळेचा निर्णय क्र. १३६(०९) अन्वये संमत झालेला आहे. त्यास अनुसरुन श्री.डी.जे.थोरात यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१७६२/२००५

दि.१०-०८-२००५ अन्वये नेमणूक आदेश देणेत आलेला आहे. त्याप्रमाणे श्री.डी.जे.थोरात हे दि.१६-०८-२००५ पासून लिपीक-टंकलेखक म्हणून संस्थान सेवेत खरेदी विभागात कामावर हजर झाले आहेत. सदरचे नेमणूक आदेशातील कलम क्र.७ मध्ये " त्यांना वरिष्ठ सांगतील ती कामे बिनतक्रार करावी लागतील " असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. उभय पक्षात झालेल्या तडजोडीस अनुसरुन श्री डी.जे.थोरात यांनी रु.५०/- चे स्टॅम्प पेपरवर दि.१०-०८-२००५ रोजी शिरडी येथे हमीपत्र (अंडरटेकींग) करुन दिलेले आहे. त्यामध्ये "न्यायप्रविष्ठ असलेली कोर्ट केसेस/तक्रारी मधील वादाबाबत तडजोड झालेली असून त्या तडजोडीच्या सर्व अटी व शर्ती मी समजुन घेतलेल्या आहेत. व त्या मला मान्य असून त्याच्या सत्यतेसाठी मी आज रोजी मौजे शिरडी येथे या हमी पत्राखाली सही केली आहे. त्या तडजोडीतील अटी व शर्ती संदर्भात व वरील तक्रारीत असलेल्या वादाविषयी मी येथून पुढे कोणतीही मागणी अथवा तक्रार करणार नाही. तसेच येथून पुढे संस्थान सेवेत असतांना माझेकडुन कोणतेही गैरकृत्य होणार नाही अथवा कोणतेही गैरकृत्य मी करणार नाही याची मी हमी देत आहे. जर संस्थान शिस्तीस बाध येणारे कोणतेही गैरकृत्य येथूनपुढे माझेकडून घडल्यास व्यवस्थापन जी शिक्षा देईल ती मला मान्य राहील. " असे म्हटलेले आहे.

श्री.डी.जे.थोरात यांचे संदर्भात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४०४८/१९९८ ही कोर्ट केस न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यानचे काळात सदर रिट पिटीशन/कोर्टकसेस संदर्भात उभय पक्षांमध्ये समझोता/तडजोड होऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३-०३-२००५ रोजीचे सभेमध्ये आयत्या वेळेचा निर्णय क्र.१३६ (०९) अन्वये तसा निर्णय संमत झालेला आहे. त्यास अनुसरुन श्री.डी.जे.थोरात यांना माहे ऑगस्ट २००५ मध्ये नेमणुकपत्र देणेत आलेले आहे. त्याप्रमाणे श्री.डी.जे.थोरात हे संस्थानचे सेवेत रुजू झालेले आहेत. तथापी त्यांनी अदयापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन न दिल्यामुळे, रिटपिटीशन क्र.४०४८/१९९८ ही कोर्टकेस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे अदयाप पर्यंत प्रलंबीत असून न्यायप्रविष्ठ आहे. त्यास श्री.डी.जे.थोरात हेच व्यक्तीशः जबाबदार आहेत.

कारण, सदर रिट पिटीशन/कोर्टकेस संदर्भात उभय पक्षामध्ये झालेल्या समझोता/ तडजोडीस अनुसरुन श्री.डी.जे.थोरात यांनी रिट पिटीशन क्र.४०४८/१९९८ मा.उच्च न्यायालयातून काढून घेणेकामी, दाखल करावयाचे समझोता ॲफिडेव्हीटवर संस्थान तर्फे यापुर्वीच मा.कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी झालेली आहे. सदर समझोता ॲफिडेव्हीटवर मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव येथे उपस्थित राहून सुपरिटेंन्डट यांचेसमोर स्वाक्षरी करुन देणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९३८/२००६ दि.०६-११-२००६ रोजीचे पत्र, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९८८/२००६ दि.१०-११-२००६ रोजीचे स्मरणपत्र क्र.१, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३१४/२००७ दि.१२-०२-२००७ रोजीचे स्मरणपत्र क्र.२, व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५४१/२००७ दि.०६-०३-२००७ रोजीचे स्मरणपत्र क्र.३ चे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले आहे. तसेच वेळोवेळी समक्ष तोंडी सुचना देखील देणेत आलेल्या आहेत. असे असतांनाही त्यांनी अदयापर्यंत समझेता ॲफिडेव्हीटवर स्वाक्षरी करुन दिलेली नाही. श्री.डी.जे.थोरात यांना मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल करावयाचे समझोता ॲफिडेव्हीट मसुदयाची प्रत यापुर्वीच देण्यात आलेली आहे. तरी देखील श्री.डी.जे.थोरात यांनी जाणून बुजून,हेतुपुरस्करपणे संस्थान प्रशासनास अडचणीत आणण्याचे हेतूने, अदयापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. व संस्थान प्रशासनास त्यांनी वेठीस धरलेले आहे.

उभय पक्षात झालेल्या तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे तसेच नेमणूक पत्रातील अटी शर्तीस अनुसरुन श्री.डी.जे.थोरात यांनी समझोता ॲफिडेव्हीट करुन देणे आवश्यक होते व त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. यावरुन श्री.डी.जे.थोरात हे समझोता ॲफिडेव्हीट करुन देणेस मुद्दाम टाळाटाळ करुन, प्रशासनास जाणून बुजून अडचणीत आणणेचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. श्री.डी.जे.थोरात हे इकडील कार्यालयीन पत्रांना, आदेशांना व वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांना जुमानत नाही तसेच ते सदर कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांमार्फत वेळोवेळी देणेत आलेल्या सुचनांचा अवमान करत आहेत. त्यांचे सदरचे कृत्य हे जाणून बुजून वेळकाढूपणाचे असून, ते प्रशासनास वेठीस धरणारे आहे. सदरचे रिट पिटीशन क्र.४०४८/१९९८ हे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे लवकरच सुनावणी कामी बोर्डावर येण्याची शक्यता आहे. त्यावेळी श्री.डी.जे.थोरात यांचे समझोता ॲफिडेव्हीट करुन न देण्याचे धोरणामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यापुढे श्री.डी.जे.थोरात यांची सेवा पुढे चालू ठेवावयाची किंवा कसे ? याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.

अशाप्रकारे श्री.डी.जे.थोरात यांना उपरोक्तप्रमाणे अनेकवेळा लेखी कळवून देखील व तोंडी समक्ष सुचना देऊन देखील त्यांनी अदयाप पर्यंत समझोता ॲफिडेव्हीट करुन दिलेले नाही. त्यांनी

कार्यालयीन पत्रांचा, आदेशांचा व वरिष्ठांचे सुचनांचा अवमान केलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य हे दि इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) रुल्स, १९५९ चे कलम २२ (ए) प्रमाणे वरिष्ठांच्या कोणत्याही कायदेशीर आणि वाजवी हुकुमांच्या बाबतीत, दुस-याच्या जोडीने असो की नसो, जाणूनबुजून उद्दामपणा करणे किंवा त्याचे पालन न करणे. कलम २२(एच) प्रमाणे कोणतीही स्टॅडींग ऑर्डर नेहमी नेहमी मोडणे किंवा आस्थापनेस लागू असलेल्या कायदयाचा किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचा नेहमी,नेहमी भंग करणे, २२ (एल) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे, या गैरशिस्त वर्तनात मोडते.

सबब, श्री.देवराम जयराम थोरात, लिपीक-टंकलेखक, खरेदी विभाग यांना अनेकवेळा लेखी पत्रान्वये कळवून देखील, तसेच वेळोवेळी समक्ष बोलावून देखील ते उभय पक्षात तडजोडीत ठरलेप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट करुन देत नाहीत, त्यामुळे संस्थान व प्रशासन अडचणीत येण्याची शक्यता आहे. याबाबत चर्चा करणेकामी श्री.आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयात दि.०५-०९-२००७ रोजी बोलाविले होते. त्यांनी श्री.देवराम जयराम थोरात हे तडजोडीमध्ये ठरलेप्रमाणे समझोता ॲफिडेव्हीट ( कन्सेन्ट ॲफिडेव्हीट ) करुन देत नाहीत. ते प्रशासनास वेठीस धरत आहेत. अशापरिस्थितीत मा.न्यायाधिश, हायकोर्ट औरंगाबाद हे श्री.डी.जे.थोरात यांना कामावर कां ठेवले ? अशी सुनावणीचे वेळेस प्रशासनास विचारणा करेल व त्यावेळी मा.न्यायालयास उत्तर देणे अडचणीचे होईल. म्हणून श्री.डी.जे.थोरात यांना तात्काळ संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करण्यात यावे असे चर्चेअंती सांगितले आहे. तरी श्री.डी.जे.थोरात यांना एक महिन्याचे लेखी नोटीशी ऐवजी एक महिन्याचा नोटीस पे रक्कम देवून संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.देवराम जयराम थोरात, लिपीक-टंकलेखक यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा
(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५०** **एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटीपद्धतीने एकत्रित मानधनावर नेमणुका करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.८३४** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार सर्वश्री अजय शिवराम पांडे,गिरीश ए.चोळके,मधुकर प.गव्हाणे,गंगाधर शंकर जाधव, स्वप्नील बा.गायकवाड यांच्या कनिष्ठ अभियंते (स्थापत्य) या पदावर व श्री अमृत गंगाधर जगताप कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर एक वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने संस्थान कामगार कायदेशीर सल्लागार ॲड.अशोक पाटील यांचे सल्ल्यानुसार नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.त्यांचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | नांव व हुद्दा | नेमणूकीची तारीख | एक वर्षे कालावधी संपुष्टात आल्याची तारीख | देण्यात आलेले एकत्रीत मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री अजय शिवराम पांडे<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | रु.७०००/- |
| ०२. | श्री गिरिश एकनाथ चोळके<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | रु.७०००/- |
| ०३. | श्री मधुकर परशराम गव्हाणे<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | रु.७०००/- |
| ०४. | श्री गंगाधर शंकर जाधव<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | रु.७०००/- |
| ०५. | श्री स्वप्नील बाबासाहेब गायकवाड<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | रु.७०००/- |
| ०६. | श्री अमृत गंगाधर जगताप<br>कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) प्रसादालय विभाग | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | रु.७०००/- |

उपरोक्त अ.न.०१ ते ०६ वरिल कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांचा त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तारखेस एक वर्षे कालावधी संपुष्टात आलेला आहे.सदर कालावधीमध्ये उपरोक्त अ.नं.०१ ते ०५ वरिल कंत्राटी अभियंते यांचे काम,वर्तणूक व त्यांना यापुढे मुदतवाढ द्यावयाची झाल्यास किती कालावधीसाठी द्यावी याबाबत वरिष्ठ उपमुख्य अभियंता,स्थापत्य यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता त्यांनी " उपरोक्त ०१ ते ०५ यांचे वर्तणूक चांगली असून त्यांचेवर सोपविलेली कामे ते योग्य रितीने पुर्ण करीत आहेत त्यांचेबाबत कोणतेही प्रकरण सुरु नाही किंवा प्रस्तावित नाही.त्यांना नियमानुसार मुदतवाढ देण्यास हरकत नाही.तथापि बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात येणारे सर्व बांधकाम प्रकल्प हे कमीत कमी दोन ते तिन वर्षासाठी असतात या कालावधीत संबंधीत शाखा अभियंता व त्यांचे पर्यवेक्षणाखाली काम करणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यावर त्या प्रकल्पाची संपुर्णपणे जबाबदारी सोपविण्यात येते.त्यामुळे संबंधीत कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता यांची मुदतवाढ कमीत कमी तीन वर्षांसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे." असे अभिप्राय दिलेले असून त्यावर संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे..

तसेच अ.नं.०६ वरिल कर्मचारी श्री अमृत गंगाधर जगताप,कनिष्ठ अभियंता (दुरुस्ती व देखभाल) यांचे बाबतही अभिप्राय मागविण्यात आले असता अधिक्षक,प्रसादालय विभाग यांनी," त्यांचे वर्तणूक चांगली आहे हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचेबाबत कोणतेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावित नाहीत.त्यांना मुदतवाढ देण्यास हरकत नाही. तथापि कालावधी प्रशासनाने ठरवावा."असे अभिप्राय दिलेले असून त्यावर संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे.

तरी उपरोक्त अ.नं.०१ ते ०५ वरिल कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांचेबाबत वरिष्ठ उपमुख्य अभियंता,बांधकाम व संबधीत प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय तसेच अ.नं.०६ वरिल कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांचेबाबत अधिक्षक प्रसादालय व संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेच्या तारखेपासून पुढे एक वर्षे मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांची पुढील एक वर्षासाठी रुपये ९,०००/-एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी. दरम्यान त्यांचे नेमणूकीस शासनाची मान्यता घेण्यात यावी तसेच श्री गणेश रत्नाकर कोराटे, कनिष्ठ अभियंता यांनाही पूर्वीचेच शर्ती अटीवर दिनांक ०१.१२.२००७ पासून रुपये ९०००/- एकत्रित वेतन देण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५१** **डॉ.रुपेश अशोक जडगे, निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत**
**निर्णय क्र.८३५** डॉ.श्री रुपेश अशोक जडगे, यांची प्रथम श्री साईनाथ हॉस्पीटलकडे निवासी वैद्यकिय अधिकारी या पदावर जा.क्र.एसएसएस/वशी-१/१०९५९/२००५ दि.०१-१०-२००५ रोजीचे आदेशान्वये नेमणूक करणेत आलेली आहे. त्याप्रमाणे ते श्री साईनाथ हॉस्पीटलकडे निवासी वैद्यकिय अधिकारी म्हणून दि.०७-११-२००५ पासून कामावर रुजु झालेले आहे. त्यानंतर त्यांचे नेमणूक कालावधीची मुदत दि.०७-११-२००६ पासून ते दि.०६-११-२००७ अखेर एक वर्ष कालावधीसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-१/३७५/२००७ दि.१६ फेब्रुवारी २००७ अन्वये वाढविण्यात आलेली आहे. सध्या ते श्री साईबाबा हॉस्पीटलकडे निवासी वैद्यकिय अधिकारी या पदावर कार्यरत आहे. डॉ. जडगे यांनी खालीलप्रमाणे गंभीर स्वरुपाचे गैरशिस्त वर्तन केलेले असल्याचे श्री साईबाबा हॉस्पीटल कडील दि.१९-१०-२००७ व दि.०७-११-२००७ रोजीची निवेदने प्राप्त झालेली आहे.

१) डॉ.जडगे हे ओ.टी.,ओ.पी.डी.वार्डवर्क यापैकी काहीही काम करीत नाहीत. हजेरी मस्टरवर सही करुन ते परस्पर निघून जातात.

२) काही प्रसंगी त्यांनी नशापाणी केल्याचे लक्षात येते व अशा वेळी त्यांना स्वतःचा तोल सांभाळणेही अवघड असल्याचे आढळून आलेले आहे.

३) यापुर्वी त्यांनी संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयातही अशाच प्रकारचे गैरवर्तन केलेले आहे.

४) वरिष्ठांशी वाद घालणे, कनिष्ठ कर्मचाऱ्यांशी उध्दटपणे वागणे इत्यादी प्रकार त्यांचेकडून वारंवार झालेले आहेत व होत आहेत तसेच रुग्ण सेवेबाबत बेफिकीरी दाखवणे त्यांचे नित्याचेच झालेले आहे.

५) उपरोक्त सर्व बाबींबाबत त्यांना वरिष्ठांनी यापुर्वी तोंडी समज दिलेली आहे परंतू तरीही त्यांचे वर्तनात व वागणूकीत काहीही सुधारणा झालेली नसल्याचे दिसून येते.

६) दि.२९-०९-२००७ रोजी डॉ.जडगे हे दारुच्या नशेत तर्रर होते. इतर डॉक्टर ऑपरेशन थिएटरमध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यंत विविध ऑपरेशन करीत होते. तेव्हा डॉ.जडगे हे ऑर्थो ओ.टी.मध्ये दारुच्या अंमलाखाली झोपलेले होते.

७) दि.०२-१०-२००७ रोजी डॉ.जपे व डॉ.नेर्लीकर हे ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया करीत असतांना डॉ.जडगे हे रुग्णांच्या नातेवाईकांसमोर ऑपरेशन थिएटरच्या बाहेर नशापाणी केल्यामुळे तोल जावून खाली पडले व त्यांना उठून उभे राहणे सुध्दा अशक्य झाले होते. त्यामुळे त्यांना उचलुन दुसरीकडे हलविणे भाग पडले.

८) डॉ.जडगे यांची दि.०१-१०-२००७ ते दि.१०-१०-२००७ या काळात ओ.पी.डी.,वॉर्ड्स, ऑपरेशन थिएटर्स, कॅज्युअल्टी, इत्यादि पैकी कोठेही काम केल्याचे आढळुन येत नाही. मस्टरवर सही करुन नशापाणी केलेल्या अवस्थेत ते हॉस्पीटलमध्ये फिरत असल्याचे वेळोवेळी ध्यानात आले आहे.

त्यांच्या अशा प्रकारच्या अशोभनीय, बेजबाबदार व कर्तव्यात कसूर करण्याच्या वर्तणुकीमुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते व संस्थानचे नांवलौकीकास बाधा येऊ शकते. त्यांनी आस्थापनेच्या जागेत शिस्तीला बाधक ठरेल असे गैरकृत्य केलेले असून वरिष्ठांचे वाजवी हुकुमांचा अवमान केलेला आहे. सदर गैरशिस्तवर्तनामुळे त्यांना दि.२०-१०-२००७ पासून काम करणेस मनाई केलेली आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत डॉ.जडगे यांना जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/२९४६/ २००७ दि.२९-१०-२००७ अन्वेय कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविण्यात आलेला होता. त्याप्रमाणे त्यांनी दि.०२-११-२००७ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यात त्यांनी काही प्रसंगी नशापाणी केल्याचे मान्य केले असून, त्याबाबत वरिष्ठांची माफी मागितलेली असुन, वरिष्ठांनी याबाबत त्यांना तोंडी समज दिल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

तरी डॉ.रुपेश अशोक जडगे यांचे गैरशिस्त वर्तनाचे गांभीर्य विचारात घेता त्यांचे पुढील सेवेबाबत योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे. म्हणून डॉ.रुपेश अशोक जडगे यांना एक महिन्याचा नोटीस पे देवून, त्यांना संस्थान सेवेतुन कायम स्वरुपी कमी (टर्मिनेट) करणेत येवून, त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात यावी असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/कामगार अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५२** **श्रीसाईबाबा व साईनाथ हॉस्पिटलकडील वैद्यकिय अधिकारी यांचे नेमणूकीबाबत.**
**निर्णय क्र.८३६** श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी आर.एम.ओ तसेच रेडीओलॉजीस्ट, ऑप्थाल्मालॉजिस्ट व व्हिजीटींग सर्जन या पदावर नोकरी मिळणेबाबत खालील प्रमाणे पात्रताधारक उमेदवारांनी अर्जाद्वारे विनंती केली होती. वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी अर्जदार उमेदवारांना दि.१७/०९/२००७ रोजी बोलावून त्यांची शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता तपासून खालील प्रमाणे उमेदवार यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आवश्यकता व पदे रिक्त असल्याने नेमणूकीबाबत अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पद व वेतनश्रेणी निहाय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधास मंजूरीचे अधीन राहून,खालीलप्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ. नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. अभिजित आव्हाड, लोणी ता.राहाता | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६०८/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०२. | डॉ. उमेश एस. तोरगाली सोलापूर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६११/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०३. | डॉ. पियुश आर. ढवळे नागपूर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५१५६१०/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०४. | डॉ. अभय रमेशराव विरखाडे यवतमाळ | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६०९/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०५. | डॉ. श्रीकांत बी लासुरे अहमदनगर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५१५६०७/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०६. | डॉ. स्वाती रा. शर्मा नागपूर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६०४/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०७. | डॉ. प्रमिला व्यंकटराव आष्टेकर,निलंगा | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६०६/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०८. | डॉ. वदना एस.आग्रवाल वाशी, मुंबई | एम.डी.रेडीओलॉजी | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६०५/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | ज्यु. रेडीओलॉजीस्ट रु. २५०००/-एकत्रित वेतन |
| ०९. | डॉ. जयंत एच. वाघ, नाशिक | एम.बी.बी.एस डी.एन.बी. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५६०२/०७ दि.०१/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | व्हीजीटींग सर्जन ( लॅप्रोस्कोपी ) |
| १०. | डॉ. आनंद ग. दिवान | डी.एन.बी. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५१९२/०७ | व्हीजीटींग (न्युरोफिजीशियन ) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाशिक | (न्युरोलाजी) | दि.२२/०९/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | |
| ११. | डॉ. दिपक नाईकवाडे<br>कोपरगांव | एम.एस.(आर्थो ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५९३५/२००७<br>दि.०८/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | व्हीजीटींग (आर्थो सर्जन) |
| १२. | डॉ. एकता प्र.शेकार<br>अकोला | एम.डी.<br>स्त्रीरोग व प्रसूती | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१६४२३/२००७<br>दि.११/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | पूर्ण वेळ स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ<br>रु. ३००००/-एकत्रित वेतन |
| १३. | डॉ. राकेश पराशर<br>भोपाळ | एमएस/एमसीएच/<br>डिएनबी (युरो सर्जन ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १७०१९/२००७<br>दि.२०/१०/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | युरो सर्जन<br>रु. ३०,०००/-एकत्रित वेतन |

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलकडे उपरोक्त प्रमाणे अ.नं. ०१ ते ०७ वरील वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.), अ.नं. ०८ वरील ज्यु.रेडीओलॉजीस्ट, अ.नं. १२ वरील पुर्णवेळ स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ अ.नं. १३ वरील युरोसर्जन तसेच अ.नं.०९ वरील व्हीजिटींग मानद लॅप्रोस्कोपी सर्जन, अ.नं.१० वरील व्हीजिटींग न्यूरो फिजिशिअन व अ.नं.११ वरील व्हीजिटींग आर्थो सर्जन या पदावर केलेल्या नेमणूकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५३** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडिकल स्टाफ यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.८३७** श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी करीता मा. सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफ यांचे मंजूरीस अधिन राहून खालीलप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/ पॅरामेडीकल स्टाफ च्या एक वर्ष कालावधीसाठी नेमणूका करण्यात आलेल्या होत्या.सदर एक वर्षाचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर संदर्भीत जा.नं.एसएसएस/वशी-०१/३७५/२००७ दि. १६/०२/२००७ अन्वये त्यांना पुन्हा एक वर्ष मुदतवाढ देण्यात आलेली असून सदरची एक वर्ष मुदतवाढ खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे संपुष्ठात आलेली आहे./येत आहे. तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल कडे नेमणूका करण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ. ) यांच्याही खालील त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे एक वर्ष कालावधी संम्पुष्ठात आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूका करण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी तसेच पॅरामेडीकल स्टाफ यांना मुदतवाढ देणेकामी वैद्यकिय संचालक व श्री साईनाथ हॉस्पीटल कडे नेमणूका करण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) यांना मुदतवाढ देणेकामी वैद्यकिय अधिक्षिका यांचेकडून कामाचा अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी खालील प्रमाणे संबंधीताचे बाबत त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे अहवाल दिलेले आहेत.

| अ.नं. | नांव व पदनाम | नेमणूक दिनांक | मुदतवाढ संपुष्ठात येत असलेची तारीख | कामाबाबतचा अहवाल /अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. दादासाहेब लु.कांबळे<br>असो. कन्सलटंट (त्वचारोग)<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १४/१०/२००५ | १३/१०/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०२. | डॉ. कुलदिप रविंद्र वाघ<br>असो. कन्सलटंट (स्त्रीरोग व पसुती) श्री साईबाबा हॉस्पीटल | ०६/१०/२००६ | ०५/१०/२००७ | (दि.२८/११/२००७ रोजीचे गोपनीय अहवालानुसार)<br>सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०३. | डॉ. सुभाष श्रीराम शामकुंवर<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ)<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १७/१०/२००५ | १६/१०/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०४. | डॉ. सचिन दिलीप खोचीकर<br>क्लिनीकल असि.(भूलतज्ञ)<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०६/१०/२००५ | ०५/१०/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०५. | डॉ. सुर्यकांत रा. पाटील<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ)<br>श्री साईनाथ हॉस्पीटल | ०६/१०/२००५ | ०५/१०/२००७ | सदर उमेदवार साईनाथ रक्तपेढीत काम करत असून त्यांचे काम उत्तम आहे. त्यांची वर्तणूकही उत्तम आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| ०६. | डॉ. विवेक रा.राऊत<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.)<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०७/०९/२००६ | ०६/०९/२००७ | सदर उमेदवाराची ०१ वर्षे मुदतवाढ करणेस हरकत नाही. |
| ०७. | डॉ.स्वाती सुभाषचंद्र आढाव<br>रेडीओलोजीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०९/११/२००६ | ०८/११/२००७ | डॉ. स्वाती आढाव यांची नेमणूक एक वर्षासाठी केलेली असून त्या दि.०९/११/२००७ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दि.०८/११/२००७ अखेर संम्पुष्ठात येत आहे. सदर कालावधीमध्ये त्यांची वर्तणूक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | समाधानकारक असून त्या हकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करत आहेत. त्यांचे बाबत कुठलेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी. |
| ०८. | डॉ.रुपेश अशोक जडगे<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.)<br>श्री साईबाबा हॅस्पीटल | ०७/११/२००५ | ०६/११/२००७ | **वैद्यकिय संचालक यांचे अभिप्राय-**<br>सदर उमेदवाराचे मुदतवाढीचे कालावधीत वर्तणूक अशोभनिय, बेजबाबदार, व कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास आले आहे. ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करत नाहीत. जा.नं.एसएसएस/वशी-०७अे/२९४६ दि.२९/१०/२००७ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.<br>वरील सर्व बाबीचा विचारकरता डॉ.रुपेश जडगे यांना मुदतवाढ देण्यात येऊ नये.<br>**प्रशासकिय अधिकारी (रुग्णालये )**<br>मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेपुढे यापूर्वी नोट ठेवून मान्यता घेतलेली आहे. संबंधीतांना कामावर येणेस बंदी आहे. त्यामुळे मुदतवाढ देणेत येऊ नये त्यामुळे दि.०७/११/२००७ पासून सेवा समाप्त करणेत यावी . |
| ०९ | श्री. अनिल आप्पा पवार<br>सी.टी.स्कॅन टेक्निशियन<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २४/०९/२००५ | २३/०९/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १० | श्री. वैभव विलास पडीत<br>ज्यु. बायोमेडीकल इंजिनियर<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १८/०४/२००६ | १७/१०/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| ११. | श्रीमती वनिता आनंदराव अमोलीक स्टाफनर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २८/०४/२००६ | २७/१०/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १२ | डॉ.हेतल नविनचंद्र शहा<br>नेत्ररोग तज्ञ<br>श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी | २५/०१/२००७ | २४/०१/२००८ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १३ | डॉ.श्रीकांत मधुकर नागरे<br>वै.अधिकारी आर.एम.ओ<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १८/१२/२००६ | १७/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १४ | श्री रविंद्र बाळासाहेब नवले<br>एच.आर.मॅनेजर<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २१/१२/२००६ | २०/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १५ | श्री किशोर साहेबराव गवळी<br>ज्यु.इ.डी.पी.मॅनेजर<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०६/१२/२००६ | ०५/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १६ | श्रीमती शोभा गेणू गाडेकर<br>सोशल वर्कर<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४/१२/२००६ | ०३/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १७ | कु.कमल भिमराज तांबे<br>स्वागतिका<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १८ | श्री बाळासाो.काशिनाथ संत<br>ज्यु.सि.टी.स्कॅन टेक्निशियन<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०५/१२/२००६ | ०४/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| १९ | श्री विनोद सोमनाथ जाधव<br>ज्यु.सि.टी.स्कॅन टेक्निशियन<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०७/१२/२००६ | ०६/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २० | श्री संतोष बाबासाो.गावडे<br>स्टॉफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४/१२/२००६ | ०३/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २१ | श्री संतोष नामदेव कोटकर<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४/१२/२००६ | ०३/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | कु.छाया रावसाहेब सदाफळ<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०७/१२/२००६ | ०६/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २३ | कु.स्मिता सुधाकर तांबे<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०८/१२/२००६ | ०७/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २४ | सौ.शबाना अय्याज कादरी<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ११/१२/२००६ | १०/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २५ | कु.वैशाली विलास बोधक<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १८/१२/२००६ | १७/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २६ | कु.शहनाज व.पठाण<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | १९/१२/२००६ | १८/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २७ | श्री भिवसेन गंगाधर कांडेकर<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २७/१२/२००६ | २६/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २८ | कु.मंगला सोहजर त्रिभुवन<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ३०/१२/२००६ | २९/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| २९ | श्री भाऊसाहेब कु. कुमकर<br>स्टाफ नर्स<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०५/१२/२००६ | ०४/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| ३० | श्री.पंकज विजय कांबळे<br>ज्यु.एक्स-रे टेक्निशियन<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | ०६/१२/२००६ | ०५/१२/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| ३१ | डॉ.शितल ज्ञानेश्वर उंडे<br>ज्यु.डेन्टीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | २८/११/२००६ | २७/११/२००७ | सदर उमेदवाराचे काम चांगले असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच त्या हुकूमाप्रमाणे काम करतात.त्यांचे बाबतीत काही प्रकरणे नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील एक वर्षाची मुदतवाढ देणेस हरकत नाही |
| ३२. | श्री. महेंद्र विलासराव तांबे<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.)<br>श्री साईनाथ हॉस्पीटल | ११/०९/२००६ | १०/०९/२००७ | काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ३३. | डॉ.रविंद्र गणपत अंत्रे<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.)<br>श्री साईनाथ हॉस्पीटल | ११/०९/२००६ | १०/०९/२००७ | काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ३४. | डॉ. रमेश चंदू जाधव<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.)<br>श्री साईनाथ हॉस्पीटल | २१/०९/२००६ | २०/०९/२००७ | काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. मुदतवाढ देणेस हरकत नाही. |

वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार उपरोक्त अ.नं. ०१ ते ०७ व ०९ ते ३१ वरील वैद्यकिय अधिकारी तसेच पॅरामेडीकल कर्मचारी यांचे नेमणूकीची मुदत एक वर्षाकरीता वाढविण्यास व अ.नं.०८ वरील डॉ.रुपेश जडगे वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) यांचे बाबत वैद्यकिय संचालक व प्रशासकिय अधिकारी रुग्णालये यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करणेस तसेच वैद्यकिय अधिक्षिका श्री साईनाथ हॉस्पीटल शिरडी यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार अ.नं. ३२ ते ३४ वरील वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) यांचे नेमणूकीची मुदतवाढ एक वर्षाकरीता वाढविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५४** **श्रीरामपूर भू-संपादन कक्ष व कक्षातील कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत.**
**निर्णय क्र.८३८** संस्थानकरीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा.उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे.या कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | नायब तहसिलदार संवर्गातील | कंन्सलटंट | ०१. | रु. ७,०००/- |
| ०२. | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु. ४,५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०२ | रु. ४,०००/- |
| ०४. | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१ | किमान वेतनानुसार |
| | | **एकूण** | **०५.** | |

सदरहू कक्षाकडे भू-संपादनासाठी एकूण सहा प्रकरणे कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहेत. या कक्षाला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली असून जा.नं.एसएसएस/वशी-०१/४२६०/२००७ दि.१५/०३/२००७ अन्वये सदर कक्षाची व कक्षातील कर्मचाऱ्यांची वाढविण्यात आलेली मुदत दि.३१/१०/२००७ अखेर संपुष्टात येत आहे.

मा.उपविभागीय अधिकारी यांनी क्र.कावि/भूसं-०२/१३८०/२००७ श्रीरामपुर दि.२६/०९/२००७ अन्वये "भूसंपादन करावयाच्या ९ प्रकरणांसाठी जा.नं.एसएसएस/वशी-०१/४२६०/२००७ दि.१५/०३/२००७ अन्वये ज्या पदांना मान्यता दिलेली आहे.व त्या प्रमाणे जे कर्मचारी नेमलेले आहेत.तसेच मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने अतिरिक्त दोन लावण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी या कार्यालयात कार्यरत आहेत.त्या सर्वांना दि.०१/११/२००७ ते दि.३१/१०/२००८ अखेर मान्यता देणेस विनंती आहे.वरिल कर्मचाऱ्यांकडून सध्या श्रीरामपूर भू-संपादन कक्षाकडे सध्या चालू असलेली ०९ प्रकरणे व नव्याने वाढलेली ०९ प्रकरणे अशी एकूण १८ प्रकरणे जलदगतीने करुन घेता येतील.उपरोक्त चालू प्रकरणांबाबतचा तपशील सोबत जोडलेला आहे.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपुर भाग श्रीरामपुर यांनी केलेल्या विनंती व अभिप्रायानुसार श्रीरामपुर भू-संपादन कक्ष व कक्षाकडील उपरोक्त प्रमाणे मंजूरी दिलेले व मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने नव्याने दोन नेमण्यात आलेले कुशल कंत्राटी कामगार यांना दि.०१/११/२००७ पासून पुढे एक वर्षे मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपुर भाग श्रीरामपुर यांनी केलेल्या विनंती व अभिप्रायानुसार श्रीरामपुर भू-संपादन कक्ष व कक्षाकडील नव्याने दोन नेमण्यात आलेले कुशल कंत्राटी कामगार यांना दि.०१/११/२००७ पासून पुढे सहा महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५५** **कार्यकारी संपादक साईलिला यांचे मुदतवाढीबाबत.**
**निर्णय क्र.८३९** श्री.विद्याधर ताठे, पत्रकार पुणे यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/१५४९२/९५ दि.०४/१२/१९९५ चे नेमणूक आदेशान्वये श्री साईलिला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादक या पदावर कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर प्रथमतः एक वर्षासाठी नेमणूक करण्यात आली होती.त्यानंतर त्यांच्या नेमणूकीची मुदतवाढ वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार श्री साईलीला संपादकीय कार्यालय मुंबई येथून शिरडी येथे स्थलांतरीत होत असल्याने व श्री साईलीला अंकाची छपाई मुंबई येथूनच होणार असल्याने सदर कामासाठी पुणे ते मुंबई येथे जाणे-येणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाचे पास खर्चासह आठवडयातून किमान दोन दिवस मुंबई येथे कार्यालयात काम करण्याचे व शिरडी ते पुणे जाणे-येणेचे लक्झरी बसचे (व्हाल्वो) प्रवास भाडेच्या खर्चासह आठवडयातील एक दिवस शिरडी येथे कार्यालयात काम करण्याचे अटीवर दरमहा रु.८,०००/- (रु.आठ हजार) मात्र या सुधारित वित्तलब्धीवर श्री.विद्याधर ताठे कार्यकारी संपादक श्री साईलीला यांच्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीच्या नेमणूकीची दि.०१/१०/२००५ पासून पूढे एक वर्षासाठी वाढविण्यात आलेली होती. सदरची मुदत दि. ३०/०९/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

सध्या श्रीसाईलीला मासिकाचे छपाईचे काम मुंबई येथूनच होत आहे. अद्यापपावेतो श्री साईलीला संपादकीय कार्यालय मुंबई येथून शिरडी स्थलांतरीत करणेबाबतची कार्यवाहीच्या दृष्टीने शिरडी येथील कार्यालयात सुविधा करण्यात आलेल्या आहेत. पैकी श्री साईलीला च्या जुलै-ऑगष्ट २००६ अंकाचे चालू असलेले पोस्टीग व श्री साईलीला अंकाचे पोस्टिंग शिरडी येथून करण्याकामी परवानगीसाठी श्रीरामपूर टपाल विभागाने मागणी केलेल्या बाबींची पूर्तता होऊन त्यांची परवानगी मिळताच त्वरीत शिरडीस स्थलांतर होऊन श्री साईलीलाच्या कामकाजास सुरुवात होईल असे श्री विद्याधर ताठे संपादक श्री साईलीला व संपादकीय कार्यालय कर्मचारी वृंद यांनी कळविले आहे.

श्री.विद्याधर ताठे यांच्या सेवेची संस्थानला आवश्यकता असल्याने त्यांना यापूर्वी कंत्राटी पध्दतीचे नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशास अनुसरुन श्री साईलीला अंकाची छपाई मुंबई येथूनच होणार असल्याने सदर कामासाठी पुणे ते मुंबई येथे जाणे-येणेसाठी रेल्वेच्या प्रथम वर्गाचे पास

खर्चासह आठवडयातून किमान दोन दिवस मुंबई येथे कार्यालयात काम करण्याचे व शिरडी ते पुणे जाणे-येणेचे लक्झरी बसचे (व्हाल्वो) प्रवास भाडेच्या खर्चासह आठवडयातील एक दिवस शिरडी येथे कार्यालयात काम करण्याचे अटीवरदरमहा रु.८,०००/- (रु. आठ हजार ) मात्र या सुधारित वित्तलब्धीवर श्री विद्याधर ताठे कार्यकारी संपादक श्री साईलीला यांच्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीच्या नेमणूकीची मुदतवाढ दि.०१/१०/२००७ पासून पुढे एक वर्षासाठी वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री विद्याधर ताठे कार्यकारी संपादक श्री साईलीला यांच्या कॉन्ट्रॅक्ट पध्दतीच्या नेमणूकीची मुदतवाढ दि.०१/१०/२००७ पासून पुढे सहा महिन्यांकरीता पूर्वीचेच अटी शतीवर वाढविण्यात यावी. दरम्यानचे काळात वर्तमानपत्रात जाहिरात देऊन कार्यकारी संपादक, साईलीला या पदावर नेमणूक होणेकामी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५६** **डॉ.आर.जी.ढवळे,वैद्यकीय संचालक, यांचे मुदतवाढीबाबत.**
**निर्णय क्र.८४०** डॉ. आर.जी. ढवळे यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७११६/२००६ दि.०९/१२/२००६ अन्वये व जा.नं.एसएसएस/वशी-०१/५०९०/२००७ दि.२९/०३/२००७ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय संचालक या पदावर प्रथम सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०१/१२/२००६ रोजी कामावर हजर झाले आहेत.

उपरोक्त मुदत संपलेवर जा.नं एसएसएस/वशी-०१/१३६१/२००७ दि. ३१/०५/२००७ अन्वये त्यांना सहा महिने मुदतवाढ देण्यात आली. दि. ३१/०५/२००७ अन्वये त्यांची वाढविण्यात आलेली ती सहा महिन्यांची मुदत दि.३०/११/२००७ रोजी संपुष्ठात आल्याने त्यांचे उपरोक्त नेमणूकीचे तसेच मुदतवाढीचे कालावधीमध्ये त्यांचे काम व वर्तणूक कशी आहे ? तसेच सेवानियम व हुकूमाप्रमाणे कामे करतात किंवा कसे ?त्यांना पुढील मुदतवाढ द्यावी अगर कशी ? तसेच त्यांचे सेवेची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०१/२९०९/२००७ दि. २३/१०/२००७ अन्वये संबंधीत प्रशासकिय अधिकारी यांचा अहवाल मागविण्यात आला होता.

त्यानुसार " सध्या हॉस्पीटलचा व्याप वाढलेला आहे. श्री. आर.जी.ढवळे हे सेवेतून रिटायर्ड आहेत. रुग्णालयास यापुढे अनेक सुधारणा करावयाच्या आहेत. आपणांस वयोमर्यादा जवळपास ५० ते ५५ या वयाचे दरम्यान असणे गरजेचे आहे. त्यामुळे वाढता व्याप लक्षात घेता तरुन अनुभवी कुशल प्रशासन सांभाळणारी व्यक्ती असणे पुढील कालावधीसाठी गरजेचे आहे. अशा व्यक्तींची नेमणूक करावी. असे अभिप्राय संबंधीत प्रशासकिय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

प्रशासकिय अधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता वैद्यकिय संचालक या पदावर उमेदवाराची नेमणूक करणे कामी जाहीरात देणे, अर्ज बोलाविणे,मुलाखती घेणे योग्य उमेदवाराची निवड होऊन संबंधीत उमेदवार कामावर हजर होईपर्यंत डॉ.ढवळे वैद्यकिय संचालक यांना त्यांचे मुदतवाढीचा कालावधी संपुष्ठात आलेच्या तारखेपासून पुढे तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ किंवा नविन वैद्यकिय संचालक हजर होईल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत डॉ. ढवळे यांची मुदतवाढ करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच डॉ.ढवळे यांनी ओ.पी.डी ऐवजी श्री साईबाबा हॉस्पिटलचे प्रशासनात पूर्ण लक्ष द्यावे व शिस्त आणावी याबाबत त्यांना सूचना द्याव्यात. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ५७** **वैद्यकीय घनकचरा टाकणेकामी प्लॅस्टिक ड्रम व बकेट खरेदीबाबत**
**निर्णय क्र.८४१** श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात दररोज तयार होणारा घन कचरा यांची विल्हेवाट लावणेकामी महाराष्ट्र राज्य पोलूशन कंट्रोल बोर्ड यांचे नियमानूसार सदरचा कचरा विल्हेवाट करणेसाठी अहमदनगर येथे बायोक्लीन सिस्टम यांचेकडे पाठविण्यात येत असतो. अहमदनगर येथे वैद्यकिय घनकचरा पाठविणे पूर्वी तो रुग्णालयात विविध प्रकारच्या कलर असलेल्या पिवळ्या, हिरवा, निळा या रंगाच्या पिशव्यांमध्ये ठेवावा लागतो. सध्या आपणाकडे अशा कलरच्या बादल्या व ड्रम शिल्लक नाही. त्या नव्याने खरेदी कराव्या लागणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

**अ) १५ लिटर क्षमतेच्या बादल्या बिगर झाकणाच्या :-**

| अ. नं. | रंग | साईबाबा रुग्णालय | साईनाथ रुग्णालय | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | हिरवा | ३० | ३० | ६० |
| २ | पिवळा | ३० | ३० | ६० |
| ३ | निळा | ३० | ३० | ६० |
| | | | एकूण | १८० |

अंदाजे किंमत प्रती नग रु.६५ x१८० = ११७००.००

ब) १०० लिटर क्षमतेचे ड्रम बिगर झाकणाच्या :-

| अ. नं. | रंग | साईबाबा रुग्णालय | साईनाथ रुग्णालय | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | हिरवा | १५ | १५ | ३० |
| २ | पिवळा | १५ | १५ | ३० |
| ३ | निळा | १५ | १५ | ३० |
| | | | एकूण | ९० |

अंदाजे किंमत प्रती नग रु.४०८ X ९० = ३६७२०.००

तरी उपरोक्त प्रमाणे अ व ब मध्ये नमूद केल्या प्रमाणे प्लास्टीक बादल्या व ड्रम खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ४८,४२०/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५८** **संस्थान अधिनियम दुरूस्ती,नियम दुरूस्ती व विनियमाचे मसूदे विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे सादर करणेबाबत..**

**निर्णय क्र.८४२** मा.सुधाकर जोशी,पुणे यांचेवर सोपविलेल्या कामापैकी खालील मसूदे तयार करून दिलेले आहेत.

१) अधिनियम दुरूस्ती. २) नियमावली दुरूस्ती.

३) सभा कामकाज नियमावली. ४) सल्लागार समिती नियमावली.

५) छाननी समिती नियमावली. ६) भक्त मंडळ सभा विनियम.

७) भक्त मंडळ सदस्यत्वाच्या अटी/शर्ती.

दि.१४/१०/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदर मसूदे मान्यतेसाठी सादर करण्यात आले.सदर सभेत मा.सुधाकर जोशी सो़ पुणे हे समक्ष उपस्थित होते.त्यांनी तयार केलेले वरीलप्रमाणे मसूद्यांची सविस्तर माहीती सभेस करून दिली.यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त टप्पा क्र.१ मधील सादर केलेल्या मसूद्यांची नोंद घेण्यात येऊन सदर मसूदे व्यवस्थापन समितीचे मा.सदस्यांना पाठवून याबाबत त्यांचे अभिप्राय/दुरूस्त्या लेखी स्वरूपात मागविण्यात याव्यात असे ठरले.

जा.नं.एसएसएस-वशी४-१७५४९-२००७ दिनांक २७.१०.२००७ चे पत्रानुसार मा.सदस्य यांचेकडून १० दिवसांचे आंत त्यांचे अभिप्राय मागविणेत आले त्यावर काही मा.सदस्यांनी सदर बाबत मराठी भाषांतराची मागणी केलेवरून जा.नं.एसएसएस-वशी४-१८३५७-२००७ दिनांक १६.११.२००७ पत्रानुसार त्यांना अधिनियम दुरूस्ती व नियमावली दुरूस्तीच्या संक्षिप्त मराठी भाषांतराच्या प्रती पाठविण्यात आल्या तथापी दि.८/१२/२००७ पावेतो कोणत्याही मा.सदस्यांकडून अभिप्राय/दुरूस्त्या सुचविण्यात आलेल्या नाहीत.उपरोक्त मसूदे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,अभिलेखाकक्ष )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५९** **संस्थान कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय उपचारावर डॉक्टरांना मोबदला देणेबाबत.**

**निर्णय क्र.८४३** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मानधन व पगारावर नियुक्त करण्यात आलेल्या डॉक्टरांमध्ये फरक न करता कामाचे प्रमाणात मोबदला देण्याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये ठराव झालेला आहे. त्यानुसार डॉक्टरांना मासिक वेतन/ मानधना व्यतिरिक्त कामाचे प्रमाणात संस्थान कर्मचारी सोडुन इतर सर्व रुग्णांच्या वैद्यकिय उपचाराचे विशिष्ट प्रमाणात मोबदला देण्यात येत आहे. ह्दय शस्त्रक्रिया विभागात संस्थान कर्मचाऱ्यांच्या उपचारावर मे- २००७ पर्यंत कामाचे प्रमाणात मोबदला देण्यात आलेले आहे. जुन पासुन पुढील निर्णय होईपर्यंत थांबविण्यात आला आहे.

सुरवातीला आर्थिक वर्ष २००६-२००७ मध्ये संस्थान कर्मचाऱ्यांनी प्रथम श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये सेवा घ्यावी व त्या ठिकाणी उपलब्ध नसलेल्या सेवेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये घेण्यात यावा व त्यानुसार ह्दय शस्त्रक्रिया विभागात कर्मचाऱ्यांनी सेवा घेतल्यावर त्यावर मोबदला देण्यात आलेला आहे. इतर वैद्यकिय उपचारावर मात्र मार्च- २००७ पर्यंत मोबदला मिळण्यासाठी तोंडी मागणी करत आहेत.

तरी आर्थिक वर्ष २००७-२००८ या वर्षात संस्थान कर्मचाऱ्यांच्या उपचारावर डॉक्टरांना मोबदला देण्याबाबत चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, हॉस्पिटलमध्ये देण्यात येणाऱ्या चॅरीटीवर इन्सेन्टीव्ह देण्यात येत आहे. त्यामुळे संस्थान कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही उपचारावर माहे मे- २००७ पासून इन्सेन्टीव्ह देण्यात येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ६० मंदिर परिसरात आंध्र बँकेच्या ATM साठी दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८४४** आंध्र बँकेच्या सर्व ATMवर श्री साईभक्तांना ऑन लाईन देणगी देण्याची सुविधा व्हावी या हेतूने मा.व्यवस्थापन समितीने बँकेच्या ATM साठी मंदिर परिसरात एक वर्षाच्या करारावर मासिक भाडे रुपये १०,०००/- घेऊन बँकेस जागा भाड्याने दिली आहे. या जागेच्या करारनाम्याची मुदत नोव्हेंबर २००७ मध्ये संपत आहे. आंध्र बँकेने दिनांक १.१२.२००७ च्या पत्रान्वये सदर करारनाम्याची मुदत वाढवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

आंध्र बँक संस्थानला पुरवित असलेल्या सेवांचा विचार करता बँकेच्या ATM साठी मंदिर परिसरामध्ये देण्यात आलेले जागेचे भाडे आकारणी पूर्वीच्याच रुपये १०,०००/- प्रमाणे करुन पूढील एक वर्षासाठी करारनाम्याचे नुतनीकरण करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/विधी अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६१ गुंतवणूकीबाबत.**

**निर्णय क्र.८४५** संस्थानचे बचत खात्यामध्ये सध्या रुपये ९.०० कोटीच्या पूढे रक्कम शिल्लक आहे. शिल्लक असलेल्या रकमेपैकी साधारणतः दैनंदिन खर्च व मोठ्या प्रमाणावरील ठेकेदारांचे देयके यासाठी रक्कम राखून ठेवून साधरणतः रुपये ६.०० कोटीपर्यन्त रक्कम आज अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहे. सदरची उपलब्ध असलेली रक्कम ही नियमित सेवा देणाऱ्या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत जास्त सेवा मिळविता येतील . विश्वस्तव्यवस्थेचे सन २००५-२००६ चे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच जास्तीत जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखपरिक्षक यांनी सुचविले आहे.

संस्थानला प्रामुख्याने खालील राष्ट्रीयकृत बँकाकडून सेवा मिळतात.

०१. युनियन बँक ऑफ इंडिया,शिर्डी
०२. सेंट्रल बँक ऑफ इंडिया,शिर्डी
०३. आंध्र बँक,शिर्डी
०४. स्टेट बँक ऑफ इंडिया,शिर्डी-कोपरगांव
०५. बँक ऑफ बरोडा,कोपरगांव
०६. बँक ऑफ बरोडा,नाशिक
०७. बँक ऑफ महाराष्ट्र,शिर्डी

उपरोक्त सातही बँकांकडून व्याजदर मागविण्यात आलेले असून त्याचा तपशिलवार तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर तक्त्यातील जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकांकडे उपलब्ध होणारी रक्कम रुपये ०६ कोटी गुंतवणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, तक्त्यात दर्शविलेल्या व्याजदरापेक्षा जास्तीत जास्त व्याजदर देणेबाबत सर्व बँकांकडे विचारणा करण्यात यावी व त्यानंतर ज्या बँका जास्तीत जास्त व्याजदर देतील अशा बँकांकडे उपलब्ध रक्कम समप्रमाणात गुंतविण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६२ मा.कार्यकारी अधिकारी यांचे खाजगी निवासस्थानासाठी पाणीपुरवठा करणेबाबत.**

**निर्णय क्र.८४६** मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ०८.१२.२००७ चे अर्जान्वये शिर्डी येथील रहिवासासाठी स्वमालकीचे घर श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटी शेजारी बांधीत असून त्यासाठी हौसिंग सोसायटीमधील रहिवाशी कर्मचाऱ्यांप्रमाणे पाणी कनेक्शन मिळावे व त्याबाबत होणारा पाणीपट्टी चार्ज ते इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे भरणेस तयार आहे.

तरी त्यांना १/२" पाईपलाईनमधून पाणी कनेक्शन द्यावयाचे झाल्यास ते श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटीचे टँकमधून देता येईल व सदरची पाणीपट्टी श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटीमार्फत वसूल करण्यात येऊन संस्थानकडे करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६३ मा. कोपरगांव येथील मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात रे.मु.नं दरखास्त नं १ /९० व दरखास्त नं ५/९० सय्यद रतनभाई सय्यद वगैरे विरुध्द महाराष्ट्र शसन महसूल खाते वगैरे या कोर्ट केस बाबत.**

**निर्णय क्र.८४७** मा. कोपरगांव येथील मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दरखास्त नं १ /९० व दरखास्त नं ५/९० सय्यद रतनभाई सय्यद वगैरे विरुध्द महाराष्ट्र शसन महसूल खाते वगैरे ही कोर्ट केस चालू असून सदर केसचे कामकाज संस्थान मार्फत श्री. एस.डी. कुलकर्णी पहात आहे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात संस्थान विरूध्द सय्यद रतनभाई सय्यद वगैरे

दरखास्त नंबर १/९० या दरखास्तचे काम चालू आहे. त्याचप्रमाणे दरखास्त नंबर ५/९० सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द संस्थान या दरखास्तीचे काम चालू आहे.

संस्थानचे दक्षिणेकडील ३० गुंठे जागेबाबत महाराष्ट्र शासन, मा. कलेक्टर व संस्थान हयांचेमध्ये दि २०/०८/१९७९ रोजी दिवाणी दावा नं ६००/७६ मध्ये झालेल्या सुलेनामाच्या अनुषंगाने अंमलबजावणी हा प्रस्तुतचे दरखास्तचा विषय आहे. मध्यतंरी दि.२१/०५/२००४ रोजीच्या मा. कोर्टाच्या आदेश झालेनंतर या जागेमधील १०१, ५६ दुकानदारांनी मा. सुप्रीम कोर्टापर्यंत अपिल दाखल केले होते. परंतु सदरचे दुकानदारांचे अपिले फेटाळण्यात आले आहे. उर्वरित ४५ दुकानदारांना प्रस्तुत जागेवरुन काढून टाकणेसाठी महाराष्ट्र शासनाने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरगांबाद येथे रिट पिटीशन नं ५८३९/२००४ दाखल केले आहे. त्यामध्ये निकालाचे अनुषंगाने प्रकरण पुन्हा निकालासाठी कोपरगांव कोर्टात आले आहे. प्रकरणी ॲड. श्री. एस.डी. कुलकर्णी हे कोपरगांव कोर्टात या दरखास्त बाबतचे काम संस्थानचे वतीने पहात आहे.

कोपरगांव मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दरखास्त नं ०५/९० कोर्ट केसची तारीख ०७/१२/२००७ रोजी नेमण्यात आलेली होती. तत्पूर्वी सदर केसच्या बाबत संस्थानचे वतीने ॲफेडिव्हीट दाखल करावे लागणार असे संस्थान ॲडव्होकेट श्री. एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांनी सांगितले होते. त्यानुसार याकामी ॲडव्होकेट श्री. एस.डी. कुलकर्णी ॲफेडिव्हीट ड्राफट तयार करून दिलेला आहे. दि ०७/१२/२००७ रोजी संस्थानचे वतीने मा. कार्यकारी अधिकारी साो. श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांनी या टिपणी सोबत जोडलेल्या ॲफेडिव्हीट नुसार मा. कोपरगांव येथील मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दाखल केलेले असल्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६४** **मा. कोपरगांव येथील मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात स्पे.मु.नं १०९/ २००७ मधुकर यंशवंत देशमुख - वादी विरुध्द साईबाबा संस्थान - प्रतिवादी या कोर्टकेस बाबत.**

**निर्णय क्र.८४८** मा. कोपरगांव येथील मे. सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात स्पे.मु.न १०९/ २००७ मधुकर यंशवंत देशमुख - वादी विरुध्द साईबाबा संस्थान - प्रतिवादी अशी कोर्ट केस चालू आहे सदर केस श्री. मधुकर यशवंत देशमुख यांनी संस्थानचे विरुध्द दाखल केलेली आहे. मुळ केस नं ३९४/९९ असा होता मा. राहाता येथील कोर्टात सदरची केस वर्ग झाली होती. सदर दावा वादी डॉ. मधुकर यंशवंत देशमुख यांनी संस्थानचे विरुध्द दाखल केलेला आहे. दि ११/०५/१९९९ रोजी त्यांना संस्थानने बडतर्फ कामावरुन कमी केले. त्याची सेवा संपुष्टात आणली. या कारणांसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यांत वादीने खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

०१) प्रतिवादीनी संस्थानने तारीख ११/०५/१९९९ रोजी केलेली वादीची बडतर्फी ही बेकायदेशीर व अन्याय, व्हाईड,ॲबइनिशिओ असल्याचे ठरवून जाहीर होवून मिळावे.

०२) वादीस डॉ. देशमुख मधुकर यंशवंत, उपमुख्य वैद्यकीय अधिकारी या पदावर सन १९८२ पासूनची सेवा, सेवाकाल अखंडीत आहे असे धरून फेरनेमणूक करणेचा प्रतिवादीचे विरुध्द मॅण्डेटरी इंजेक्शनचे स्वरुपात हुकूम करणेत यावा.

०३) वादीचे ताब्यात प्रतिवादी संस्थानची राहण्याची क्वार्टर नं ०१ हॉस्पिटल आवारात आहे. त्या क्वार्टरचे वादीचे शांततामय ताबे वहिवाटीस प्रतिवादींनी स्वतः अगर इतरांकरवी हिस्सा हरकत करू नये, वादीकडून बळजबरीने व अन्याय मार्गाने सदर क्वार्टरचा ताबा स्वतः अगर इतरामार्फत घेवू नये. त्याचप्रमाणे वादीस या क्वार्टरमध्ये सध्या उपलब्ध असलेला वीज, पाणी, टेलिफोन, सॅनिटरी वा व अन्य सेवा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मार्गाने स्वतः अगर इतरामार्फत खंडीत करू नयेत. असा प्रतिवादीचे विरुध्द मनाई हुकूम ठेवावा.

०४) या दाव्याचा संपूर्ण वकीलफी सह खर्च व इतर व न्याय दाद दयावी ही वादीची विनंती.

सदर दावा पुनश्चः कोपरगांव कोर्टात वर्ग झाला आहे. वादीने प्रस्तुतचे दाव्यांत काही Amendment करणेसाठी अर्ज दिला आहे. वादीने मुळचे दाव्यांतील विनंतीस अनुसरून मा. कोर्टाचा हुकूम न झाल्यास संस्थानचे सेवानियमाप्रमाणे उर्वरित कालावधीचा पगार रक्कम, मानसिक त्रासाबद्यल नुकसान भरपाई, बदनामी अशी रुपये २५,०४,५०७ /- नुकसान भरपाई मिळावी अशी दुरुस्ती दाव्यात होणेसाठी सदरचा दि ०३/०९/२००४ चा अर्ज त्यांनी दाखल केला आहे. संस्थानने याबाबत म्हणणे दिले आहे. वादीची मागणी मुदतीत नाही वादीचे विरुध्द तक्रारी असल्यामुळे त्यांना कमी केले. त्यांना कमी केलेनंतर श्री.गलांडे माजी प्रशासकीय अधिकारी यांचे खुनाचा आरोप इत्यादी कारणामुळे नुकसान भरपाई मागणेचा अधिकार नाही. अशा आशयाचे संस्थानचे म्हणणे दाखल केले आहे.

सदरचे प्रकरणी कोर्ट केसची तारीख ०७/१२/२००७ रोजी कोपरगांव कोर्टात नेमण्यात आलेली होती. सदर दिवशी दि ०७/१२/२००७ रोजी संस्थानचे वतीने मा. कोपरगांव येथील मे.

सिव्हिल जज्ज सिनिअर डिव्हीजन, कोपरगांव यांचे कोर्टात अर्ज वकीलामार्फत दाखल केलेला आहे

सदरचा दावा लवक्रच सुनावणीसाठी येणार आहे. संस्थानतर्फे उपलब्ध माहिती कागदपत्रासह चौकशीत जबाब देणेत येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६५** **लूज नोट काऊंटींग मशिन व बंडल नोट काऊंटींग मशिन खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.८४९** दक्षिणा पेटीतील मोजणीकामी सध्या ३ लूज नोट काऊंटींग, दोन बंडल नोट काऊंटींग मशिन व दोन कॉईन सॉर्टींग मशिन अशा यंत्र सामुग्रीचा वापर केला जातो. या सर्व मशिन डे-ला-रु, इंग्लड या उत्पादक कंपनीच्या असुन, मे.कोरस ( इंडिया ) लिमिटेड, या अधिकृत वितरकाव्दारे खरेदी केलेल्या आहेत. संपूर्ण नाण्यांची सॉर्टींग ही मॅच-५ व मॅच-६ या दोन मशिनवर केली जात असुन, सर्व नोटांची प्राथमिक मोजणी लुज नोट काऊंटींग मशिनवर करण्यात येऊन, बंडल नोट काऊंटींग मशिनवर त्याची पुनःश्च तपासणी करण्यात येत आहे.

काऊंटींग हॉलमध्ये सध्या तीन लुज नोट काऊंटींग मशिनच्या व्दारे सर्व प्रकारच्या लुज नोटा मोजल्या जातात. नोटांचे प्रमाण खुपच वाढल्याने शक्यतो जास्त प्रमाणात धुळ- कचरा अडकल्यानंतर किंवा मशिनचे सेंन्सर खराब झाल्यावर मशिन बंद पडण्याचा जास्त धोका असतो. त्यामुळे उर्वरित दोन मशिनवर मोठयाप्रमाणात कामाचा भार पडतो. ब-याचवेळा हाताने नोटा मोजाव्या लागतात. सदरची गैरसोय टाळण्यासाठी आणखी एक लुज नोट काऊंटींग मशिन विकत घेतल्यास ते राखीव (Stand-by) म्हणून आपल्याला वापरता येईल व अशा अडचणीच्या वेळी, म्हणजे एखादे मशिन बंद पडल्यास या मशिनचा वापर करता येईल. तसेच रोखपाल विभागाकडे संस्थानमधील सर्व काऊंटरवरील रक्कम दिवसातून दोनदा जमा होत असते. सदरची जमा होणारी रक्कम ही मोठयाप्रमाणात असल्याने प्रत्येकवेळी हाताने रक्कम तपासून घेणे शक्य होत नाही. तसेच बँकाना सुध्दा जमा होणारी ही रक्कम परत मोजुन द्यावी लागत असल्याने बराचसा वेळ जातो. अशा वेळी रोखपाल विभागात काऊंटरवरुन जमा होणारी रक्कम बंडलनोट मशिनच्या सहाय्याने मोजल्यास व बँकांनाही या मशिनच्या सहाय्याने नोटा मोजून दिल्यास कमीत-कमी वेळेत अचुक काम होण्यास मदत होईल.

मे.कोरस (इं) लि. पुणे यांचेकडून काऊंटीगमध्ये असणा-या सर्व मशिन खरेदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांचेकडून संस्थानला प्रत्येक दक्षिणामोजणीचे वेळी सेवा मिळत आहे. प्रत्येक दक्षिणामोजणीचे वेळी त्यांचा प्रतिनिधी सर्व मशिनच्या दुरुस्ती व देखभालीसाठी हजर असतो. ८६५० या मॉडेलच्या तीन मशिन त्यांचेडून जानेवारी,२००७ मध्ये खरेदी केलेल्या आहेत. सदरच्या मशिनचा लुज नोटा मोजण्यासाठी चांगला उपयोग होत असुन त्या व्यवस्थितरीत्या काम देत आहेत. त्यामुळे या प्रकारच्या मशिनची त्यांचेकडे दूरध्वनीवर चौकशी केली असता, ८६५० ही मशिन त्यांचेकडे उपलब्ध असुन जुन्या दरानेच ते सदरची मशिन देण्यास तयार आहेत. तसेच खरेदी करावयाची बंडल नोट मशिन KASHMAN-II या मशिनचाही दक्षिणामोजणीच्या वेळी वापर केला जात असुन, या मशिनचाही नोटांची पून्हा एकदा तपासणी करण्यासाठी चांगला वापर होत आहे. लूज नोट काऊंटीग मशिन ८६५० करीता रु. १,०१,२५०/- (सर्व करासहीत ) व बंडल नोट काऊंटींग मशिन KASHMAN-II करीता रु.४०,५००/- (सर्व करासहीत) एवढी किंमत त्यांनी कळविलेली आहे.

तरी सदरच्या मशिन उपरोक्त दराने खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर मशिनची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी येणाऱ्या योग्य त्या खर्चासही मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६६** **रेडिओलॉजीस्ट यांना मासिक वेतनाव्यतिरिक्त कामाचे प्रमाणात मोबदला देणेबाबत.**
**निर्णय क्र.८५०** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजीस्टला वेतनाव्यतिरिक्त प्रति महा रु.२०,०००/- मोबदला देण्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे ठराव क्र.७७७ दि.१९.०८.२००६, तसेच दि.२०.०५.२००७ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये ज्यु. रेडीओलॉजीस्ट यांनाही मान्यता मिळाली आहे. त्याप्रामाणे रेडीओलॉजी विभागात कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे एक सिनीयर रेडीओलॉजीस्ट व दोन ज्यु. रेडीओलॉजीस्ट अशी पदे आहे यांना मासिक वेतन रु.३०,०००/- अधिक फिक्स मासिक मोबदला रु.२०,०००/- असे प्रति महा रु.५०,०००/- प्रति रेडीओलॉजीस्टला देण्यात येत आहे.

दि.१५.०९.२००७ रोजी रेडीओलॉजी विभागातील रेडीओलॉजीस्ट डॉ. स्वाती आढाव व डॉ.योगिनी शहा यांनी दि.०१.०९.२००७ पासून-

०१) मासिक पगाराव्यतिरीक्त मिळणारा फिक्स रु.२०,०००/- मोबदला आम्हाला नको.

०२) रेडीओलॉजीस्टला त्यांनी केलेल्या एक्स-रे, सि.टी.स्कॅन, एम.आर.आय.च्या प्रत्येक रिपोर्टला एकूण किमतीच्या १०% मोबदला मिळावा.

०३) सोनोग्राफी प्रति रिपोर्ट रु.१००/- व कलर डॉपलर प्रति रिपोर्ट रु.२००/-.
०४) ईमरजन्सी संध्याकाळी आठ नंतर प्रति एम.आर.आय. व सि.टी.स्कॅन साठी रु.१००/-.
०५) ईमरजन्सी संध्याकाळी आठ नंतर प्रति सोनोग्राफी रु.५०/- व प्रति कलर डॉपलर रु.१००/-.

अशाप्रकारे मासिक पगाराव्यतिरिक्त मोबदल्याची मागणी केली आहे तसेच दि.३०.०५.२००७ रोजी एम.आर.आय. युनिट सुरु झाल्यापासून प्रति एम.आर.आय. वरीलप्रमाणे मोबदला मिळणेबाबत विनंती केली आहे.

रेडीओलॉजी विभागात ऑगस्ट महिन्यात झालेल्या तपासन्यांवरुन रेडीओलॉजीस्ट यांनी मागितलेल्या दराप्रमाणे व प्रस्तावित केलेल्या दरानुसार पुढीलप्रमाणे मोबदला देय होईल.

| अ.नं. | | ऑगस्ट-०७ | | रेडीओलॉजीस्टने मागणी केलेल्या दरानुसार | | प्रस्तावित दरानुसार नं.१ | | प्रस्तावित दरानुसार नं.२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | तपासणी संख्या | दर | रु. | दर | रु. | दर प्रति | रु. |
| १ | MRI | ८९०,००० | ४५० | १०% | ८९,००० | ५ % | ४४,५०० | रु.२०० | ९०,००० |
| २ | CT Scan | ५९३,९०० | ५०४ | १०% | ५९,३९० | ५ % | २९,६९५ | प्रति | ५०,४०० |
| ३ | X-Ray | ११६,४७० | १,१२५ | १०% | ११,६४७ | ५ % | ५,८२४ | रु.१०० | ११,२५० |
| ४ | Sonography | | ७९१ | रु.१०० | ७९,०९० | रु.५० | ३९,५४५ | प्रति | १९,७७३ |
| ५ | Colour Doppler | | २८ | प्रति रु.२०० प्रति | ५,५०० | प्रति रु.१०० प्रति | २,७५० | रु.१० प्रति रु.२५ प्रति रु.५० प्रति | १,३७५ |
| | | | | | २४४,६२७ | | १२२,३१४ | | १,७२,७९८ |

उपरोक्त तुलनात्मक दरांपैकी प्रस्ताव क्र.१ नुसार मोबदला दिल्यास प्रति महा कर्मचारी आकृतीबंधात दर्शविल्याप्रमाणे एक सिनीयर व दोन ज्यु.रेडीओलॉजीस्ट अशा एकून तीन रेडीओलॉजीस्टला माहे ऑगस्ट- २००७ च्या तपासण्याच्या आकडेवारीनुसार मासिक मोबदला रु.१,२२,३१४/- अधिक मासिक वेतन रु.३०,०००/- असे प्रत्येकी प्रति महा रु.७०,७७१/- देय होतील. तसेच या पुढे तपासण्याच्या आकडेवारीमध्ये काही प्रमाणात वाढ होत राहील व त्या प्रमाणात मोबदलाही वाढेल.

तरी रेडीओलॉजीस्ट यांना तपासण्यांच्या रिपोर्टनुसार प्रस्ताव क्र.१ प्रमाणे मोबदला देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ६७** **विविध ठिकाणी साईभक्तांच्या सोयीसाठी स्वागत कमान उभारणेबाबत.**
**निर्णय क्र.८५१** श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी देशविदेशाचे सर्व भागातून मोठ्या प्रमाणावर साईभक्त दररोज येत असतात. साईभक्त शिर्डीचे जवळ आल्यानंतर त्यांना योग्य रस्त्याबाबत मार्गदर्शन व्हावे याकरीता व्यवस्थापन समितीचे दिनांक ५/११/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६१ अन्वये नगर-मनमाड रस्त्यावर शिर्डी गावात दोन, बाभळेश्वर, कोपरगांव येथे प्रत्येकी एक तसेच नाशिक शिर्डी रस्त्यावर सिन्नर येथे व औरंगाबाद शिर्डी रस्त्यावर नेवासाफाटा येथे कमान करणेबाबत ठरले होते.

त्यानुसार निविदा मागवून मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेत निविदा उघडण्यात येऊन निर्णय क्र. ५४७ अन्वये निम्नतम दराचे ठेकेदार मे.गुगळे कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचे निविदा मंजूर करण्यात आली होती. त्यांना त्यानुसार कार्यादेश देण्यात आला होता. पैकी नेवासा फाटा येथील कमानीचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित इतर कमानी उभारणेस सार्वजनिक बांधकमा विभागाने रस्ता रुंदीकरणाचे कारणामूळे अद्याप परवानगी दिली नाही त्यामूळे मे.गुगळे कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचा इतर राहीलेल्या कमानी उभारणेसाठीचा कार्यादेश रद्द करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.६८.** **३१ डिसेंबर,२००७ रोजी श्रींचे समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत.**
**निर्णय क्र.८५२** गेल्या काही वर्षापासून डिसेंबर महिन्यामध्ये गर्दीचे प्रमाण वाढत आहे. दि.३१ डिसेंबर रोजी नवीन वर्षाच्यावेळी श्रींचे दर्शन मिळावे याकरीता गर्दीचा उच्चांक होतो. यामध्ये मुंबई, दिल्ली, हैद्राबाद येथील साईभक्तांची संख्या मोठी असते.

मागील वर्षी दि.२५.११.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच सभेमध्ये विषय नं.४४, निर्णय क्र.९८५ प्रमाणे दि.३१ डिसेंबर २००६ या दिवशी श्रींचे समाधी मंदिर रात्रभर साईभक्तांच्या दर्शनासाठी खुले ठेवणेबाबत निर्णय संमत झाला होता व त्यामुळे गर्दीचे प्रमाण आटोक्यात राहीले.

त्याच धर्तीवर यावर्षीही होणारी संभाव्य गर्दी विचारात घेता सोमवार दि.३१ डिसेंबर २००७ रोजी समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवावे लागेल त्यामूळे दि.३१.१२.२००७ रोजीची शेजारती व दि.०१.०१.२००८ रोजी काकड आरती होणार नाही, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.७८४ ते ८५२ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी

**दिनांक ०८.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**विषय नं. ०१** **श्रीक्षेत्र शिर्डी येथे सर्व सोयीने युक्त असे अद्ययावत एस.टी.बसस्थानक उभारणेबाबतचे प्रस्तावावर चर्चा तथा विचारविनिमय करणे.**

**निर्णय क्र.७८४.** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे महान संत श्री साईबाबांचे दर्शन घेणेसाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. या साईभक्तांना विविध सेवा-सुविधा विश्वस्तव्यवस्थे मार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. साईभक्तांचा श्री क्षेत्र शिर्डीचा प्रवास सुखकर व्हावा यादृष्टीने वेळोवेळी विश्वस्तव्यवस्थेमार्फत व राज्य परिवहन महामंडळामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत असतात. याचा एक भाग म्हणून, श्री क्षेत्र शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अद्ययावत सेवा-सुविधायुक्त असे बसस्थानक असणे गरजेचे आहे. याच अनुंषगाने व सल्लागार समितीने मागील सभेत सुचविल्यानुसार, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रस्तावित केलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीच्या सभांमध्ये शिर्डी येथील बसस्थानक विकसित करणेबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत.

या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांनुसार संस्थान आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राप/उपा.व व्य.सं./स्थाअ/२०२५, दिनांक १२ मे,२००६ रोजीचे पत्रासोबत पाठविलेल्या बांधकाम तपशीलांचा व बाबींचा विचार करुन शिर्डी येथील नियोजित सुसज्ज बसस्थानकाचा आराखडा व ढोबळ अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,१७,२९,६५०/- मात्रचे तयार करण्यात आलेले होते.

उपरोक्त बांधकाम आराखडयास व सुधारीत अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जून, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४१२ अन्वये मान्यता देण्यात आली. संस्थान आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखडयास मा.मुख्य स्थापत्य अभियंता, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक २८ नोव्हेंबर,२००६ व दिनांक २७ डिसेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदातील विवेचनास अनुसरुन, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे श्री क्षेत्र शिर्डी येथे राज्य परिवहन महामंडळास सर्व सुख-सोयींनीयुक्त असे अद्यायवत बसस्थानक संस्थान निधीतून बांधून देणेकामी मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावासंदर्भात मा. विधी व न्याय विभागाने मागितलेली सर्व माहिती महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व संस्थान प्रशासनामार्फत संबंधितांकडे पत्राव्दारे पाठविण्यांत आलेली आहे.

मात्र, मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२००६/ ६०७/(८७)-का.सोळा, दिनांक २७ एप्रिल, २००७ (इकडील कार्यालयास दिनांक १२ मे,२००७ रोजी प्राप्त झालेले) अन्वये असे कळविले आहे की, "शिर्डी येथील बसस्थानक बांधण्याकरीता संस्थानच्या निधीतून जवळपास रुपये २ कोटी मात्र खर्च करण्यात येणार असून, त्याबदल्यात संस्थान सदर बांधकामात कोणतेही हक्क वा सवलती मिळणार नाहीत, असे दिसून येते. शिर्डी येथे संस्थानचे स्वतंत्र माहिती केंद्र उभारण्याची आवश्यकता दिसून येत नाही. अशा स्थितीत सदर प्रस्ताव व्यवहार्य ठरत नसल्याने, सदर प्रस्तावावर पुनर्विचार करावा. "

**(क)** उपरोक्त परिच्छेद अ व ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मा.मुख्य स्थापत्य अभियंता, मरामापमं, मुंबई यांनी मंजूर केलेल्या पूर्वीच्या बांधकाम आराखडयात तळमजल्यावर संस्थानकरीता माहिती सुविधा केंद्रासाठी फक्त ४१.६७ चौमी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्यामुळे विधी व न्याय विभागाने दिनांक २७ एप्रिल, २००७ रोजीच्या पत्रान्वये सदरील प्रस्ताव व्यवहार्य ठरत नाही, त्यामुळे सदरहू प्रस्तावाचा पुनर्विचार करावा, असे कळविले होते.

त्यामुळे, मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी कळविल्याप्रमाणे या प्रस्तावावर पुनर्विचार करणेसाठी तसेच संस्थान निधीतून बांधकाम करुन देण्यात येणाऱ्या अद्ययावत बसस्थानकामध्ये भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी धर्मशाळा अथवा मोठया प्रमाणात लॉकर्स सुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देणेसाठी इकडील दिनांक ०८ ऑगष्ट, २००७ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष, मरामापमं, मुंबई व मा.कार्यकारी संचालक, मरामापमं, मुंबई यांना बैठक आयोजित करणेबाबत कळविण्यांत आलेले होते. त्यानुसार मा.मुख्य स्थापत्य अभियंता, मुंबई यांचेकडील दिनांक ०५ डिसेंबर, २००७ रोजीचे पत्रान्वये आजची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

**(ड)** संस्थान आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी शिर्डी येथील बसस्थानकाचा तळमजला अधिक तीन मजले असा सुधारीत बांधकाम आराखडा तयार केला आहे. सदरहू सुधारीत बांधकाम आराखडा तयार करतांना मरामापमं यांनी दिलेल्या सुचनांचा व निर्देशांचा विचार करण्यांत आलेला आहे. मरामापमं यांची शिर्डी येथे ९८.६५ आर (९८६५ चौरस मीटर) मालकीची जागा आहे. या सुधारीत बांधकाम आराखडयातील विशेष बाबी खालील प्रमाणे :

०२) बसस्थानकाचे एकूण बांधकाम अंदाजे ५०७९.४३ चौरस मीटर.
(तळमजला अधिक तीन मजले असे गृहीत धरुन)

०२) मरामापमं यांचे करीता एकूण बांधकाम अंदाजे २८०६.४३ चौरस मीटर.
(तळमजला अधिक तीन मजले असे गृहीत धरुन)

०३) संस्थान यांचेकरीता एकूण बांधकाम अंदाजे २२७३ चौरसमीटर.
(तळमजला अधिक तीन मजले असे गृहीत धरुन)
संस्थानकरीता तळमजल्यावर माहिती-सुविधा केंद्रासाठी स्वतंत्ररित्या जागा व या जागेतूनच वरील तीन मजल्यांवर जाणेसाठी स्वतंत्ररित्या संस्थानकरीता जिना व लिफ्टची सोय.

०४) संस्थानकरीता पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर धर्मशाळेची (डॉरमेट्रीज)सोय करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रत्येक मजल्यावर अंदाजित ७५० चौरस फुटाचे प्रत्येकी चार मोठे हॉल-वजा-खोल्या बांधण्यात येणार असून, असे १२ मोठे हॉल्स उपलब्ध होणार आहेत. यामध्ये अंदाजे ४५० साईभक्तांची राहण्याची व्यवस्था होईल. तसेच प्रत्येक मजल्यावर स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्ररित्या प्रसाधनगृहाची

पान नं.०२

स्नानगृह, शौचालय आदि) व्यवस्था करण्यांत येईल. धर्मशाळेव्यतिरीक्त लॉकर्स रुममध्ये अंदाजे ४५० व्यक्तींचे सामान ठेवण्याची व्यवस्था करता येईल.

०५) संस्थानव्यतिरिक्त मरामापमं यांचेकरीता पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर अंदाजित २०० बस वाहक-चालक, अधिकारी यांची राहण्याची सोय होईल, असे सर्व सोयींनी युक्त विश्रांतीगृह बांधण्यांत येणार आहे.

०६) बसस्थानकाच्या तळमजल्यावर १० प्लॅटफॉर्मस्‌ची सोय, बुकींग व पार्सल ऑफिस, स्टॅन्ड इन्चार्ज, कंट्रोलर रुम, उपहारगृह, विविध वस्तुंचे स्टॉल्स, प्रवाशांसाठी प्रतिक्षागृह, प्रशस्त प्रसाधनगृहाची सोय, ५० बसेसची पार्किंगची सोय करण्यात येणार आहे.

०७) भूमिगत जलकुंभ व सांडपाण्याची व्यवस्था.

०८) पिण्याचे पाण्यासाठी स्वतंत्र पाणपोई.

०९) विद्युतीकरण व विद्युतजनित्राची सोय.

१०) बाग-बगिचा व पार्किंग.

बसस्थानकाचा सुधारीत बांधकाम आराखडा तयार करतांना तळमजला अधिक तीन मजले असे बांधकाम दर्शविण्यांत आले असले तरी, यामध्ये तिसऱ्या मजल्याच्या बांधकामास नगररचना विभागाची मान्यता मिळेल असे गृहीत धरण्यांत आलेले आहे.

**(इ)** शिर्डी येथील प्रस्तावित बसस्थानकाच्या अंदाजे ५०७९.४३ चौरस मीटर बांधकामासाठी अंदाजित रक्कम रुपये ५.०९ कोटी मात्र इतका खर्च येईल. यापैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीला २२७३ चौरसमीटरचे माहिती सुविधा केंद्रासह धर्मशाळेचे बांधकाम मिळणार आहे. शिर्डी बसस्थानकाची जागा ही अहमदनगर-मनमाड राजमार्गालगत असून, २२७६ चौरस मीटर जागेसाठी शासकीय दरानुसार जागेचे मुल्य रुपये ३००० प्रती चौरस मीटरप्रमाणे अंदाजित ६८.१९ लाख इतके रुपये होते. शिर्डीतील आजचे ऐकीव बाजारभावानुसार सदर जागेचे मुल्य अंदाजे रुपये १०,०००/- प्रति चौरस मीटर याप्रमाणे अंदाजे रुपये २२७.३० लाख इतके होईल, असे वाटते. सदरचे संस्थान वापराचे बांधकामासाठी आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस् यांचे अंदाजपत्रकानुसार अंदाजे रुपये १७१.५८ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. मरामापमं यांना करुन द्यावयाच्या बांधकामाचा खर्च अंदाजे रुपये २३०.२० लाख इतका अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक सोयी व इतर सुविधांसाठी रुपये ९७.०२ लाख इतका खर्च येणार आहे.

तसेच, श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अद्यायवत बसस्थानक असणे अत्यंत आवश्यक आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांमध्ये संपूर्ण देशासह, विदेशातील भक्तांचा ही समावेश असतो. साईभक्तांना शिर्डीत प्रवेश केल्यानंतर अत्यंत प्रसन्न व मनमोहक असे बसस्थानक दृष्टीस पडल्यास त्यांचा आनंद नक्की व्दिगुणीत होईल, यात शंका नाही. यासाठी आजचे सभेत अनुकूल असा तपशीलवार निर्णय झालेस संस्थानचे माध्यमातून व निधीतून श्री क्षेत्र शिर्डी येथे अद्यायवत बसस्थानक उभारणीबाबतचा पुनरप्रस्ताव अधिनियमतील तरतुदीस अनुसरुन मान्यतेसाठी शासनाकडे सादर करता येईल.

उपरोक्तप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा-तथा-विचारविनिमय करणेसाठी आजचे सभेमध्ये मरामापमंचे अध्यक्ष आमदार मा.श्री.सुधाकरपंत परिचारक, मरामापमंचे मुख्य स्थापत्य अभियंता श्री.ज.भा.इनामदार, श्री ह.सा.गिरीगोसावी, उपमहाव्यवस्थापक, मरामापमं, श्री एस.एम.जाधव, प्रादेशिक व्यवस्थापक,नाशिक, श्री पी.बी.सुर्यवंशी, विभागीय अभियंता, मरामापमं,अहमदनगर, श्री व्ही.टी.भिलारकर, कार्यकारी अभियंता, मरामापमं, नाशिक यांचेसह मरामापमंचे इतर अधिकारी उपस्थित होते. सुरुवातीस मा.कार्यकारी अधिकारी यांनी श्री क्षेत्र शिर्डी येथे अद्यायवत बसस्थानक उभारणीबाबतचे महत्व विषद करुन, त्याबाबतचे थोडक्यात प्रास्ताविक केले. त्यानंतर संस्थान आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.चौधरी यांनी मरामापमंचे सुचना व निर्देश विचारांत घेऊन तसेच साईभक्तांना सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संस्थानच्या उद्दीष्टांचा विचार करुन तयार केलेल्या सुधारीत बांधकाम आराखडयाविषयी माहिती सभेस दिली.

**संस्थान आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या सुधारीत बांधकाम आराखडयावर सविस्तर व सांगोपांग चर्चा करणेत येऊन, बांधकाम आराखडयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात, असे ठरले.**

०१. बसस्थानकाच्या तळमजल्यावर संस्थानसाठी माहिती सुविधा केंद्रांच्या जागेव्यतिरिक्त इतर उपक्रमासाठी, जसे खोली आरक्षण केंद्र, देणगी कार्यालय, पुस्तक फोटो विक्री केंद्र, बॅकांचे एटीएम केंद्र, रेल्वे बुकींग काऊंटर, लॉकर्स सुविधा व इतर अनुषंगिक भक्तांच्या सेवा सुविधेसाठी नकाशात दर्शविलेले पश्चिम बाजुकडील मोठया आकाराचे तीन दुकानगाळे व पूर्व बाजुकडील छोटया आकाराचे तीन दुकानगाळे संस्थानकडे देण्यांत यावेत.

०२. बसस्थानकाच्या प्रवाशांच्या प्रतिक्षागृहाच्यावर, म्हणजेच प्लॅटफार्मस्‌च्या वर पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर सुधारित बांधकाम आराखडयात दर्शविल्याप्रमाणे साईभक्तांचे निवासाकरीता संस्थानतर्फे धर्मशाळा सुरु करणेसाठी बांधकाम करण्यात यावे.

०३. बसस्थानकाच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर मरामापमंच्या अधिकारी वर्गासाठी एकूण ०४ व्ही.आय.पी. सुटस् ची व्यवस्था करण्यांत आलेली आहे, त्याऐवजी फक्त दुसऱ्या मजल्यावर ०२ व्ही.आय.पी.सुटस्‌ची व्यवस्था करण्यांत यावी. संपूर्ण पहिला मजला साईभक्तांच्या धर्मशाळा व लॉकर्स सुविधेसाठी संस्थानला उपलब्ध करुन देण्यांत यावा.

०४. बसस्थानकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर मरामापमंच्या निर्देशानुसार व सुचनांनुसार शिर्डी येथे मुक्कामी असणाऱ्या १५० बसवाहक व बसचालक कर्मचाऱ्यांसाठी धर्मशाळा-वजा-विश्रांतीगृहाचे बांधकाम करुन देण्यांत यावे.

पान नं.०३

०५. बसस्थानकाच्या तळमजल्यावर मरामापमंच्या निर्देशानुसार आगार व्यवस्थापक,वाहतूक नियंत्रक, लेखा विभाग, आगाऊ तिकीट / आरक्षण केंद्र, पार्सल बुकींग केंद्र, साधारणतः ४० बसेस मुक्कामी राहतील अशी वाहनतळाची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत यावी.

०६. सुधारीत बांधकाम आराखडयामध्ये सध्या ११ प्लॅटफॉर्मस्ची सुविधा दर्शविण्यांत आलेली आहे, तथापि भविष्यात गर्दीमुळे हे प्लॅटफॉर्मस् कमी पडू शकतात या मा.अध्यक्ष, मरामापमं यांच्या सूचनेचा विचार करुन आणखी ०४ प्लॅटफार्मस्ची सुविधा भविष्यातील विस्तारीकरणाची तरतूद बांधकाम आराखडयात करण्यांत यावी.

०७. तळमजल्यावर प्रवाशांच्या सोयी-सुविधेसाठी उपहारगृहाबरोबरच पिण्याचे पाण्याची सोय,मोठया प्रमाणावर स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्ररित्या प्रसाधानगृहाची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे बांधकाम आराखडयात बदल करुन नवीन बांधकाम आराखडा मरामापमंच्या मान्यतेसाठी त्वरीत पाठविण्यांत यावा, असे निर्देश देण्यांत आले. बांधकाम आराखडा मंजूर झालेनंतर त्याच्या सविस्तर निविदा तयार करुन जानेवारी, २००८ मध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे बसस्थानकाच्या बांधकाम आराखडयास मान्यता देण्यांत आल्यानंतर, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस डेपोसाठी शिर्डी विकास योजना आराखडयात आरक्षण क्रमांक ४६ दर्शविण्यांत आलेले आहे. बस डेपोसाठी मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १६१ ते १६५ पैकी मधील ०५ हेक्टर ४५ आर क्षेत्र आरक्षित करण्यांत आलेले आहे. सदरहू आरक्षणातील जमीन शिर्डीतील जमिनीचे सरकारी व बाजारभाव पाहतां मरामापमं यांना संपादीत करता येणे शक्य नाही. त्याऐवजी सदहू आरक्षणातील जमीन संस्थानला भूसंपादीत करण्यासाठी/खरेदी करण्यांसाठी मरामापमंच्या वतीने ना हरकत देण्यांत यावी. त्यानुसार सदरहू आरक्षित जमीन संस्थानने संपादीत करावी व त्याचा योग्य विकास प्रकल्पासाठी विनियोग करावा व याऐवजी संस्थानने मरामापमं यांना मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारात संस्थान मालकीची साधारणतः ०३ (तीन) एकर जमीन बस डेपोसाठी उपलब्ध करुन द्यावी, अशी सूचना मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी सभेपुढे मांडली.

त्यावर सविस्तर चर्चा करण्यांत येऊन, सदरहू प्रस्तावास सभेस उपस्थित असणाऱ्या मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनीही सहमती दर्शविली. त्यावर मा.अध्यक्ष, मरामापमं यांनी सदरहू प्रस्तावावर सकारात्मक दृष्टीकोन दर्शवून याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मरामापमंचे उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच, शिर्डी बसस्थानक बांधकामाविषयी उपरोक्तप्रमाणे ठरलेल्या बाबींविषयी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेमध्ये सविस्तर अटी व शर्तीचा समावेश करुन सामंजस्य करार (Memorandum of Understanding) करण्यात यावा, असे ठरले.

सत्य प्रत

कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी